




# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, बुधवार २९ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०








# धर्म विचारला, कलमा म्हणायला लावला, नंतर चाकूने हल्ला

## मुंबईतील मीरा रोड चाकू हल्ल्याचे पहलगाम कनेक्शन

## ATS म्हणाली- ISIS ची कागदपत्रे मिळाली

## मुंबईत 2 सुरक्षारक्षकांवर अटॅक



**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईतील मीरा रोडच्या नया नगर परिसरात दोन सुरक्षा रक्षकांवर झालेल्या हल्ल्याप्रकरणी मुंबई दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) तपास सुरू केला आहे. सुरक्षा यंत्रणा या हल्ल्याला "लोन वुल्फ'' (एकट्याने केलेला दहशतवादी हल्ला) मानत आहेत. आरोपी, झैब झुबेर अन्सारी (३१) याने तेथे कर्तव्यावर असलेल्या दोन सुरक्षा रक्षकांना लक्ष्य केले.

**धर्म विचारून केली मारहाण -** प्रत्यक्षदर्शींच्या दाव्यानुसार, आरोपीने आधी दोन रक्षकांना पत्ता विचारला आणि नंतर परत येउन त्यांचा धर्म विचारला. असाही दावा केला जात आहे की, आरोपीने एका रक्षकाला इस्लामी कलमा म्हणायला भाग पाडले आणि तो तसे करू न शकल्याने, त्याने एका धारदार शस्त्राने त्याच्यावर हल्ला केला. जखमी रक्षकावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**आरोपीच्या घरातून अनेक संशयास्पद नोट सापडल्या-** दरम्यान, जेव्हा पोलिसांनी अन्सारीला अटक करून त्याच्या घराची झडती घेतली, तेव्हा तपास पथकाला त्याच्या हस्ताक्षरातील चिठ्ठ्या सापडल्या, ज्यात त्याने आयसिसमध्ये सामील (पान २ वर)

## झुबेरला हिंदूंना लक्ष्य करायचे होते

**नवी दिल्ली:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी सांगितले की, मीरा रोड येथील संशयित 'लोन वुल्फ' दहशतवादी हल्ला हा स्वयं-मूलतत्त्ववादाचे प्रकरण असल्याचे दिसते. तसेच, तपासकर्त्यांनी आरोपीच्या



घरातून गुन्हेगारी स्वरूपाचे साहित्य जप्त केले आहे, असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री कार्यालयाच्या माहितीनुसार, फडणवीस म्हणाले, 'हे स्व-मूलतत्त्ववादाचे प्रकरण असल्याचे दिसते. आरोपीच्या घरातून काही पुस्तके आणि आक्षेपार्ह साहित्य जप्त करण्यात आले आहे. तो अमेरिकेत राहत होता आणि नुकताच परतला होता. प्राथमिक तपासात असे समोर आले आहे की, तो कट्टरपंथी बनला होता आणि 'जिहाद'च्या नावाखाली हिंदू समाजातील लोकांवर (पान २ वर)

## वरूड-मोर्शी महामार्गावर कारची झाडाला धडक

# एकाच कुटुंबातील 3 ठार

**अमरावती/प्रतिनिधी :** लग्नसमारंभाच्या आनंदावर काळाने विरजण घातल्याची दुर्देवी घटना मंगळवारी सकाळी घडली. वरूड-मोर्शी महामार्गावर झालेल्या एका भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. भरधाव कार रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावर आदळल्याने हा अपघात घडला. यामध्ये एका तीन वर्षांच्या चिमुरडीसह तिच्या आईचा आणि आजोबांचा मृत्यू झाला, तर कारचालक गंभीर जखमी झाले आहेत.

**खडका फाट्याजवळ अपघात-** मिळालेल्या माहितीनुसार नागपूर येथील कामठी खैरी भागातील विनायक कॉलनी येथील रहिवासी असलेले नांदे कुटुंब एका लग्नकार्यासाठी जात होते. त्यांची कार (एमएच ४०/ केआर ०७२१) वरूड-मोर्शी महामार्गावरील खडकी फाट्याजवळ आली असता, चालकाचे नियंत्रण सुटले



आणि वाहन थेट रस्त्याच्या कडेला असलेल्या मोठ्या झाडावर जाउन धडकले. ही धडक इतकी जबर होती की, कारचा समोरचा भाग पूर्णपणे चक्काचूर झाला.

**मृतांची ओळख पटली-**या अपघातात समाधान किसनराव नांदे (६२), किरण गोपाल नांदे (२८) आणि दिया गोपाल नांदे (३) या तिघांचा मृत्यू झाला. समाधान नांदे यांचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी (पान २ वर)

## ज्या कंपनीच्या विमानात अजितदादांचा अपघात, त्याच विमानाने पार्थ पवारांचा प्रवास

**मुंबई/प्रतिनिधी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ज्या कंपनीच्या विमानाला अपघात झाला होता, त्याच



व्हीएसआर (VSR) कंपनीच्या विमानाने आज पार्थ पवार यांनी प्रवास केल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. संबंधित विमान कंपनीच्या विमानाने प्रवास करू नका, असे आवाहन रोहित पवार यांनी राजकीय नेत्यांनी केलेले असताना पार्थ पवार यांनी विनंती धुडकावून त्याच विमानाने प्रवास केल्याने पवार कुटुंबातील सदस्यांमध्ये मतभेद आहेत का, असा सवाल उपस्थित होत आहे. आमदार रोहित पवार सातत्याने संबंधित कंपनीवर आरोप करत असताना, पवार कुटुंबातील सदस्याने त्याच विमानातून प्रवास केल्याने नवा वाद रंगण्याची चिन्हे आहेत. संबंधित विमान कंपनीविरोधात रोहित पवार यांनी वात पेटवलेली असताना पार्थ पवार यांनी त्याच कंपनीच्या (पान २ वर)

# वर्धा नदीत बुडून बाप-लेकीसह तिघांचा मृत्यू

**चंद्रपूर/प्रतिनिधी :** धानोरा गावातून वाहणा-या वर्धा नदीत कपडे धुण्यासाठी गेलेल्या राजू कोडापे (४०), अर्पिता राजू कोडापे (१२) या वडील आणि मुलीसह प्रियांका मडावी (१४) या तीन जणांचा नदीच्या पात्रात बुडून मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना मंगळवारी (२८ एप्रिल) घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

चंद्रपूर -गडचांदूर मार्गावरील घुग्घुस पासून जवळ असलेल्या धानोरा गावातून वर्धा नदी वाहते. मंगळवारी दुपारच्या सुमारास मजुरीचे काम करणारा राजू कोडापे, त्याची मुलगी अर्पिता कोडापे आणि प्रियांका मडावी नदीकाठी कपडे धुण्यासाठी गेले होते. मात्र, नदीतील पाण्याचा अंदाज न आल्याने तिघेही खोल पाण्यात गेले आणि नदीच्या पात्रात बुडाले, अशी प्राथमिक माहिती



समोर येत आहे.घटनेची माहिती मिळताच घुग्घुस पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत शोधमोहीम सुरू केली असून मृतदेहांचा शोध सुरू आहे. या दुर्देवी घटनेमुळे धानोरा गावात शोककळा पसरली आहे. या दुर्देवी घटनेत वडील आणि मुलीचा दुर्देवी मृत्यु झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## भाजपकडून विधानपरिषदेसाठी 5 उमेदवारांची यादी जाहीर

### विवेक कोल्हे, प्रज्ञा सातव यांचेही नाव

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्याचं लक्ष लागलेल्या विधानपरिषद निवडणुकांच्या उमेदवारांपैकी पहिल्यांदा भाजपकडून ६ नावांची घोषणा झाली आहे. भाजपच्या संसदीय कमिटीच्या मान्यतेनंतर भाजपने अधिकृतपणे महाराष्ट्रातील ५ विधानपरिषदांच्या जागेसाठी पाच नावांची घोषणा केली. तर, विधानपरिषदेच्या एका पोटनिवडणुकीसाठी एक म्हणजेच एकूण ६ उमेदवारांच्या नावांची घोषणा करण्यात आली आहे. त्यामध्ये, काँग्रेसमधून भाजपात आलेल्या प्रज्ञा सातव यांना पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. तर,अहिल्यानगरमधील विवेक कोल्हेंना संधी विधानपरिषदेची संधी मिळाली आहे. सुनिल कर्जतकर, माधवी नाईक, संजय भेंडे, विवेक कोल्हे आणि प्रमोद जठार यांना उमेदवारी जाहीर केली आहे. विवेक कोल्हे यांचं नाव निश्चित झाल्याच्या कालपासून चर्चा सुरु होत्या. विवेक कोल्हे यांनी चंद्रशेखर बावनकुळे (पान २ वर)

**यादी**

- सुनिल कर्जतकर,
- माधवी नाईक,
- संजय भेंडे,
- विवेक कोल्हे,
- प्रमोद जठार,
- सुर्यकुमार शर्मा
- डॉ. प्रज्ञा सातव.




## इंडिगो ग्वांगझूमध्ये, एअर चायना दिल्लीत

# भारत-चीन हवाई सेवेचा श्रीगणेशा!

**नवी दिल्ली/बीजिंग/वृत्तसंस्था :** भारत आणि चीन या दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांमध्ये एक मोठी सकारात्मक घडामोड घडली आहे. गेल्या सहा वर्षांपासून विस्कळीत झालेली थेट हवाई कनेक्टिव्हिटी आता पूर्णपणे पूर्वपदावर येत असून, दोन्ही देशांच्या प्रमुख विमान कंपन्यांनी आपली सेवा पुन्हा सुरू केली आहे. अलीकडेच इंडिगोचे (IndiGo) विमान चीनमधील ग्वांगझू (Guangzhou) येथे यशस्वीरित्या उतरले, तर एअर चायनाने (Air China) आपली अत्यंत महत्त्वाची दिल्ली-बीजिंग सेवा पुन्हा सुरू करून दोन्ही राजधानींना जोडले आहे.



इंडिगोने दिल्ली ते ग्वांगझू ही थेट विमान सेवा सुरू केली आहे. याशिवाय २९ मार्च २०२६ पासून कोलकाता ते शांघाय ही दैनंदिन सेवाही सुरू झाली असून, या मार्गावर प्रवाशांचा ६८% ते ८५% पर्यंत प्रतिसाद मिळत आहे तर तब्बल ६ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर एअर चायनाने २१ एप्रिल २०२६ पासून दिल्ली-बीजिंग सेवा पुन्हा सुरू केली आहे. एअर चायनाची सेवा आठवड्यातून तीन दिवस (मंगळवार, शुक्रवार आणि रविवार) उपलब्ध असेल. हे विमान बीजिंगहून दुपारी ३:१५ वाजता उड्डाण करून रात्री ८:२० वाजता दिल्लीत पोहोचेल. २०२० मधील सीमावाद आणि कोरोना महामारीमुळे ही सेवा बंद झाली होती. आता थेट विमान सेवा सुरू झाल्यामुळे व्यापार, तंत्रज्ञान कंपन्या आणि पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे.

थेट विमान सेवा सुरू झाल्यामुळे प्रवासाचा वेळ तर वाचणारच आहे, पण त्यासोबतच पुरवठा साखळीचा खर्च (Supply Chain Costs) कमी होण्यास मदत होईल. हे दोन्ही देशांमधील व्यावसायिक संबंध (पान २ वर)

## सलीम डोला तुर्कस्तानमधून जेरबंद

- दाउदला मोठा झटका
- जवळचा सहकारी
- भारतीय गुप्तचर यंत्रणांची कारवाई



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**अंडरवर्ल्ड डॉन दाउद इब्राहिमचा अत्यंत विश्वासू आणि कुख्यात ड्रग्ज तस्करसलीम डोला याला अखेर तुर्कस्तानमधून भारतात आणण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी एका विशेष विमानाने त्याला दिल्लीच्या टेक्निकल विमानतळावर आणले. इस्तंबूलमध्ये तुर्की सुरक्षा यंत्रणांनी केलेल्या अटकेनंतर, भारतीय गुप्तचर यंत्रणांच्या यशस्वी पाठपुराव्यामुळे त्याचे प्रत्यार्पण शक्य झाले आहे. सलीम डोला हा फक्त दाउदचा साथीदारच नाही, तर जागतिक सिंथेटिक ड्रग नेटवर्कमधील एक मुख्य चेहरा आहे. तो दुबई आणि तुर्कीमध्ये बसून भारतात अमली पदार्थांचा पुरवठा करण्याचे मोठे सिंडिकेट चालवत होता. या अवैध व्यापाराची वार्षिक उलाढाल ५,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे. भारतीय तरुणांना ड्रग्जच्या जाळ्यात ओढण्यासाठी त्याने देशाच्या विविध भागांत प्रयोगशाळा आणि कारखाने उभारले होते.

यंत्रणांचे यश भारतीय गुप्तचर यंत्रणांनी आंतरराष्ट्रीय संस्थांच्या मदतीने ही गुप्त मोहीम राबवली. चौकशीचा घेरा सध्या दिल्लीत डोलाची सखोल चौकशी सुरू असून, त्यानंतर त्याला मुंबई पोलीस किंवा `>< च्या ताब्यात दिले जाईल.

**कुटुंबावर आधीच कारवाई-**ऑक्टोबर २०२५ मध्ये त्याचा सहकारी सोहेल शेख, तर नोव्हेंबर २०२५ मध्ये त्याचा मुलगा ताहिर डोला आणि कुटुंबातील ४ सदस्यांना दुबईतून भारतात आणून अटक करण्यात आली होती.

***बक्षीस आणि नोटीस-***डोलाच्या विरोधात आंतरराष्ट्रीय रेड कार्नर नोटीस जारी करण्यात आली होती आणि एनसीबीने त्याच्यावर १ लाख रुपयांचे बक्षीस (पान २ वर)

## सर्वच पक्षाचे उमेदवार अजूनही गुलदस्त्यात!

### ठाकरे गुरुवारी अर्ज दाखल करण्याची शक्यता

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी द्वैवार्षिक निवडणूक, तसेच एका जागेची पोटनिवडणूक १२ मे रोजी होणार असून, ही निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता आहे. शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे महाविकास आघाडीकडून निवडणूक लढवणार हे जवळपास निश्चित झाले आहे. या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची गुरुवारपर्यंत मुदत असून, अजून भाजपासह महायुतीतील तिन्ही पक्षांनी उमेदवार जाहीर केलेले नाहीत. यामुळे उत्सुकता वाढली आहे. विधानपरिषदेच्या ९ जागांसह प्रज्ञा सातव यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या एका जागेची पोटनिवडणूक होत आहे. विधानसभेतील संख्याबळ बघता या १० पैकी ९ जागा महायुतीला, तर एक जागा महाविकास आघाडीला मिळण्याची शक्यता आहे. निवृत्त होणा-या सदस्यांमध्ये शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचाही समावेश आहे. त्यांनीच आघाडीकडून निवडणूक लढवावी अशी भूमिका काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी परवा उद्धव ठाकरे यांची भेट घेउन विनंती केली व उद्धव ठाकरे उद्यापर्यंत याबाबत निर्णय घेतील असे ठाकरे गटाचे नेते खा. संजय राउत यांनी स्पष्ट केले. उद्धव ठाकरे (पान २ वर)



विधानपरिषद निवडणुक 2026

## डिजिटल अरेस्ट प्रकरणात 9,400 व्हॉट्सॲप अकाऊंटवर बंदी

### केंद्राची सुप्रीम कोर्टात माहिती

**नवी दिल्ली :** देशातील वाढत्या डिजिटल अरेस्ट प्रकरणांना आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने मोठी कारवाई सुरू केली आहे. जानेवारी २०२६ पासून आतापर्यंत सायबर गुन्ह्यांत सहभाग आढळलेल्या ९ हजार ४०० खात्यांवर व्हॉट्सअपने बंदी घालण्यात आली आहे. या कारवाईत दूरसंचार नियामक, सेवा प्रदाते, आरबीआय, तंत्रज्ञान कंपन्या आणि सीबीआय यांसारख्या अनेक संस्था एकत्रितपणे काम करत आहेत. केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात ही माहिती दिली. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर गृह मंत्रालयाअंतर्गत कार्यरत असलेल्या इंडियन सायबरक्राईम कोऑर्डिनेशन सेंटरने एक सविस्तर अहवाल दाखल केला आहे. डिजिटल अरेस्टसारख्या ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकरणांना आळा घालण्यासाठी विविध स्तरांवर पावले उचलली जात असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. सरन्यायाधीश सुर्य कांत यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली. डिजिटल अरेस्ट प्रकरणांमधील पीडितांना नुकसान भरपाई देण्यासाठी आरबीआय, दूरसंचार विभाग आणि इतर एजन्सींना संयुक्तपणे एक आराखडा तयार करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. आय४सी, इलेक्ट्रानिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय(मैट) आणि दूरसंचार विभाग(डीओटी) यांनी व्यक्त केलेल्या चिंतेनंतर व्हॉट्सॲपने जानेवारी २०२६ मध्ये एक विशेष तपास मोहीम सुरू केली, असे ॲटर्नी जनरल आर. व्यंकटरमणी यांच्यामार्फत दाखल केलेल्या अहवालात म्हटले आहे. या मोहिमेदरम्यानव्हॉट्सॲप्ने १२ आठवड्यांत डिजिटल अरेस्टशी संबंधित ९४०० खात्यांवर बंदी घातली आहे.



# निवडणूक संपताच पेट्रोल-डिझेल महागणार?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशातील काही राज्यांमध्ये सुरू असलेल्या विधानसभा निवडणुका बुधवारी संपत आहेत. असे असतानाच, सोशल मीडियावर पेट्रोल आणि डिझेलच्या दरवाढीसंदर्भात चर्चा सुरू आहे. मात्र, आता केंद्र सरकारने या सर्व चर्चांना अथवा अंदाजांना पूर्णविराम दिला आहे. उद्या निवडणूक प्रक्रिया संपल्यानंतरही इंधन दरवाढीची कोणतीही योजना नाही, असे सरकारने स्पष्ट केले आहे. महत्वाचे म्हणजे, सरकारचे हे स्पष्टीकरण मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या तणावाने जागतिक तेल बाजारपेठेत अस्थिरता असताना आले आहे.

यासंदर्भात बोलताना पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या संयुक्त सचिव सुजाता शर्मा यांनी सांगितले, 'देशात एलपीजी, पेट्रोल आणि डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध आहे. कुठल्याही प्रकारच्या दरवाढीचे नियोजन नाही. नागरिकांनी घाबरून जाउ नये. काही ठिकाणी नागरिक भीतीपोटी आगाउ इंधन खरेदी करत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आपण राज्य सरकारांच्या संपर्कात आहोत.' सुजाता शर्मा यांनी माहिती दिली की, तेल कंपन्या सध्या पेट्रोलवर प्रति लिटर २० रुपये आणि डिझेलवर प्रति लिटर १०० रुपयांचा तोटा सहन करत आहेत,



तरीही कोणत्याही टंचाईविना पुरवठा करण्याला प्राधान्य दिले जात आहे. दरम्यान, आंध्र प्रदेशात इंधन टंचाईच्या भीतीने सोमवारी पेट्रोल पंपांवर लांबच्या लांब रांगा दिसून आल्या. याची दखल घेत मुख्यमंत्री चंद्रबाबू नायडू यांनी तेल कंपन्या आणि अधिका-यांना पुरवठा सुरळीत करण्याचे निर्देश दिले आहेत.

घरगुती एलपीजी आणि पीएनजी ग्राहकांसाठी १००% पुरवठा सुनिश्चित -

शर्मा पुढे म्हणाल्या, पश्चिम आशियातील संकटामुळे कच्चे तेल, एलपीजी आणि पाईप गॅसच्या (PNG) आयातीवर मोठा परिणाम झाला आहे. मात्र असे असले तरी, सरकारने उपाययोजना म्हणून आवश्यक पावलेही उचलली आहेत. घरगुती एलपीजी आणि पीएनजी ग्राहकांसाठी १००% पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे. याशिवाय, वाहतुकीसाठी वापरला जाणारा सीएनजीही सुरळीत आहे. व्यावसायिक एलपीजी पुरवठाही आता अंदाजे ७०% पर्यंत पूर्ववत झाला आहे. याच बरोबर, औषधनिर्माण, पोलाद, बियाणे आणि कृषी यांसारख्या अत्यावश्यक उद्योगांनाही प्राधान्य दिले जात आहे, जेने करून कुठल्याही प्रकारची मोठी समस्या निर्माण होणार नाही.

देशात २९ एप्रिलनंतर पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ होउ शकते, असा दावा काँग्रेस नेते आणि लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. निवडणुकीच्या काळात केंद्र सरकारने भाव स्थिर ठेवत असले तरी, मतदान प्रक्रिया पूर्ण होताच सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे, असे राहुल गांधी यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. पण, केंद्र सरकारने राहुल गांधींचे हे दावे फेटाळून लावले आहेत. सध्या विविध राज्यात सुरू असलेल्या निवडणुका संपल्यानंतर, विशेषतः २९ एप्रिलनंतर देशात पेट्रोल आणि डिझेलच्या दरात मोठी वाढ होउ शकते, असा (पान २ वर)




जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण :

# उजैर खानला २ मे पर्यंत पोलीस कोठडी

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा येथील गाजलेल्या लैंगिक शोषण प्रकरणात पोलिसांनी तपासाची गती वाढवली असून, आरोपी उजैर खान इकबाल खान याला न्यायालयाने २ मे २०२६ पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली आहे. तपासासाठी आरोपीची सखोल चौकशी आवश्यक असल्याचे सांगत पोलिसांनी न्यायालयात कोठडीची मागणी केली होती.

यापूर्वी या प्रकरणातील मुख्य आरोपी अयान याची पोलिसांनी कसून चौकशी केली होती. त्यानंतर न्यायालयीन प्रक्रियेनंतर त्याची जेल रवानगी करण्यात आली आहे. तसेच या प्रकरणाशी संबंधित दुसऱ्या गुन्ह्यातील उमेर खान यालाही पोलिसांनी पुन्हा ताब्यात घेतले होते, ज्यामुळे प्रकरणातील गुंतागुंत वाढल्याचे दिसून येत आहे. पोलिस सूत्रांच्या माहितीनुसार, या प्रकरणात आणखी काही धागेदोरे हाती लागण्याची शक्यता असून, आरोपींमधील संबंध, गुन्ह्याचे जाळे आणि इतर संभाव्य सहआरोपी यांचा शोध घेतला जात आहे. विशेषतः डिजिटल पुरावे, आर्थिक व्यवहार आणि संपर्क साखळी यांचा तपास सुरू आहे. या पार्श्वभूमीवर उजैर खानच्या पोलीस कोठडीदरम्यान महत्त्वाची माहिती समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# टँकरच्या चाकाखाली आल्याने दोन तरुण ठार

**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा–आमझरी मार्गावर सोमवारी सायंकाळी आणखी एक भीषण अपघात झाला. दर्शन करून परतणाऱ्या दोन तरुणांच्या मोटारसायकलला समोरून येणाऱ्या टँकरने जोरदार धडक दिली. या अपघातात दोघेही टँकरच्या चाकाखाली सापडून जागीच ठार झाले. धडक इतकी तीव्र होती की मोटारसायकलचे तुकडे उडाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून टँकर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जुळ्या शहरातील दुकाने रात्री ११ पर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी द्या

## आ.प्रवीण तायडे यांची उपविभागीय अधिकारी यांची मागणी

**अचलपूर/प्रतिनिधीः-** जुळ्या शहरात मुख्य बाजार पेठेतील व्यावसायिक प्रतिष्ठाने रात्री १० वाजता बंद करण्याचा पोलिस प्रशासनाच्या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिक व व्यापारी त्रस्त झाले असून या संपूर्ण प्रकरणाची माहिती व्यापाऱ्यांनी आ.प्रवीण तायडे यांच्या कडे मांडली.याची तत्काळ दखल घेत दिवसा उन्हाचा वाढता पारा आणि संध्याकाळी बाजारपेठेत ग्राहकाची वाढती गर्दी मुळे जुळ्या शहरातील दुकाने रात्री ११ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी पोलिस प्रशासनाने देण्याच्या मागणीचे निवेदन आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार यांना दिले आहे .या बाबत आ.प्रवीण तायडे यांनी परतवाडा पोलीस स्टेशनचे ठाणेदार सुरेश म्हस्के यांच्याशी सुद्धा चर्चा केली. यावर सकारात्मक निर्णय होणार असल्याची आशा व्यापारी वर्गात निर्माण झाली आहे.या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की,सध्या विदर्भातील अकोला, वर्धा, अमरावती जिल्ह्यासह परतवाडा-अचलपूर जुळया शहारामध्ये उन्हाळ्याचे तापमान हे सध्या ४६ अंश सेल्सियस पर्यंत पोहचले आहे. लग्न समारंभाचे दिवस असल्यामुळे व तापमान सुध्दा जास्त असल्यामुळे नागरीकांना दिवसभरात खरेदी - विक्री करणे शक्य



होत नसल्याचे चित्र आहे . विशेषतः दुपारच्या वेळेत उष्णतेमुळे मार्केटमध्ये गदी कमी राहते व व्यवसायावर परिणाम होत आहे. यामुळे शहरी व ग्रामीण भागातील ग्राहक हे खरेदीच्या दृष्टीने संध्याकाळी सात नतंरच जुळ्या शहरातील बाजारपेठेत खरेदीसाठी जातात. यामुळे १० पर्यंत दुकाने सुरू असल्याने या वेळेत ग्राहकांना खरेदी करणे शक्य होत नसल्याचे चित्र आहे. यामुळे ग्राहकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो .यामुळे बाजार पेठेतील दुकाने दहा ऐवजी रात्री अकरा वाजेपर्यंत सुरू राहिल्यास दुकानदार व ग्राहकांना मोठा लाभ होऊ शकणार असल्याचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. दुसरीकडे उन्हाळा संपला की पावसाळा आणि हिवाळ्यात व्यापाराची प्रतिष्ठाने ही ८- ९ या वेळातच बंद होतात. यामुळे जुळ्या शहरातील व्यापारी प्रतिष्ठाने ११ वाजेपर्यंत सुरू ठेवण्याची परवानगी पोलिस प्रशासनाने देण्याची मागणी आमदार प्रवीण तायडे यांनी अचलपूर पोलीस उपविभागीय अधिकारी शुभम कुमार यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.याबाबत पोलिस प्रशासन कोणता निर्णय घेतो ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावेळी भाजपा चे विशाल काकड,सुनील चौधरी,प्रफुल बर्वे,सतीश शर्मा,शंकर मालखेडे,सचिन कडू , जयकृष्णा तायडे,महेश कडू,अक्षय जनावरे, बंटी केजडीवाल, अविश कडू,कौस्तुभ मुंदे आदी उपस्थितीत होते.

# दारूच्या नशेत पतीकडून घराला आग

**अमरावती/प्रतिनिधीः-** फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत कल्याण नगर परिसरात एका व्यसनी पतीने स्वतःच्याच घराला आग लावल्याची घटना घडली असून, या आगीत घरातील संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पत्नीच्या तक्रारीवरून आरोपी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**संसारोपयोगी साहित्य जळून खाक**

मिळालेल्या माहितीनुसार, २६ एप्रिल रोजी रात्री साडेआठ वाजताच्या सुमारास संबंधित महिला काम आटोपून घरी परतल्या असता, घरासमोर अग्निशमन दलाची गाडी उभी असल्याचे दिसले. घरात प्रवेश करताच आगीने बेड, कपडे तसेच विजेचे वायरिंग पूर्णतः जळून खाक झाल्याचे स्पष्ट झाले. परिसरातील नागरिकांच्या माहितीनुसार, महिलेचा पती संदीप राऊत हा घटनेच्या वेळी दारूच्या नशेत होता. नशेत असताना माचीसशी खेळ करताना निष्काळजीपणामुळे घराला आग लागली. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण करत घरातील फर्निचर, कपडे आणि इलेक्ट्रिक उपकरणांचे मोठे नुकसान केले. घराचे मोठे नुकसान झाल्यानंतर पीडित पत्नीने पोलिसांत धाव घेत तक्रार नोंदवली. पतीच्या व्यसनाधीनतेमुळे आणि बेजबाबदार वर्तनामुळे ही घटना घडल्याचा आरोप त्यांनी केला आहे. पोलिसांनी संदीप राऊत याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.

पान १ व १० वरून

## धर्म विचारला, कलमा

होण्याची इच्छा व्यक्त केली होती. सूत्रांनुसार, या चिठ्ठ्यांमध्ये आरोपीने या हल्ल्याचे वर्णन दहशतवादी संघटनेत सामील होण्याच्या दिशेने टाकलेले पहिले पाउल असे केले होते. याव्यतिरिक्त, तपासात असे उघड झाले की आरोपी, झैब झुबेर अन्सारी, हा मुंबईतील कुर्ला परिसरात जन्मला आहे. तो विज्ञान शाखेचा पदवीधर असून २०१० ते २०१९ पर्यंत अमेरिकेत राहत होता. अमेरिकेत नोकरी न मिळाल्याने तो २०१९ मध्ये भारतात परतला आणि मीरा रोडवर एकटाच राहत होता.

जिथे तो ऑनलाइन केमिस्ट्रीचे वर्ग घेत असे. असे मानले जाते की, एकटे राहत असताना आरोपी इंटरनेटच्या माध्यमातून कट्टरपंथी बनला. सीमेपलीकडील कोणत्याही सूत्रधारांच्या तो थेट संपर्कात होता का, हे निश्चित करण्यासाठी तपास यंत्रणा आता त्याच्या मोबाईल फोन आणि लॅपटापमधील डिजिटल फुटप्रिंट तपासत आहेत.

**नेमकं काय प्रकरण आहे?-** मिळालेल्या माहितीनुसार, अस्मिता क्लबजवळ बांधकाम सुरू असलेल्या इमारतीत तैनात असलेले सुरक्षा रक्षक राजकुमार मिश्रा कर्तव्यावर होते. आरोपी तिथे आला आणि त्यांच्यात वाद झाला. आरोपीने मिश्रा यांच्यावर चाकूने अनेक वार केले. त्यांच्या मदतीला धावून आलेले दुसरे सुरक्षा रक्षक, सुब्रतो सेन, हे देखील या हल्ल्यात जखमी झाले.मुंबईतील मीरा रोडच्या नया नगर भागातील वाकहार्ट हास्पिटलच्या मागे बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या संरक्षणासाठी दोन सुरक्षा रक्षक तैनात करण्यात आले होते. सोमवारी संध्याकाळी, आरोपी झैब झुबेर अन्सारीने पीडित राजकुमार मिश्रा आणि सुब्रतो रमेश सेन यांना त्यांच्या धर्माबद्दल विचारले आणि नंतर त्यांना कलमा म्हणायला सांगितले. जेव्हा त्यांनी विरोध केला, तेव्हा आरोपीने सुरक्षा रक्षकावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात राजकुमार मिश्रा आणि सुब्रतो सेन दोघेही गंभीर जखमी झाले. सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने नयनगर पोलिसांनी दीड तासाच्या आत आरोपी झैब झुबेर अन्सारी (३१) याला अटक केली. दोन्ही सुरक्षारक्षकांवर सध्या वाकहार्ट रुग्णालयात उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वृत्त आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, ठाणे एटीएस आणि नयनगर पोलीस संयुक्तपणे तपास करत आहेत.

## झुबेरला हिंदूंना लक्ष्य

हल्ला करू इच्छित होता, म्हणूनच त्याने ही घटना घडवली.' मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, अनेक यंत्रणा या प्रकरणाचा तपास करत असून, तपास केवळ आरोपींपुरता मर्यादित न राहता, त्यापलीकडे जाउन कोणत्याही मोठ्या नेटवर्कचा शोध घेतला जाईल. ते म्हणाले, 'या प्रकरणाचा तपास सध्या एटीएस आणि एनआयए करत असून, राज्य सरकार या यंत्रणांना पूर्ण सहकार्य करत आहे. तपासाची व्याप्ती केवळ आरोपीपुरती मर्यादित राहणार नाही, तर त्याच्या कट्टरतावादामागे असलेल्या व्यक्ती किंवा नेटवर्कचीही तपासणी केली जाईल. कोणताही संभाव्य कट उघडकीस आणण्यासाठी संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास केला जाईल.'

महाराष्ट्र दहशतवादविरोधी पथकाने (एटीएस) २७ एप्रिल रोजी मीरा रोडच्या नया नगर भागातील अस्मिता ग्रँड मॅन्शनजवळ दोन सुरक्षा रक्षकांवर झालेल्या हल्ल्याची चौकशी सुरू केली आहे. सुरक्षा यंत्रणा या हल्ल्याला एका दहशतवादी हल्ल्याचा प्रकार मानत आहेत. महाराष्ट्र एटीएसच्या म्हणण्यानुसार, आरोपी जब्बार झुबेर अन्सारीने तेथे कर्तव्यावर असलेल्या दोन सुरक्षा रक्षकांना लक्ष्य केले. प्रत्यक्षदर्शींच्या दाव्यानुसार, आरोपीने आधी रक्षकांना पत्ता विचारला आणि नंतर परत येउन त्यांना त्यांचा धर्म विचारला. असाही दावा करण्यात आला आहे की, आरोपीने एका रक्षकाला इस्लामी कलमा म्हणण्यास भाग पाडले आणि त्याने नकार दिल्यावर, त्याने त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला केला. जखमी रक्षकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

## एकाच कुटुंबातील 3 ठार

असलेल्या किरण आणि चिमुकल्या दिया हिला वरूड येथील ग्रामीण रुग्णालयात नेत असताना त्यांनी वाटेतच प्राण सोडले. कार चालवणारे गोपाल समाधान नांदे (३४) हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

**मदतकार्य आणि तपास-** अपघाताचा आवाज ऐकताच खडका येथील सरपंच राहुल फुले आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. बेनोडा येथून तातडीने रुग्णवाहिका पाचारण करून जखमींना बाहेर काढण्यात आले. घटनेची माहिती मिळताच बेनोडा पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला आहे. अपघात नेमका कशामुळे झाला-तांत्रिक बिघाड की, चालकाला आलेली डुलकी-याचा तपास पोलीस करीत आहेत. एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

**दरदिवशी ४३ जणांचा मृत्यू-** राज्यात दररोज सरासरी १०३ रस्ते अपघात घडत आहेत. प्राणघातक अपघातांची संख्या दैनंदिन सुमारे ४० असून त्यामध्ये दरदिवशी ४३ जणांचा अपघाती मृत्यू होतो. परिवहन विभागाने दिलेल्या या वर्षी जानेवारी ते मार्च दरम्यानच्या आकडेवारीतून हे स्पष्ट झाले. मोठ्या संख्येने होणारे अपघात व त्यात होणारी प्राणहानी लक्षात घेता रस्ते वाहतुकीदरम्यान प्रवाशांच्या सुरक्षेवर मोठे प्रश्नचिन्ह लागले आहे. परिवहन विभागाने मात्र प्राणघातक अपघातांच्या संख्येत सात टक्क्यांनी, तर अपघाती मृत्युच्या संख्येत मागील वर्षीच्या तुलनेत आठ टक्क्यांनी घट झाल्याचा दावा केला

## ज्या कंपनीच्या विमानात अजितदादांचा

विमानाने कसा काय प्रवास केला? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आज पुण्याच्या मोदी बागेत राष्ट्रवादी काँग्रेसची एक महत्त्वाची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी पार्थ पवार यांनी मुंबई ते पुणे असा प्रवास केला. विशेष म्हणजे, हा प्रवास त्यांनी व्हीएसआर कंपनीच्या विमानाने केला. या प्रवासाचे फोटो आणि माहिती समोर येताच राजकीय चर्चा सुरू झाली आहे. व्हीएसआर ही तीच कंपनी आहे जिच्या सुरक्षा मानकांवर रोहित पवारांनी वारंवार प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

इतरांना प्रवास न करण्याचे आवाहन, भाउच ऐकेना

आमदार रोहित पवार यांनी गेल्या काही दिवसांपासून व्हीएसआर कंपनीच्या विमानांच्या सुरक्षेबाबत आक्रमक भूमिका घेतली आहे. व्हीआयपी व्यक्तींनी या कंपनीच्या विमानाने प्रवास करू नये, ते असुरक्षित आहे, असे आवाहन रोहित पवार सातत्याने करत असतात. मात्र, दुसरीकडे त्यांचेच बंधू आणि राज्यसभा खासदार पार्थ पवार यांनी त्याच कंपनीच्या विमानाने प्रवास केल्याने, रोहित पवारांच्या आवाहनाला त्यांनी जुमानले नाही, असा मेसेज गेल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

काही महिन्यांपूर्वी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा ज्या विमानाने अपघात झाला होता, ते विमान याच कंपनीचे होते. या अपघातानंतर सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला होता. रोहित पवारांनी याच मुद्द्यावरून सरकार आणि संबंधित कंपनीला धारेवर धरले होते. मात्र, आज पार्थ पवारांनी त्याच कंपनीच्या विमानातून प्रवास करून एक प्रकारे रोहित पवारांच्या आरोपांची धार बोथट केल्याची चर्चा आहे.

## भाजपकडून विधानपरिषदेसाठी

यांची भेट घेतली होती. प्रमोद जठार हे सिंधुदुर्गमधील भाजप नेते असून त्यांना भाजपकडून संधी देण्यात आली आहे.

भाजपने जाहिर केलेल्या ५ नावांमध्ये माधवी नाईक यांचेही नाव असून ते अनेक वर्षांपासून भाजप संघटनेत काम करतात. तर, संजय भेंडे भाजपचे उपाध्यक्ष असून ते नागपूर भाजपचे जिल्हाध्यक्ष राहिले आहेत. तसेच, प्रमोद जठार यांनाही भाजपने संधी दिली असून जठार हे कोकणातील भाजपचे महत्त्वाचे नेते आहेत. कोकणावर अन्याय होत असल्याची भावना भरुन काढण्याचा प्रयत्न भाजपकडून या उमेदवारीच्या माध्यमातून करण्यात आला आहे.

**कोण आहेत विवेक कोल्हे?-** कोल्हे परिवाराचे नगर जिल्ह्यात वर्चस्व मानले जाते. विवेक कोल्हे हे ज्येष्ठ नेते शंकरराव कोल्हे यांचे नातू तर माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांचे चिरंजीव आहेत. अहिल्यानगरमधील कोपरगावात काळे-कोल्हे असा जुना संघर्ष आहे. विधानसभा निवडणुकीवेळी आशुतोष काळे यांना राष्ट्रवादी काँग्रेसनं कोपरगावमधून संधी दिल्यानंतर भाजपकडून कोल्हे यांना महायुतीचा धर्म पाळण्याचे आदेश दिले होते. विवेक कोल्हे यांनी काल रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. वाढदिवसानिमित्ताने ही भेट घेतली असल्याची सूत्रांची माहिती होती.

**नागपूरच्या संजय भेंडे यांना संधी-** नागपूरचे संजय भेंडे भाजपचे अनेक वर्षांपासूनचे कार्यकर्ते आहे. सध्या ते भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष आहेत. यापूर्वी त्यांनी जिल्हा स्तरापासून भाजपच्या संघटनेत अनेक पद भूषविली आहेत. नागपूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीमध्ये ते नेहमीच नितीन गडकरी यांचे निवडणूक प्रमुख राहिले आहे. याशिवाय ते सहकार चळवळीतही सक्रीय असून नागपूर नागरी सहकारी बँकेचे संचालक राहिले आहे. भाजपने यंदा विधानपरिषदेची संधी देत त्यांच्या पक्षाप्रती कार्याचा सन्मान केला आहे.

**पोटनिवडणुकीसाठी प्रज्ञा सातव यांना उमेदवारी-** काँग्रेसच्या विधानपरिषदेच्या आमदारकीचा राजीनामा देत प्रज्ञा सातव भाजपमध्ये दाखल झाल्या होत्या. त्यांच्या रिक्त जागेवर भाजपनं त्यांना उमेदवारी दिली आहे. भाजप कोणाला उमेदवारी देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. विधान परिषदेत जाण्यासाठी अनेक जण इच्छुक होते. विद्यमान आमदारांपैकी एकाला संधी देण्यात आलेली नाही. काँग्रेसमधून भाजपमध्ये आलेल्या प्रज्ञा सातव यांना मात्र संधी देण्यात आली आहे. त्यांच्याच जागेवर होत असलेल्या पोटनिवडणूकीसाठी त्या आता भाजपच्या उमेदवार असतील. बाजी चार चेहरे हे नवीन आहेत. जुन्या चेह-यांना संधी मिळाली नाही. पुन्हा एकदा केशव उपाध्ये आणि माधव भांडारी यांच्या पदरी निराशा आली आहे.

## भारत-चीन हवाई सेवेचा

सुधारण्याच्या दिशेने एक व्यावहारिक पाउल आहे. या हवाई कनेक्टिव्हिटीच्या पुनरुज्जीवनामुळे भारत आणि चीनमधील आर्थिक संबंधांची एक नवीन पहाट सुरू झाल्याचे मानले जात आहे. यामुळे केवळ उद्योगपतींनाच नाही, तर शिक्षण आणि पर्यटनासाठी प्रवास करणा-या नागरिकांनाही मोठा दिलासा मिळाला आहे.

## सलीम डोला तुर्कस्तानमधून

ठेवले होते.

**५,००० कोटी रुपयांचे अमली पदार्थांचे साम्राज्य-** डोलाचे संबंध थेट दाउद इब्राहिमच्या नेटवर्कशी जोडलेले आहेत. तो भारतात अमली पदार्थांच्या पुरवठ्याचे एक मोठे जाळे चालवत होता. जागतिक सिंथेटिक ड्रग नेटवर्कमध्ये सलीम डोलाचे नाव प्रमुख मानले जाते. त्याचे ड्रग सिंडिकेट दरवर्षी ५,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचा अवैध व्यापार करत होते.

## सर्वच पक्षाचे उमेदवार

गुरुवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शक्यता आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार महायुतीतील भाजपा पाच, शिवसेना २ व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट एक जागा लढवण्याची शक्यता आहे. भाजपच्या प्रदेश शाखेने केंद्रीय समितीकडे १३ नावांची शिफारस केली आहे. भाजपकडून प्रज्ञा सातव, संजय केणेकर, माधवी नाईक, राजेंद्र फडके,राम सातपुते, रणजितसिंह निंबाळकर, अर्चना दयाशंकर तिवारी, उपेंद्र कोठेकर यांची नावे चर्चेत आहेत. शिवसेना शिंदे गटाचे दोन उमेदवार रिंगणात उतरणार असून विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गो-हे यांना पुन्हा संधी मिळण्याची शक्यता आहे. दुस-या जागेसाठी शीतल म्हात्रे, बच्चू कडू यांचे नाव आघाडीवर आहे. राष्ट्रवादी अजित पवार गट एक जागा लढवणार असून तब्बल ७५ जणांनी यासाठी रांग लावली आहे.

## निवडणूक संपताच पेट्रोल

दावा काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. तेल स्वस्त असताना मोदी सरकारने फायदा करुन घेतला पण, आता तेल महाग झाल्यानंतर जनतेवर भार टाकला जात आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

**राहुल गांधी नेमकं काय म्हणाले-** निवडणुकीच्या काळात दिलेली सूट समाप्त झाली, आता महागाईचा तडाखा बसणार. २९ एप्रिलनंतर पेट्रोल आणि डिझेल दोन्ही महाग होणार आहेत. जेव्हा तेल स्वस्त होते, तेव्हा मोदी सरकारने नफा स्वत?कडे ठेवला होता. आता ते महाग झाले आहे, म्हणून ते त्याचा बोजा तुमच्यावर टाकला जाणार आहे. सरकारने स्वस्त दरांच्या नावाखाली लूटमार केली, ते आता महागाईचा बोजा जनतेवर टाकत आहे, अशी एक्स पोस्ट राहुल गांधी यांनी केली आहे.

**सरकारने दावा फेटाळला-** दरम्यान, केंद्र सरकारने राहुल गांधी यांनी केलेल्या इंधन दरवाढीचे दावे फेटाळून लावले आहेत. सध्या इंधन दरवाढीचा असा कोणताही विचार नाही. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किमती आणि इतर तांत्रिक बाबींवरूनच दरांचा निर्णय घेतला जातो, निवडणुकांशी त्याचा संबंध जोडणे चुकीचे आहे, असे सरकारी सूत्रांनी आणि संबंधित मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

**निवडणूक आणि आरोप -प्रत्यारोप**

पश्चिम बंगाल आणि इतर राज्यांमधील निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधी यांनी पेट्रोल आणि डिझेल दरवाढीवर भाष्य केले आहे. पण, निवडणुकीनंतर पेट्रोल-डिझेल महाग होईल अशी राहुल गांधी यांनी व्यक्त केलेली शक्यता सरकारने नाकारली आहे

## अनैतिक संबंधाच्या संशयातून

गुंठे यांनी तत्काळ वडगाव जंगल पोलिसांना कळविले. ठाणेदार विकास दांडे यांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला आणि आरोपी पांडुरंग कांबळे याला तात्काळ अटक केली.

मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी यवतमाळ येथे पाठविण्यात आला असून,या प्रकरणाचा पुढील तपास वडगाव जंगल पोलिस स्टेशनचे ठाणेदार विकास दांडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## अंबादेवी मार्गावर ७ लाखांचा

गुटका भरलेले १२ पोते (कि. ६ लाख ९१ हजार २००), १ मोबाईल (कि.१०हजार), ८ लाखाचे वाहन असा ऐकून १५ लाख १ हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.या प्रकरणात वाहन मालक ,चालक आणि इतरांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## मराठा साम्राज्य सन्मान महामोर्चा

साम्राज्याने उत्तर भारतात प्रभावी वर्चस्व प्रस्थापित केले होते. पेशवे दप्तर, महसूल नोंदी व समकालीन अभिलेखामध्ये राजस्थान, मालवा, बुंदेलखंड, दिल्ली व पंजाब प्रदेशातील मराठ्यांचे अधिराज्य स्पष्ट आहे. चौथ व सरदेशमुखी वसुली ही अधिराज्याची मान्यता प्राप्त चिन्हे होती. अजमेर, ग्वाल्हेर सारख्या रणनीती ठिकाणी मराठा सरदारांची प्रत्यक्ष उपस्थिती होती. संबंधित प्रदेशात मराठा प्रभाव क्षेत्र येत होते हे निर्विवाद आहे. सन १७५९ चा मराठा साम्राज्याचा नकाशा तात्काळ पुन्हा स्थापित करण्यात यावा. तज्ञ इतिहासकारांची स्वतंत्र समिती नेमण्यात यावी. सर्व बदलांची कारण मीमांसा सार्वजनिक करण्यात यावी. अभ्यासक्रम बदलासाठी पारदर्शक प्रक्रिया निश्चित करण्यात यावी. केंद्र सरकारने तात्काळ हस्तक्षेप करून स्पष्टीकरण द्यावे. या मागण्यांसाठी मोर्चा काढण्यात येत आहे. मोर्चा नंतर पुढील आंदोलनाची दिशा ठरविण्यात येणार आहे. पत्रकार परिषदेमध्ये अभिषेक दीक्षित, अतुल खोंड, मानव बुद्धदेव, महेश लढके, प्रज्वल निंगोट ,यश दहीहंडे आदि उपस्थित होते.

## अमरावतीत अस्तित्वात येणार

ते कार्य करतील. जिल्ह्यातील प्रत्येक ठाण्यामध्ये मुलांसाठी बालस्नेही वातावरण तयार करण्यात येणार आहे. जे मुलांसाठी उपयोगी ठरेल. एक महत्त्वपूर्ण बदल पोलिसिंग मध्ये हा करण्यात आला आहे. गेल्या वर्षभरात शंभर पेक्षा अधिक प्रकरण लैंगिक शोषण आणि विनयभंगाचे दाखल झाले आहे. यामध्ये ७५% प्रकरणात तपास पूर्ण करून दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणांमध्ये ही अल्पवयीन मुलांची संख्या अधिक आहे. अल्पवयीन मुलांशी जुळलेल्या प्रकरणात त्वरित न्याय मिळावा, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

## डफरीन परिसरातून दुचाकी

गुन्हयाची कबुली दिली आणि दुचाकी शिंगणवाडी येथील शेतात बनावट नेमप्लेट लावून लपून ठेवल्याचे सांगितले.डिबी पथकाने तेथे जाऊन दुचाकी जप्त केली. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, सहायक आयुक्त शिवाजीराव बचाटे, गाडगे नगरचे पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईमची निरीक्षक विजया पंधरे, समाधान वाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली गाडगे नगर डीबी पथक प्रमुख उपनिरीक्षक सागर ठाकरे, अमलदार प्रकाश मेश्राम, निलेश जुनघरे, अमोल यादव, विनोद मालवे, आशिष ठाकरे, सिद्धार्थ शृंगारे, सचिन गारखेडे यांनी कारवाई केली.

## नप्र.सफाई कामगार धडकले

२१९ रुपयांचे आर्थिक नुकसान होत आहे. अश्या तक्रार वजा निवेदनात थकीत व फरकाची रक्कम तात्काळ मिळावी,संस्थेच्या आर्थीक व्यवहाराची तपासणी करण्यात यावी,प्रकरणात सखोल चौकशी पूर्ण होईपर्यंत निर्मल ग्राम विकास बहुउद्देशीय संस्थेच्या ठेकेदाराचे सर्व बिल थांबवण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली आहे. कामगारांच्या हक्कासाठी करण्यात आलेल्या या मागणीमुळे अंजनगाव सुर्जी परिसरात चर्चेला उधाण आले आहे. शासन निर्णयानुसार वेतन न मिळाल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे. आता जिल्हा प्रशासन या प्रकरणात काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. कंत्राटदार जुबैर यांच्याशी सफाई कामगारांच्या मजुरीदरा बाबत विचारना केली असता कंत्राटदार जुबैर यांनी सदर कामकाज माझे कडेच आहे .या बाबत विभाग प्रमुख मिलींद वानखडे यांचेशी बोला असे म्हणुन याबाबत चर्चा करण्यास नकार दिला.

## मोर्शीच्या व्यापाऱ्याला १७८१

यांचे अपहरण केले आणि जबरीने माल विकण्याच्या नोटरीवर त्यांच्या स्वाक्षरी घेतल्या. त्यांच्या जवळून कोरे धनादेशही आरोपी यांनी घेऊन घेतले आणि पळाले. या प्रकरणात अलीम खान यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी सोमवारी रात्री गुन्हा दाखल केला. आरोपी मो.साजीद सह ९ आरोपीनांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## जिल्ह्यात एकाच महिन्यात

या कारवाईमुळे संबंधित बालकांचे शिक्षण, आरोग्य व सुरक्षित भविष्य जपण्यात मदत झाली असून, समाजात सकारात्मक संदेश पोहोचला आहे. बालविवाह प्रतिबंधक कायद्याअंतर्गत बालविवाह करणे हा दंडनीय गुन्हा असल्याचे प्रशासनाने पुन्हा अधोरेखित केले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरात बालविवाह होत असल्याची माहिती मिळाल्यास त्वरित १०९८ चाईल्ड हेल्पलाईन किंवा जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा. बालविवाहमुक्त समाज घडविण्यासाठी सर्वांनी सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहनही जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे विद्यापीठ

भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवास करताना आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. उष्माघात, थकवा व डिहायड्रेशन यासारखे आजार होत आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा विचार करता, विद्यापीठाद्वारा सुरू असलेल्या व नियोजित परीक्षांचे वेळापत्रक हे सकाळी ७ ते ११ या सत्रात घेण्याची आवश्यकता असल्याचे अमोल देशमुख यांनी नमूद केले आहे. या बदलामुळे विद्यार्थ्यांना उष्णतेचा त्रास कमी होऊन ते अधिक चांगल्या प्रकारे परीक्षा देऊ शकतील, असे त्यांनी स्पष्ट केले. तरी विद्यापीठ प्रशासनाने या बाबीचा गांभीर्याने विचार करून तातडीने योग्य निर्णय घ्यावा अशी मागणी विद्यापीठाचे सिनेट सदस्य अमोल देशमुख यांनी केली आहे.

## जिल्हा युवा पुरस्कार जाहीर

आहे. सन २०२४-२५ या वर्षासाठी 'विशेष जिल्हा युवा पुरस्कार' नाळ चित्रपट फेम बालकलाकार श्रीनिवास गणेश पोकळे याला जाहीर झाला आहे. श्रीनिवासने आपल्या अभिनयाने दोन राष्ट्रीय पुरस्कार मिळवून जिल्ह्याचा नावलौकिक वाढविला आहे. याच वर्षासाठी युवक गटातून अमर पुरुषोत्तम वानखडे (तिवसा), युवती गटातून जानव्ही राउत (नया वाठोडा) तसेच संस्था गटातून श्री. संताजी बहुउद्देशीय शिक्षण संस्था (गुरुकुंज आश्रम) यांची निवड करण्यात आली आहे. या सर्वांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा प्रचार, व्यसनमुक्ती, रक्तदान आणि आदिवासी विकास क्षेत्रात मोलाचे कार्य केले आहे. सन २०२५-२६ या वर्षासाठी युवक गटात समाजप्रबोधनकार वेदांत मुंदाने (अमरावती), युवती गटात पुजा गुंजरकर (ब्राम्हणवाडा थडी) आणि संस्था गटात स्वामी विवेकानंद विचार मंच (अचलपूर) यांना पुरस्कार जाहीर झाले आहेत. वेदांत मुंदाने यांनी कीर्तनाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले आहे, तर पुजा गुंजरकर यांनी स्वसंरक्षण प्रशिक्षण आणि पर्यावरण क्षेत्रात योगदान दिले आहे. अचलपूरच्या विवेकानंद विचार मंचने आरोग्य सेवा आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केले आहे. युवक व युवती पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व १० हजार रुपये रोख, तर संस्था पुरस्काराचे स्वरूप स्मृतीचिन्ह, प्रमाणपत्र व ५० हजार रुपये रोख असे आहे.

# जनमाध्यम

अकोला | वाशिम | बुलढाणा

■ बुधवार २९ एप्रिल २०२६ ■ मुल्य ३.०० ■ पृष्ठे ४

एक प्रतिष्ठित सवय

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## रॉडने हल्ला ; जीवे मारण्याचा प्रयत्न दोघा विरुद्ध गुन्हा दाखल

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

शिरपूर फाटा परिसरात किरकोळ कारणावरून दोन जणांनी एका युवकावर रॉडने जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे या प्रकरणी मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी उमेश विश्वनाथ तारे (वय ३५,व्यवसाय डॉक्टर, रा.जाट गल्ली, मालेगाव) हे आपल्या मित्रासोबत जेवण करून स्कुटीने घरी जात असताना २६ एप्रिल रोजी रात्री सुमारे १० वाजताच्या सुमारास शिरपूर फाटा येथे ही घटना घडली दरम्यान,आरोपी अनिकेत रमेश शिंदे व विनय गजानन सौभागे (दोन्ही रा.मालेगाव) हे मोटर सायकलवर येऊन कोणतेही ठोस कारण नसताना फिर्यादीच्या मित्रावर लोखंडी रॉडने डोक्यावर वार करत मारहाण केली त्यानंतर फिर्यादीने स्कुटी पळवून नेण्याचा प्रयत्न केला असता आरोपींनी पाठलाग करत स्कुटीला धक्का देऊन खाली पाडले यानंतर 'जिवाने मारून टाका' अशी धमकी देत आरोपींनी पुन्हा रॉडने बेदम मारहाण केली या हल्ल्यात आशुतोष विष्णू कंकाळ (रा.मालेगाव) हे गंभीर जखमी झाले असून त्यांना ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे घटनेनंतर जखमी बेशुद्ध पडल्याने तो मरण पावल्याचे समजून आरोपी घटना स्थळावरून मोटर सायकलने पसार झाले या घटनेची तक्रार उशिरा रात्री दाखल करण्यात आली असून पोलिसांनी तत्काळ गुन्हा नोंद केला आहे य प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलिसांनी आरोपींना लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी होत आहे.

## स्थानिकांना प्राधान्य देत उद्योगवाढ व निर्यातीतून जिल्ह्याची प्रगती साधू - जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर

■ प्रतिनिधी | वाशिम ■



### जिल्हा उद्योग मित्र समिती सभा

जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला गती देत स्थानिक युवकांना अधिकाधिक रोजगार उपलब्ध करून देणे आणि निर्यातवाढीच्या माध्यमातून आर्थिक प्रगती साधणे, हे प्रशासनाचे प्रमुख ध्येय असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. उद्योग, रोजगार, एक जिल्हा एक उत्पादन व निर्यात प्रोत्साहनासंदर्भात आयोजित जिल्हा उद्योग मित्र समिती सभेत ते बोलत होते. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक पूनम घूले, एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र जाधव, एम आयडीसी कार्यकारी अभियंता केदार पवार, एडीटीपी राजय साबळे, एम एस ईडीसीएलचे कार्यकारी अभियंता विनोद मालवी, ईवाय सल्लागार अंकित गुप्ता, सनदी लेखापाल पंकज अग्रवाल, आयटीआय प्रतिनिधी निलेश झोडपे, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक यशवीर कुमार तसेच एमआयडीसी असोसिएशनचे सदस्य उपस्थित होते.

**एमआयडीसीत पायाभूत सुविधा सक्षम करण्यावर भर**

सभेच्या प्रारंभी एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगवाढ आणि मूलभूत सुविधांवर सविस्तर चर्चा झाली. औद्योगिक परिसरातील रस्ते, पाणीपुरवठा व वीज यांसारख्या सोयी अधिक सक्षम करण्यासाठी प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना दिले.

**स्थानिकांना ८० टक्के रोजगाराचा आग्रह**

उद्योगांनी किमान ८० टक्के रोजगार स्थानिक युवकांना देण्यासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. यासाठी उद्योगांशी समन्वय अधिक प्रभावी करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**प्रेंटीशीपमधून कौशल्यविकास**

प्रेंटीशीप योजने अंतर्गत सुरू असलेल्या जनजागृती मोहिमेचा आढावा घेण्यात आला. अधिकाधिक युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण देऊन रोजगारक्षम बनविण्यावर भर देण्यात आला. निर्यात व एक जिल्हा एक उत्पादन उपक्रमाला चालना एक जिल्हा एक उत्पादन (वन डिस्ट्रिक्ट वन प्रॉडक्ट) उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्यासाठी ठोस उपाययोजनांवर चर्चा झाली. स्थानिक उद्योग, उद्योजक व शेतकरी उत्पादक गटांना निर्यात प्रक्रियेचे मार्गदर्शन, गुणवत्ता मानके, ब्रँडिंग व पॅकेजिंग सुधारणा यावर विशेष भर देण्यात आला. निर्यातक्षम उत्पादनांची निवड, प्रशिक्षण कार्यशाळा व जनजागृती कार्यक्रम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. सीए पंकज अग्रवाल यांनी 'मिलाप' पोर्टलवरील अर्ज प्रक्रियेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सभेचे सादरी करण पूनम घूले यांनी केले. जिल्ह्यात औद्योगिक विकासा सोबत स्थानिकांना अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी यावेळी सांगितले.

## माणुसकीतून केलेले कार्यच खरे सत्कर्म - प्रा. प्रकाश कापुरे

■ प्रतिनिधी | वाशीम ■

शहरातील ऐतिहासिक माऊली वृद्धाश्रमात निराश्रीत दत्तक कन्या योगेश्वरी हिच्या विवाहानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या प्रसंगी प्रांजली व पंकज पाटील या दांपत्याने समाजासमोर एक प्रेरणादायी आदर्श उभा करत, योगेश्वरीचा विवाह सुशिक्षित कुटुंबातील युवक योगेश याच्याशी लावून दिला.



या आगळ्यावेगळ्या विवाह सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये आयपीएस अधिकारी अभिनव अग्रवाल, तहसीलदार रंजना गोरे, जिल्हा पुरवठा अधिकारी कल्पना चौधरी, मालेगावचे ठाणेदार राजेश खडसे यांच्यासह अनेक मान्यवर सहभागी झाले होते. नातेसंबंधांच्या पलीकडे जाऊन केवळ माणुसकीच्या भावनेतून उभारलेला हा सोहळा विशेष ठरला. विविध जाती-धर्मातील शेकडो नागरिकांनी उपस्थित राहून नवदांपत्याला शुभाशीर्वाद दिले. जोशी सरांच्या संगीतमय ऑर्केस्ट्रा व भावगीतांनी कार्यक्रमाला वेगळीच रंगत आणली. या उपक्रमामुळे मालेगाव शहरासाठी हा सोहळा एक ऐतिहासिक पर्वणी ठरला. कार्यक्रमाला विविध प्रसार माध्यमांनीही उपस्थित राहून मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल प्रांजली व पंकज पाटील यांनी सर्व उपस्थित मान्यवर व नागरिकांचे आभार मानले. कन्यादान करताना 'हेच खरे पुण्यकर्म' असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## गोमातेचा सन्मान ;हिरवा चारा देऊन उपक्रम साजरा - मारवाडी युवा मंच

■ प्रतिनिधी शेलुबाजार ■

येथून जवळच असलेले तराळा येथे मारवाडी युवा मंच शेलूबाजार शाखेच्या नव्या कार्यकारिणीचा शुभारंभ गौ सेवेद्वारे करण्यात आला.



दि.२७ एप्रिल २०२६ रोजी गौ सन्मान दिनाच्या निमित्ताने गौमातेला हिरवा चारा व गूळ असे खाद्य देऊन हा उपक्रम साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम श्री आनंद ऋषी गौरक्षण तराळा येथील गौशाळेत संपन्न झाला. या कार्यक्रमास शाखा मार्गदर्शक श्री मनोजजी अग्रवाल तसेच मारवाडी संमेलनचे श्री राजेशजी भांगडीया यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शेलू बाजार शाखेचे नवे अध्यक्ष श्री कृष्णा भांगडीया. सचिव शुभम बाहेती, कोषाध्यक्ष CA प्रणव गोठी.तसेच श्री मिठूलाल मालपाणी आणि डॉ. रिखबचंदजी कोठारी यांच्यासह सर्व सदस्यांनी गौसेवेत सहभाग नोंदवला. कार्यक्रम अत्यंत उत्साहात व भक्तिभावाने पार पडला.सर्वांनी उपस्थितीत दर्शविली व कार्यक्रम संपन्न करण्यात.

## रिठद ते ढोरखेडा रस्त्याची दुरावस्था!

■ प्रतिनिधी | रिसोड ■

तालुक्यातील रिठद ते ढोरखेडा रस्त्याचे काम दोन वर्षाच्या अगोदर सुरू झाले त्याचे डांबरीकरण केले परंतु पाहिजे तसे डांबरीकरण झाले नाही ते तात्काळ दोन महिन्यापासून उखडणे चालू झाले.

त्यानंतर यावर्षी त्याच्यावर संपूर्ण डांबरीकरण पूर्ण होईल असे त्यावेळी सांगण्यात आले. व जनतेची समाधान झाले. पण तेव्हापासून आता उन्हाळा संपायची वेळ आली पावसाळा लागायची वेळ आली तरीही संपूर्ण डांबरीकरण झाले नाही व या रस्त्यावरील पुलाचे कामही पूर्णता झाली नाही. अनेक जागेवर अर्धवट पाईप टाकून त्याचे बांधकाम करण्यात आले नाही आत्तापर्यंत काम करायला सवड होती व वेळही होता व पाऊसही नव्हता मग अडचण नव्हती तर काम कसे आणले हा महत्त्वाचा प्रश्न जनतेसमोर आहे. या रस्त्याचे संपूर्णता डांबरीकरण उखडून गेल्याने नागरिक त्रस्त झाले याबाबत मुख्यमंत्री सडक योजनेच्या अधिकाऱ्यांनी दखल घ्यावी व दिलेले आश्वासनाचे पूर्तता करावी हे काम पावसाळा लागण्या अगोदर निदान वीस पंचवीस दिवसा पूर्वी पूर्ण करावे अशी नागरिकांची अपेक्षा आहे. अशी रिठद व ढोरखेडा गावातील नागरिकांची मागणी आहे.

## सोयाबीन काढणीनंतरच्या तंत्रज्ञानावर एकदिवसीय कार्यशाळा यशस्वी

■ प्रतिनिधी | वाशीम ■

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे, राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे तथा वाशिम जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार, दिनांक २८ एप्रिल २०२६ रोजी कृषि विज्ञान केंद्र, करडा येथे 'सोयाबीन काढणीनंतरचे तंत्रज्ञान' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर. एल. काळे हे होते, तर उद्घाटक म्हणून कृषी उत्पन्न बाजार समिती, मंगरूळपीरचे सचिव श्री. गणेश शर्मा उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था, तळेगाव दाभाडे येथील सहायक व्यवस्थापक अजय नागवडे, राजेश नाफडे व बाजीराव दगडे उपस्थित होते. तसेच मार्गदर्शक म्हणून कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ डॉ. एस. के. देशमुख, टी. एस. देशमुख, शुभांगी वाटाणे व मयूर देशमुख यांनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व स्वागत समारंभाने करण्यात आली. प्रास्ताविकात राजेश नाफडे यांनी राष्ट्रीय सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्थेच्या कार्यपद्धतीची माहिती देत सोयाबीन काढणी नंतरचे व्यवस्थापन, मूल्यवर्धन, गुणवत्ता निकष, प्रतवारी (ग्रेडिंग), पॅकिंग व बाजारपेठीय संधी याबाबत सविस्तर विवेचन केले. अध्यक्षीय भाषणात डॉ. आर. एल. काळे यांनी आगामी खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कमी खर्चातील शाश्वत शेती पद्धती, पीक फेरपालट, घरगुती बियाणे निर्मिती, सोयाबीन : गुणवत्ता निकष, ग्रेडिंग, पॅकिंग तंत्रज्ञान व विपणन, नैसर्गिक शेती, बीजोत्पादन तंत्रज्ञान तसेच शेतकरी हक्क कायद्यांतर्गत उपलब्ध संधी याविषयी मार्गदर्शन केले. याशिवाय कृषि विज्ञान केंद्राच्या विविध तंत्रज्ञान प्रसार उपक्रमांची माहिती देत शास्त्रोक्त शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. तांत्रिक सत्रात कृषी विषय तज्ज्ञ देशमुख यांनी सोयाबीन पिकाचे एकात्मिक व्यवस्थापन, गंधकयुक्त खतांचा संतुलित वापर, सरी-वरंबा पद्धतीने लागवड, काढणीनंतर वैज्ञानिक साठवणूक, धान्य प्रतवारी व गुणवत्तेनुसार विक्री व्यवस्थापन याबाबत सखोल मार्गदर्शन केले.गृहविज्ञान तज्ज्ञ शुभांगी वाटाणे यांनी सोयाबीन प्रक्रिया व मूल्यवर्धन या विषयावर मार्गदर्शन करत सोयाबीनपासून दूध, पीठ, टोफू, वडी, फरसाण आदी उत्पादने प्रात्यक्षिकाद्वारे तयार करून दाखविले. तसेच सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगासाठी उपलब्ध बाजारपेठीय संधी व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग उन्नयन योजना (इश्इई) याबाबत माहिती दिली. कार्यक्रमा दरम्यान उपस्थित शेतकऱ्यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या प्रक्षेत्रावरील सोयाबीन प्रक्रिया युनिटला भेट देऊन प्रत्यक्ष प्रात्यक्षिके पाहिली. शेतकऱ्यांनी विचारलेल्या विविध तांत्रिक शंकांचे समाधान तज्ज्ञांनी केले. या कार्यशाळेस कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यक्षेत्रातील शेतकरी, महिला बचतगट सदस्य तसेच ग्रामीण युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला राम देशमुख, दत्ता काळे, गंगाधर काळे व अर्चना कदम यांचे सहकार्य लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. एस. के. देशमुख यांनी केले.

## लग्न घरांमध्ये विवाहपूर्व धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल; कुटुंबियांमध्ये आनंदाचे उधाण

■ प्रतिनिधी | मानोरा ■

शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या लग्नसराईचा हंगाम जोरात सुरू असून विवाह वेदीवर चढण्याआधी उपवर आणि वधूंसाठी पूर्वापार चालत आलेला हळदीचा धार्मिक विधी मोठ्या उत्साहात पार पडत आहे. आप्तेष्टांच्या उपस्थितीत पारंपरिक पद्धतीने हा सोहळा साजरा होत असून लग्न घरात आनंदाचे आणि मंगलमय वातावरण पाहायला मिळत आहे.



उपवर तरुणाला हळदीच्या विधीसाठी घराच्या मध्यभागी बसवण्यात आले आहे. समोर रांगोळी आणि फुलांनी सजवलेली सुंदर पाट, त्यावर हळद-कुंकू, अत्तर, फुले, दिवे, सुपारी आणि इतर पूजेचे साहित्य मांडण्यात आले आहे. भिंतीवर 'मंगलाष्टक' असा फलक लावून मंगलमयतेचा संकेत देण्यात आला आहे. हळदीचा कार्यक्रम हा लग्नापूर्वीचा एक महत्त्वाचा आणि शुभ मानला जाणारा विधी आहे. हळद लावल्याने शरीराला शुभता, शुद्धी आणि सौंदर्य प्राप्त होते, अशी मान्यता आहे. यामध्ये नातेवाईक आणि मित्र परिवार उपवर वधूला हळद लावून त्यांना शुभाशीर्वाद देतात. मानोरा तालुक्यात सध्या लग्नांची लगबग सुरू आहे. लग्न घरात हळदी, संगीत आणि इतर मंगलकार्यांचे आयोजन होत आहे. ढोल-ताशांच्या गजरात आणि पारंपरिक गाण्यांसह हा सोहळा साजरा केला जात आहे. तरुण पिढीनेही आधुनिकते सोबत पारंपरिक रीतिरिवाज जपण्याचा प्रयत्न केल्याने हा उत्साह अधिकच वाढला आहे.'हळदीचा कार्यक्रम हा केवळ धार्मिक विधी नसून नातेवाईक एकत्र येण्याचे आणि आनंद वाटून घेण्याचे माध्यम आहे. या कार्यक्रमामुळे गावात एकोपा आणि आपुलकी वाढते,' अशी भावना स्थानिकांनी व्यक्त केली आहे.

## वाशिममध्ये निःशुल्क दंत तपासणी शिबिर नागरिकांना लाभ घेण्याचे आवाहन

### प्राचार्य प्रशांत गडेकर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक उपक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील सिव्हिल लाईन परिसरात निःशुल्क दंत तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. श्री दिगंबर जैन महासमिती विदर्भ उपाध्यक्ष तथा ग्राहक संरक्षण संघटना विदर्भ अध्यक्ष प्राचार्य प्रशांत गडेकर यांच्या ४५ व्या वाढदिवसानिमित्त हा सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे.



या शिबिरात तज्ञ डॉक्टरांकडून नागरिकांची मोफत दंत तपासणी करण्यात येणार असून आवश्यक रुग्णांचे एक्स-रेही विनामूल्य काढले जाणार आहेत. तसेच गरजू व्यक्तींना मोफत औषधांचे वितरणही करण्यात येणार आहे. या उपक्रमाचे आयोजन जिल्हाध्यक्ष प्रताप नागरे यांच्या नेतृत्वात करण्यात आले आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी उपस्थित राहणार असून उद्घाटक म्हणून प्रशांत गडेकर व जिल्हा माहिती अधिकारी श्वेता पोटूडे-राऊत उपस्थित राहतील. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाह, सहाय्यक आयुक्त प्रवीण खंडारे, प्रदेश अध्यक्ष निलेश सोमानी, राष्ट्रीय अध्यक्ष संजय पाठक, विदर्भ अध्यक्ष अभिनंदन पेंढारी तसेच विजय नवघरे यांची उपस्थिती लाभणार आहे.या कार्यक्रमाचे आयोजन ॲड. श्रुता गडेकर व जिल्हाध्यक्ष प्रताप नागरे यांनी केले असून संघटनेच्या पदाधिकाऱ्यांकडून नियोजन करण्यात आले आहे. विविध प्रशासकीय अधिकारी व श्री दिगंबर जैन महासमितीचे पदाधिकारीही उपस्थित राहणार आहेत. आजच्या धावपळीच्या जीवन शैलीत दातांच्या समस्यांकडे दुर्लक्ष केले जाते. वेळेवर उपचार न घेतल्यास गंभीर आजार उद्भवू शकतात. या पार्श्वभूमीवर समाजसेवेच्या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले. हे शिबिर बुधवार, दि. २९ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत लक्ष्मी डेंटल क्लिनिक, सिव्हिल लाईन चौक, वाशिम येथे आयोजित करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन प्रताप नागरे यांनी केले आहे.

## अनु.जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण प्रस्तावास व न्या.अनंत बदर समिती प्रस्ताव तात्काळ रद्द करावा- राजकुमार पडघान

■ प्रतिनिधी | वाशिम ■



शासनाने जो अनु.जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरणाचा प्रस्ताव न्या. अनंत बदर समितीचा प्रस्ताव मांडून अनु.जातीमधील ५९ जातीवर अन्याय करणारा असल्याने अनु . जातीच्या आरक्षणाचे उपवर्गी करणाचा प्रस्ताव व न्या.बदर समितीचा प्रस्ताव तात्काळ रद्द करावा.अशी मागणी समाजसेवक राजकुमार पडघान यांनी दि.२७ एप्रिल २६ रोजी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना जिल्हाधिकारी वाशीम यांचे मार्फत एका निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, समितीचा अहवाल सार्वजनिक करुन त्यावर सव समावेशक चर्चा करावी. अनु.जातीतील प्रत्येक जातीच्या लोक संख्येनुसार त्यांचे प्रतिनिधी समितीवर नियुक्त करावेत. आणि जाती निहाय जनगणना पूर्ण झाल्या शिवाय आरक्षणात कोणतेही बदल करू नयेत., अनु .जाती करीता राखीव असलेले १३ टक्के आरक्षण हे ५९ जाती करीता असून एका जातीचा विरोध म्हणून आरक्षण उपवर्गीकरण केल्याने जातीय तंटे निर्माण होवू नयेत, यासाठी न्या.बदर समिती अहवाल तात्काळ रद्द करावा.व अनु. जातीच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचे थांबवावे. अशी मागणी वाशीम जिल्हाधिकारी यांचे मार्फत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना केली आहे.निवेदनावर समाज सेवक राजकुमार पडघान, समाधान अवचार, आर .पी. कांबळे व दादाराव इंगोले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## जाहिर नोटीस

विदयमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम

सि. एम. ए. नं. ९४/२०२६ चौ. ता. ०८/०५/२०२६ सरस्वती व इतर विरूध्द निरंक

अर्जदारः-१. श्रीमती सरस्वती गोवर्धन सारडा वय अं. ८४ वर्षे, धंदा घरकाम. २. हरिष गोवर्धन सारडा वय अं. ५६ वर्षे, धंदा व्यापार. ३. सौ. साधना सतिषकुमार मालपाणी वय अं. ५७ वर्षे, धंदा घरकाम. अर्जदार क. १ व २ रा. माधव नगर लाखाळा वाशिम ता. जि. वाशिम अर्जदार क. ३ रा. काळे फाईल लाखाळा वाशिम ता. जि. वाशिम

गैरअर्जदार :- निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क. १ ही मयत नामे गोवर्धन ओंकारमल सारडा यांची पत्नी आहे. अर्जदार क. २ हे मयत नामे गोवर्धन ओंकारमल सारडा यांचा मुलगा आहे. अर्जदार क. ३ ही मयत नामे गोवर्धन ओंकारमल सारडा यांची मुलगी आहे. मयत नामे गोवर्धन ओंकारमल सारडा हे दिनांक २७/११/२०२५ रोजी मृत्यू पावलेत. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी विः न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. ०८/०५/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल.

आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

शिक्का

सही
आदेशानुसार
अधिक्षक दिवाणी न्यायालय व. स्तर वाशिम

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १५२ ■ बुधवार २९ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.००रु


# 'अन्नदाता' की 'अनादर': हरभरा खरेदी ठप्प; ७०० हून अधिक शेतकरी वाऱ्यावर

**सेलू जनमाध्यम-** एकीकडे 'शेतकरी आमचा अन्नदाता' अशी घोषणाबाजी, तर दुसरीकडे प्रत्यक्षात बळीराजाला वाऱ्यावर सोडणारी यंत्रणा अशी विरोधाभासी परिस्थिती सेलू तालुक्यात उघड झाली आहे. हरभरा खरेदीसाठी सुरू असलेले शासकीय पोर्टल अचानक बंद पडल्याने ७०० हून अधिक शेतकरी अडचणीत सापडले असून, संतप्त शेतकऱ्यांकडून प्रशासनाविरोधात तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. सिंदी सहकारी शेतकरी खरेदी विक्री समितीअंतर्गत सेलू येथील केंद्रावर रब्बी हंगामातील हरभरा खरेदी सुरळीत सुरू असतानाच तांत्रिक बिघाडामुळे पोर्टल बंद पडले. यामुळे नोंदणी करूनही शेकडो शेतकरी आपल्या मालाची विक्री करू शकले नाहीत. विशेषतः शेड्युलिंग न झालेल्या शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली असून, माल विकायचा तरी कुठे असा प्रश्न ते उपस्थित करत आहेत.उपलब्ध आकडेवारीनुसार, एकूण ११५९ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून, त्यापैकी केवळ ४१४ शेतकऱ्यांची खरेदी पूर्ण झाली आहे. तब्बल ७३९ शेतकरी अजूनही शेड्युलिंगच्या प्रतीक्षेत असून, ५४८.२९ क्विंटल हरभऱ्याची लॉट एन्ट्री प्रलंबित आहे. पोर्टल बंद असल्यामुळे ही संपूर्ण प्रक्रिया ठप्प झाली आहे.दरम्यान, खुल्या बाजारात हरभऱ्याचे दर हमीभावापेक्षा कमी असल्याने



व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट सुरू असल्याचा आरोप केला जात आहे. अस्मानी संकटातून कसाबसा वाचलेला हरभरा आता सुलतानी अडचणीत अडकला असून, शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जात असल्याची भावना व्यक्त होत आहे.या पार्श्वभूमीवर, प्रलंबित ५४८.२९ क्विंटल मालाची लॉट एन्ट्री तातडीने पूर्ण करण्यासाठी पोर्टल सुरू करावे, तसेच उर्वरित ७३९ शेतकऱ्यांचा माल खरेदी करण्यासाठी किमान २५ ते ३० दिवसांची मुदतवाढ द्यावी, अशी मागणी समितीने केली आहे. केंद्रावर आवश्यक बारदाना व इतर सुविधांची उपलब्धता सुनिश्चित करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.या संदर्भात समितीने नागपूर येथील विभागीय व्यवस्थापकांकडे निवेदन सादर केले असून, त्याच्या प्रती पालकमंत्री डॉ. पंकज भोयर आणि जिल्हाधिकारी वर्धा यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.आता तरी शासन जागे होणार का, की शेतकऱ्यांच्या सहनशीलतेची आणखी परीक्षा पाहणार, असा प्रश्न बळीराजाकडून उपस्थित केला जात आहे.

# रस्त्यावर तडफडणाऱ्या जीवासाठी खासदार थांबले : माणुसकीचा जिवंत धडा

## कार्यक्रमाची घाई बाजूला ठेवत अपघातग्रस्ताला दिला आधार; पोलिस येईपर्यंत घटनास्थळी ठाम उभे

**आर्वी जनमाध्यम :** धावपळीच्या राजकारणात संवेदनशीलता हरवली, अशी टीका नेहमी होते. मात्र कुऱ्हा येथे घडलेल्या एका घटनेने ही धारणा खोटी ठरवली. मतदारसंघातील कार्यक्रमासाठी आर्वीवरून अमरावतीकडे जात असताना खासदार अमर काळे यांच्या नजरेस रस्त्यावर जखमी अवस्थेत पडलेला एक व्यक्ती दिसताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता गाडी थांबवली आणि मदतीसाठी धाव घेतली.

जखमी व्यक्ती रक्तबंबाळ अवस्थेत तडफडत असल्याचे पाहून खासदारांनी तात्काळ घटनास्थळी उतरून परिस्थितीची पाहणी केली. त्यांनी लगेचच पोलिसांना फोन करून अपघाताची माहिती दिली. मदत येईपर्यंत त्यांनी घटनास्थळ सोडले नाही, तर जखमीच्या जवळ उभे राहून त्याला धीर देत राहिले.

काही वेळातच पोलीस घटनास्थळी पोहोचले. जखमीला तातडीने गाडीतून रुग्णालयात उपचारासाठी हलविण्यात आले. मात्र तोपर्यंत खासदार अमर काळे तेथेच थांबले होते. जखमी सुरक्षितपणे उपचारासाठी रवाना झाल्यानंतरच त्यांनी पुढील प्रवास सुरू केला.



ही घटना केवळ अपघाताची दखल घेण्यापुरती मर्यादित न राहता, लोकप्रतिनिधी म्हणून असलेल्या जबाबदारीची जाणीव करून देणारी ठरली. कार्यक्रमांची घाई असतानाही सामान्य माणसाच्या वेदनेला प्रतिसाद देत मदतीसाठी धावून जाणे, हीच खरी जनसेवा असल्याचे खासदार अमर काळे यांनी कृतीतून दाखवून दिले.

अडचणीच्या प्रसंगी मदतीची अपेक्षा असलेल्या सामान्य नागरिकांसाठी ही घटना आश्वासक ठरली असून, अजूनही काही लोकप्रतिनिधी पदासाठी नव्हे, तर माणुसकीसाठी उभे राहतात, अशी भावना परिसरात व्यक्त होत आहे.

# दहेगाव येथे बालविवाह रोखला प्रशासनाचा वेळेवर हस्तक्षेप

**वर्धा जनमाध्यम-** दहेगाव (मिस्कीन) येथील अल्पवयीन मुलीचा होणारा बालविवाह प्रशासनाच्या तत्परतेमुळे रोखण्यात आला. चाईल्ड हेल्पलाईनवर मिळालेल्या माहितीनंतर संबंधित यंत्रणांनी तातडीने कारवाई करत ही घटना टाळली.




मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित मुलीचा विवाह २९ एप्रिल रोजी वर्धा येथील युवकासोबत ठरविण्यात आला होता. याबाबतची माहिती १०९८ या हेल्पलाईनवर प्राप्त होताच जिल्हा महिला व बाल विकास विभाग, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, पोलिस विभाग तसेच स्थानिक प्रशासनाच्या पथकाने घटनास्थळी भेट दिली. अंगणवाडी सेविका तथा सहाय्यक बालविवाह प्रतिबंधक अधिकारी जोत्स्ना बोरकुटे यांनी वधू-वर पक्षाशी संवाद साधत बालविवाहाचे दुष्परिणाम व कायदेशीर बाबी समजावून सांगितल्या. त्यानंतर पालकांनी विवाह थांबविण्यास सहमती दर्शवून लेखी जबाबनामा दिला.

या प्रकरणात मुलीच्या वडिलांचे निधन झाल्याने कुटुंबीयांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने विवाहाचा निर्णय घेतल्याचे समोर आले. चाईल्ड हेल्प लाईनचे प्रकल्प समन्वयक आशिष मोडक यांनी कुटुंबीयांचे समुपदेशन केले. दरम्यान, संबंधित बालिकेला बाल कल्याण समितीसमोर हजर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.बालविवाह रोखण्यासाठी प्रशासनाकडून सातत्याने जनजागृती केली जात असून, अशा घटना आढळल्यास नागरिकांनी १०९८ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# वैभव मेघे यांना पीएच.डी. पदवी प्रदान



**वर्धा जनमाध्यम -** स्थानिक सहकार क्षेत्रातील नेते विलासराव मेघे यांचे सुपुत्र वैभव विलास मेघे यांना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ तर्फे पीएच.डी. (इ्.ऊ.) पदवी प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या शैक्षणिक यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

वैभव मेघे यांनी व्यवस्थापन शाखेतून एमबीए पूर्ण केल्यानंतर संशोधन कार्यास सुरुवात केली. पारंपरिक व्यवसाय आणि ई-व्यवसाय यांच्यातील समतोल स्थितीचे मूल्यांकन : नागपूर शहरातील ग्राहकांच्या खरेदी वर्तनाचा एक विश्लेषणात्मक अभ्यास हा त्यांच्या संशोधन प्रबंधाचा विषय होता. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांच्या खरेदीच्या सवयींचा त्यांनी अभ्यास केला आहे.

या संशोधनासाठी त्यांना दत्ता मेघे इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथील प्रा. डॉ. वैशाली रहाटे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विज्ञान पदवी नागपूर विद्यापीठातून तर व्यवस्थापन पदव्युत्तर पदवी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मधून संपादन केली आहे.

# उष्मालाटेचा इशारा; शिकवणी वर्गांवर जिल्हाधिकाऱ्यांचा लगाम

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यात वाढत्या तापमानाने कडेलोट गाठला असून उष्मालाटेचा धोका डोके वर काढत आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने कठोर पाऊल उचलत शासकीय व खाजगी शिकवणी वर्गांच्या वेळांवर निर्बंध घातले आहेत. प्रभारी जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष संजय तेली यांनी आदेश निर्गमित करून सर्व शिकवणी वर्ग सकाळी किंवा सायंकाळीच घेण्याचे, अथवा ऑनलाइन पद्धतीने चालविण्याचे निर्देश दिले आहेत.

भारतीय हवामान विभागाच्या इशाऱ्यानुसार पुढील काही दिवसांत उष्मालाट परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ नये, यासाठी प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून हे पाऊल उचलले आहे.यापूर्वीच २२ एप्रिलपासून जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळी ७ ते १० या वेळेत घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र शाळा सुटल्यानंतरही काही ठिकाणी शिकवणी वर्ग सुरू असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले. त्यामुळे आता या वर्गांनाही सकाळ-संध्याकाळच्या सत्रात किंवा ऑनलाइन पद्धतीत घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसे पाणी, सावलीची व्यवस्था, तसेच आरोग्यविषयक सूचनांचे पालन करण्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# नशेत वाहन चालवणाऱ्यांवर कारवाईचा बडगा; ४ चालकांवर गुन्हे

## वाहतूक शाखेची कारवाई



**वर्धा जनमाध्यम-** मद्यधुंद अवस्थेत वाहन चालवत स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या बेफिकीर चालकांवर अखेर वाहतूक पोलिसांनी चाबूक उगारला आहे. शहरात राबविण्यात आलेल्या धडक कारवाईत चार दुचाकी चालकांना पकडत पोलिसांनी त्यांच्यावर गुन्हे दाखल केले.मद्यप्राशन करून वाहन चालविणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आदेश पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल व अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांनी दिल्यानंतर वाहतूक नियंत्रण शाखा सतर्क झाली. शहरातील विविध भागांत नाकेबंदी करत वाहनचालकांची तपासणी करण्यात आली.या मोहिमेदरम्यान प्रशांत मधुकर सहारे (४५, रा. फूलफैल), हरीचंद्र केशव कौराती (५६, रा. आकरे ले-आऊट, सिंदी मेघे), स्वप्नील विलास गांजरे (३७, रा. गजानन नगर) आणि सुरेश डोमाजी ठाकरे (४७, रा. धंतोली चौक) हे चौघेही मद्यधुंद अवस्थेत दुचाकी चालविताना आढळून आले.त्यांची तात्काळ वैद्यकीय तपासणी करून संबंधितांवर गुन्हे नोंदविण्यात आले. ही कारवाई मुकेश राऊत, रियाज खान, शबीर सैय्यद, अनिल तिवारी, प्रदीप कोवळे आणि दिलीप कामडी यांच्या पथकाने केली. दरम्यान, वाहतूक नियम धाब्यावर बसवणाऱ्यांविरोधात अशीच आक्रमक कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला असून, दारू पिऊन वाहन चालविल्यास गय नाही, असा स्पष्ट संदेश प्रशासनाने दिला आहे.

# सुजातपूर जंगल जळून खाक; कोट्यवधींची वनसंपदा भस्मसात



**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आष्टी-मोर्शी मार्गावरील सुजातपूर जंगलात २७ एप्रिल रोजी अचानक लागलेल्या भीषण आगीने संपूर्ण परिसर हादरून गेला. या आगीत कोट्यवधी रुपयांची मौल्यवान वनसंपदा जळून खाक झाली असून वनविभागाचे मोठे नुकसान झाले आहे. आग इतकी भीषण होती की, दुसऱ्या दिवशीही जंगलातून धुराचे लोळ उठताना दिसत होते.

येणाडा फाट्याजवळ अज्ञात व्यक्तीने जाणीवपूर्वक आग लावल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या आगीत येणाडा व सुजातपूर परिसरातील मोठ्या प्रमाणावर झाडे, वनस्पती आणि नैसर्गिक संपत्ती आगीच्या भक्षस्थानी पडली. आगीची माहिती मिळताच वनविभागाचे बिटगार्ड घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला, मात्र आगीचे रौद्र रूप इतके भयानक होते की प्रयत्न अपुरे पडले.

रात्री उशिरापर्यंत आगीचे लोळ रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांना स्पष्ट दिसत होते, ज्यामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

या आगीत लहान आर्वी येथील शेतकरी धीरज शेटे यांच्या संत्रा बागेचेही मोठे नुकसान झाले आहे.

दरम्यान, या घटनेमुळे वनसंवर्धन आणि सुरक्षेच्या उपाययोजनांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. जंगलाला आग लावणाऱ्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वर्ध्यात 'एमडी'चा सुळसुळाट ८.६१ ग्रॅम मॅफेड्रॉन जप्त

## आरोपीला पोलिसांनी ठोकल्या बेड्या



वर्धा जनमाध्यम : शहरात अमली पदार्थांच्या वाढत्या सावटाने तरुणाई धोक्यात येत असतानाच शहर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने जोरदार कारवाई करत 'एमडी'चा पर्दाफाश केला. वर्धा कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर संशयास्पद हालचाली करत असलेल्या इसमाला ताब्यात घेत त्याच्याकडून ८.६१ ग्रॅम मॅफेड्रॉन (एमडी) जप्त करण्यात आले. या कारवाईत १ लाख १३ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.शुभम संतोष गौतम (वय ३२, रा. साईपार्क, सावंगी मेघे) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव असून, गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचत ही कारवाई केली. अंगझडती आणि दुचाकीची तपासणी करताच आरोपीकडे एमडी हा घातक अमली पदार्थ आढळून आला.

याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीस बेड्या ठोकण्यात आल्या. धक्कादायक बाब म्हणजे, आरोपीवर यापूर्वीही विविध गुन्ह्यांची नोंद असल्याची माहिती समोर आली आहे.

ही धडक कारवाई पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशीव वाघमारे आणि उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. पोलिस निरीक्षक संतोष ताले, उपनिरीक्षक शरद गायकवाड यांच्यासह पथकाने ही मोहीम यशस्वी केली. दरम्यान, शहरात 'एमडी'चा वाढता वापर आणि त्यामागील रॅकेट यामुळे गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

# हायड्रॉप्स फेटालिसग्रस्त नवजात बाळावर यशस्वी उपचार

**वर्धा जनमाध्यम**



वर्ध्यातील आचार्य विनोबा भावे रुग्णालय येथे 'हायड्रॉप्स फेटालिस' या दुर्मिळ व गंभीर आजाराने ग्रस्त नवजात बाळावर यशस्वी उपचार करण्यात आले. या उपचारामुळे वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीची नोंद झाली असून, वेळेवर निदान व उपचाराचे महत्त्व पुन्हा अधोरेखित झाले आहे. रुग्णालयाच्या माहितीनुसार, बाळाच्या आईचा रक्तगट बी-निगेटिव्ह असल्याने आरएच असंगततेमुळे गर्भातच हायड्रॉप्स फेटालिस विकसित झाला. या अवस्थेत गर्भाच्या शरीरातील विविध अवयवांमध्ये द्रव साचतो, ज्यामुळे जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. गर्भधारणेदरम्यान करण्यात आलेल्या अल्ट्रासाऊंड तपासणीत बाळाच्या पोटात (ॲसाइटिस), छातीत (प्ल्यूरल इफ्युजन) आणि हृदयाभोवती (पेरिकार्डियल इफ्युजन) द्रव साचल्याचे आढळले. पुढील डॉप्लर तपासणीत गंभीर अ?निमिया निदर्शनास आल्यानंतर डॉक्टरांनी गर्भात असतानाच 'इंट्रा-युटेरिन ब्लड ट्रान्सफ्युजन' (घ्ळऊ) ही प्रक्रिया केली. त्यामुळे बाळाच्या हिमोग्लोबिनमध्ये सुधारणा होऊन त्याच्या जगण्याची शक्यता वाढली. जन्मानंतर बाळाला श्वसनाचा त्रास जाणवल्याने त्याला तातडीने नवजात अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. तेथे व्हेंटिलेटर सहाय्य, रक्त चढविणे, एक्स्चेंज ट्रान्सफ्युजन तसेच शरीरातील अतिरिक्त द्रव काढण्याची प्रक्रिया करण्यात आली. औषधोपचारांद्वारे बाळाची प्रकृती स्थिर करण्यात यश आले. ही उपचार प्रक्रिया डॉ. अमर टाकसांडे, डॉ. सागर करोटकर, डॉ. रवी रेड्डी, डॉ. अर्जुन जैस्वाल आणि डॉ. श्रद्धा मडावी यांच्या टीमने यशस्वीरित्या पूर्ण केली. गर्भधारणेदरम्यान नियमित तपासणी व योग्य आरएच प्रतिबंधक उपाय केल्यास अशा गंभीर गुंतागुंती टाळता येतात, असे डॉ. करोटकर यांनी सांगितले. या यशस्वी उपचारामुळे रुग्णालयाच्या नवजात शिशु विभागाच्या कार्यक्षमतेची प्रचिती आली असून, सर्व स्तरांतून या कामगिरीचे कौतुक होत आहे.


## जाहीरनामा

[illegible]

दिनांक : [illegible]

राजेन्द्र मनोहर गुरू- अधिवक्ता, वर्धा
नागपूर रोड, सुदामपूरी, वर्धा, मो. क्र. ९४२३१२०७९९



## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **शाहाजीया परवीन शेख अहमद** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे --

**मिळकतीचे वर्णन** - मौजे - रामदरा, जुना मालमत्ता क्र. १७४ आणि नवीन मालमत्ता क्र. १३३१ ग्रामपंचायत तळेगांव शामजीपंत, ता.आष्टी, जि.वर्धा

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **शाहाजीया परवीन शेख अहमद** यांना सदर मालमत्ता ही वारसाने वडिलोपार्जित मिळाली आहे. तसेच सदर मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारसा हक्क असल्यास, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल नंबरवर ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या **७** दिवसांच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही, आणि सदर मालमत्ता Piramal Finance Ltd. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार गहाण करण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देत आहे.

**आपला,**
**ॲडव्होकेट**
**रवींद्र रु.वाटाणे,**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो.नं.9823698745**

शिक्का



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, सिव्हील लाईन्स वर्धा**

ई-मेल wardha.ee@mahapwd.gov.in दुरध्वनी ०७१५२-२९९३०७

**निविदा सूचना क्र.०६/२०२६-२७**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा हे खालील वर्धा जिल्ह्यातील कामांकरीता महाराष्ट्र शासनाकडे योग्य त्या वर्गात पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडून "C-Lumsum" निविदा प्रपत्रामध्ये निविदा आमंत्रित करीत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नांव | कामाची अंदाजित किंमत (रु.लक्ष) |
|---|---|---|
| | निविदा खुल्या वर्गाकरीता | |
| 01. | CONSTRUCTION OF MAJOR BRIDGE ON WARDHA RIVER DEOLI, DAHEGAON, PULGAON TO AMRAVATI DISTRICT BORDER ROAD SH-322 A, KM 9/500 IN DEOLI TALUKA, DISTRICT WARDHA. | 2674.94 |

निविदा प्रपत्राची किंमत व बयाणा रक्कम - निविदेमध्ये प्रकाशित केल्यानुसार,

निविदा प्रपत्राची माहिती व वेळापत्रक - सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथे सुचना फलकावर आहे. सर्व पत्र/इच्छुक निविदा धारकांनी ई-निविदा पत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी अटी, शर्ती व सविस्तर माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

साबांवि. वर्धा जा.क्र.२६५४/का-३(३)/निविदा/२०२६

दिनांक २४.०४.२०२६

**स्वा/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा**


# कृषी निविष्ठा विक्री व्यावसायिकांचा संप मागे

## उत्तर प्रदेशच्या धर्तीवर राज्यातही खतांचे लिंकींग बंद करण्याबाबतच्या आदेशाची अंमलबजावणी करणार- कृषी मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :**कंपन्यांकडून रासायनिक खतांचा पुरवठा होताना होत असलेले लिंकींग बंद होण्याबाबत उत्तर प्रदेशने जो आदेश काढला त्या धर्तीवर राज्यातही निर्णय घेण्यात येईल. राज्यातील कृषी निविष्ठा विक्री व्यावसायिकांच्या विविध प्रश्नांवर घेतलेल्या सकारात्मक निर्णयांमुळे कृषि निविष्ठा विक्रेंत्यांचा २७ एप्रिलपासून असलेला संप शेतकरी हितासाठी मागे घेत आहेत याबद्दल कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी संघटनेचे आभार मानले.

मंत्रालय परिषद सभागृह येथे कृषी निविष्ठा विक्री व्यवसायातील अडचणीबाबत माफदा संघटनेचे प्रतिनिधींसमवेत बैठकीत कृषी मंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार, आमदार राजेश बकाने, कृषी विभागाचे सचिव परिमल सिंह व्हीसीव्दारे, कृषी आयुक्तसुरज मांढरे, कृषी संचालक सुनिल बोरकर, माफदा संघटनेचे विनोद तराळ पाटील, ऑल इंडियाचे अध्यक्ष मनमोहन कलंतरे यासह संघटनेचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, उत्तर प्रदेशमध्ये खत उत्पादक कंपनी ज्या खतांची निर्मिती करते त्याच खताची विक्री त्यांना करता येते हाच कायदा महाराष्ट्रात लागू करणार आहोत. या निर्णयामुळे खत पुरवठा साखळीत सुसूत्रता येईल आणि शेतक-यांना थेट उत्पादक कंपन्यांकडून दर्जेदार खते मिळणे सोपे होईल याबाबत लवकरच कार्यवाही करू . शेजारील राज्यातून येणारे अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाणे प्रतिबंधित होण्याबाबत कडक कारवाई करण्याबाबत केंद्राला प्रस्ताव देउ आणि गृह विभागाला तसेच जिल्ह्यातील प्रत्येक पोलीस विभागाला पत्र देण्यात येईल व कडक कारवाई करू . केंद्र शासनाने बियाणांच्या उत्पादनापासून विक्रीपर्यंतच्या संनियंत्रणासाठी साथी पोर्टल विकसित केले आहे. साथी पोर्टल हे बियाणे उत्पादक व पुरवठादार कंपनीस्तरापर्यंत राबवविणे ही सर्वांसाठीची यंत्रणा चांगली आहे याचा वापर सर्वांनी करावा. विक्रेत्यांना येणा-या अडचणींबाबत नेहमीच शासन सकारात्मक भूमिका घेण्यात येईल.या पोर्टलबाबत पंधरा दिवसात प्रशिक्षण देवू यामध्ये प्रशिक्षणासाठी आवश्यकता वाढल्यास कालावधी वाढवू, विक्रेत्यांच्या अडचणीवर मार्ग काढू असेही ते म्हणाले.



कृषी मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले की, ई-पस वापरकर्त्यांवर तात्पुरत्या स्वरूपात कारवाई करणार नाही. राज्यातील कृषी निविष्ठा संदर्भातील विविध प्रश्नाबाबत केंद्रीय मंत्री जे.पी.नड्डा यांची भेट घेउन मार्ग काढणार आहोत. विक्रेते बियाणे पुरवठादार कंपन्यांकडून सीलबंद पॅकिंगमध्ये खरेदी करून शेतक-यांस सीलबंद पॅकिंगमध्येच विक्री करीत असल्यामुळे तपासणीमध्ये बियाणे व रासायनिक खते व किटकनाशके यांचे सॅम्पल फेल गेल्यास विक्रेत्यास आरोपी न करण्याबाबतचा हरियाणा राज्याचा अशा निर्णयाचा अभ्यास केला जाईल व त्यानुसार निर्णय घेउ. मुदतबाह्य किटकनाशके पुरवठादार कंपन्यांनी विक्रेत्यांकडून परत जमा करून घेण्याबाबत माफदा व विविध कंपन्यासोबत चर्चा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल असेही ते म्हणाले.

---

## राज्याचा स्वतंत्र बियाणे कायद्याचा केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करणार -मंत्री भरणे

**मुंबई/प्रतिनिधी :** शेतक-यांना दर्जेदार बियाणे उपलब्ध व्हावेत, त्यांना कायदेशीर संरक्षण मिळावे तसेच बियाणे खराब निघाल्यास त्याची नुकसानभरपाई तत्काळ मिळावी, यासाठी राज्याचा सर्व शिफारशींसह स्वतंत्र बियाणे कायदा करण्याबाबत प्रस्ताव केंद्र शासनाकडे सादर करण्याचे निर्देश कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. महाराष्ट्र विधानमंडळाच्या २०२५ दुस-या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत देण्यात आलेले आश्वासन क्र. ६७६ नुसार बियाणे कायदा १९६६ मधील प्रस्तावित बदल व सुधारणा विधेयकासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत कृषी मंत्री भरणे बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी शेतक-यांच्या हिताच्या दृष्टीने कायद्यात सकारात्मक निर्णय घेण्याच्या सूचना केल्या. बैठकीस दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल उपस्थित होते. तसेच आमदार सईताई डहाके, राजेश बकाने, हेमंत ओगले, रणधीर सावरकर, कृषी आयुक्तसुरज मांढरे आणि कृषी संचालक सुनिल बोरकर उपस्थित होते. कृषी मंत्री भरणे म्हणाले, राज्यासाठी स्वतंत्र बियाणे कायदा करताना प्रस्तावामध्ये शेतक-यांना नुकसानभरपाई तातडीने मिळावी यासाठी ठोस तरतुदी कराव्यात. दर्जेदार बियाण्यांची जबाबदारी संबंधित कंपन्यांवर निश्चित करणे, महाबीज कंपनीची कार्यक्षमता वाढविणे, तसेच नियमभंग करणा-या कंपन्यांवर कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय जिल्हास्तरावर बियाणे तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याची तरतूद करावी. साथी पोर्टलवर ट्रु थफुल बियाण्यांची नोंदणी प्रक्रिया सुरू करणे, तसेच विद्यापीठांमार्फत होणा-या संशोधन प्रक्रियेबाबत कायद्यात स्पष्ट तरतुदी करण्याचाही प्रस्तावात समावेश करण्याचे निर्देश त्यांनी दिले. नव्या कायद्यात बियाणे उत्पादक, प्रक्रिया केंद्र, वितरक, विक्रेते आणि रोपवाटिका यांची नोंदणी सक्तीची करण्याचा विचार आहे. शेतक-यांना स्वतःचे बियाणे साठवणे, वापरणे, देवाणघेवाण करणे आणि (ब्रँडेड नाव न वापरता) विक्री करण्यास कायदेशीर संरक्षण देण्याची तरतूद करण्यात येणार आहे. रोपवाटिकांची नोंदणी अनिवार्य करून त्यांना रोपांच्या उगमाचा नोंदवही ठेवणे बंधनकारक केले जाईल. तसेच बियाण्यांच्या पिशवीवर क्यूआर कोड देणे आणि सेंट्रलाइज्ड सीड ट्रेसिबिलिटी पोर्टलद्वारे बियाण्यांचा मागोवा घेणे अनिवार्य करणे, बियाण्यांमधील विषाणू, बॅक्टेरिया आणि बुरशी यांचे प्रमाण निश्चित करण्यासाठी सीड हेल्थ स्टँडर्ड्स लागू करण्याची तरतूदही करण्यात येणार असल्याची माहिती अधिका-यांनी दिली.

---

## गडचिरोलीत 210 कोटींचा पूल उद्घाटनापूर्वीच खड्ड्यात

**गडचिरोली/प्रतिनिधी :**विकासकामांचा गाजावाजा करत कोट्यवधींच्या निधीची तरतूद करण्यात आलेल्या गडचिरोली जिल्ह्यात भ्रष्टाचाराचे थर आता रस्त्यांवरून उखडू लागले आहेत. चंद्रपूर-गडचिरोली राष्ट्रीय महामार्गावरील वैनगंगा नदीवर २१० कोटी रुपये खर्चून उभारलेला नवा पूल वाहतुकीसाठी पूर्णतः सज्ज होण्यापूर्वीच त्याला मोठे भगदाड पडले आहे. पुलाच्या कामातील या निकृष्ट दर्जाच्या बुरुजामुळे सर्वसामान्यांचा जीव टांगणीला लागला असतानाच, राज्याचे मुख्यमंत्री स्वतः या जिल्ह्याचे पालकमंत्री असूनही प्रशासन कंत्राटदारांच्या पाठीशी उभे राहत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. गडचिरोली जिल्ह्याला प्रगत जिल्ह्यांच्या रांगेत आणण्यासाठी केंद्र व राज्य सरकारकडून राष्ट्रीय महामार्गांचे जाळे विणले जात आहे. मात्र, हे जाळे विणताना गुणवत्तेचा पूर्णतः बळी दिला जात असल्याचे वैनगंगा नदीवरील पुलाच्या अवस्थेवरून पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. अवघ्या काही महिन्यांपूर्वी बांधकाम पूर्ण झालेल्या या पुलावर सध्या एक मोठा आणि खोल खड्डा पडला आहे. पुलाचे अधिकृत उद्घाटन होउन फित कापली जाण्याआधीच पडलेला हा खड्डा कंत्राटदार आणि संबंधित विभागाच्या अभियंत्यांच्या कार्यप्रणालीवर शंका उपस्थित केल्या जात आहे. यामुळे महामार्गावरून धावणा-या



हजारो वाहनांच्या सुरक्षेचा प्रश्न यामुळे ऐरणीवर आला असून, विशेषतः रात्रीच्या वेळी हा खड्डा वाहनचालकांसाठी जीवघेणा सापळा ठरत आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, गडचिरोली जिल्ह्यात गेल्या काही काळात झालेली राष्ट्रीय महामार्गांची बहुतांश कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असल्याची तक्रार वारंवार होत आहे. मात्र, प्रत्येक वेळी स्थानिक प्रशासनाकडून या तक्रारींची दखल घेण्याऐवजी संबंधित कंत्राटदारांना अभय देण्याचे धोरण राबवले जात आहे. प्रशासनाच्या या भूमिकेमुळे घोटाळेबाज अधिकारी आणि कंत्राटदारांचे धाडस दिवसागणिक वाढत चालले आहे.जिल्ह्याचे पालकमंत्री पद खुद्द मुख्यमंत्र्यांकडे असल्याने या भागात पारदर्शक कारभार होईल, अशी जनतेची अपेक्षा होती. परंतु, प्रत्यक्ष वस्तुस्थिती काही वेगळीच असून, सध्या गडचिरोली जिल्हा भ्रष्ट अधिकारी व कंत्राटदारांसाठी हाटस्पाट बनल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. २१० कोटींची सार्वजनिक तिजोरी रिकामी करूनही जर पुलाची ही दैनावस्था होत असेल, तर याला जबाबदार कोण, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. पुलावरील खड्डा मलमपट्टी करून बुजवला जाईलही, पण प्रशासकीय यंत्रणेतील भ्रष्टाचाराचे जे भगदाड पडले आहे, त्यावर मुख्यमंत्री काय कारवाई करतात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

## जिद्दीच्या जोरावर मजुराची मुलगी झाली कर अधिकारी!

### कोणतीही शिकवणी न लावता एकाच वेळी ३ स्पर्धा परीक्षांत मिळवले यश

**अकोला :** जिद्द, चिकाटी व सातत्यपूर्ण परिश्रमातून मोनाली आठवले हिने सहाय्यक कर अधिकारी पदाला गवसणी घातली. कुठलाही शिकवणी वर्ग न लावता मोनालीने एक-दोन नव्हे तर तब्बल तीन स्पर्धा परीक्षांमध्ये निर्भेळ यश प्राप्त केले. घरातील हलाखीच्या परिस्थितीवर मात करून मजुराची मुलगी उच्च पदावर पोहोचली. मोनालीने मिळवलेले यश तरुण पिढीसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

**घरची बेताची परिस्थिती; शिष्यवृत्तीतून घेतले शिक्षण**

परिस्थिती कितीही बेताची असली तरी त्यावर मात करता येउ शकते, हे मोनालीने आपल्या कृतीतून दाखवले. अकोला तालुक्यातील धोर्तडी येथील मजुरी करणारे दीपक आठवले यांची मुलगी मोनालीने शिकवणी वर्गाविना एकाच वेळी तीन स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण केल्या आहेत. घरातील परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे वडील दीपक आठवले गावात मिळेल ते काम करतात. नळ फिटिंगच्या कामावर मजुरीसाठी ते जातात, तर आई शेतीची कामे करते. मोनाली लहानपणापासूनच अभ्यासात प्रचंड हुशार



आहे. तिचे प्राथमिक शिक्षण धोर्तडी गावातील जिल्हा परिषद मराठी शाळेत घेतले. माध्यमिक शिक्षणासाठी तिने अकोला गाठून जिल्हा परिषद कन्या शाळेतच धडे गिरवले. मोनालीने शिष्यवृत्तीतून एम.कॉम पर्यंतचे उच्चशिक्षण पूर्ण केले.

**पहिल्याच प्रयत्नात तीन स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण-** घरची परिस्थिती हलाखीची असल्यामुळे स्पर्धा परीक्षेसाठी शिकवणी वर्ग लावणे शक्य नव्हते. त्यामुळेच स्वतःच घरी अभ्यास करून मोनाली हिने स्पर्धा परीक्षेची तयारी केली. अभ्यासात सातत्य ठेवले. मोनालीला या परिश्रमाचे मोठे फळ तिला मिळाले. समाज कल्याण विभागात लिपिक, उच्च न्यायालयात बेलीफ आणि कर विभागात सहाय्यक कर अधिकारी या तीन स्पर्धा परीक्षा पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण करून यशाचा झेंडा फडकवला. या तीनपैकी कर विभागातील अधिकारी पदावर नियुक्ती स्वीकारणार असल्याचे मोनालीने सांगितले. परिस्थितीपुढे हतबल न होता सातत्यपूर्ण प्रयत्न केल्यास निश्चित यश प्राप्ती होत असल्याचा संदेश मोनालीने दिला आहे.

**वंचित आघाडीकडून मोनालीचा गौरव-**मोनालीच्या यशाची दखल घेउन वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद इंगळे व माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुनील फाटकर यांनी धोर्तडी येथील घरी जाउन आई-वडिलांसह मोनालीचा सत्कार केला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये मोनालीने मिळवलेले यश गावातीलच नव्हे तर सर्व गरजू विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे पदाधिकारी म्हणाले.

---

## आयटी क्षेत्रावर 'एआय'ची कु-हाड! भविष्यात 50% नोक-या जाण्याची भीती

### डी. के. शिवकुमार यांच्या दाव्याने खळबळ

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जेव्हापासून आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा आयटी क्षेत्रात शिरकाव झाला आहे, तेव्हापासून जगभरात मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात होताना पाहायला मिळत आहे. मायक्रोसाफ्ट, मेटा आणि ओरॅकलने एका महिन्यात तब्बल ४६ हजारांहून अधिक कर्मचारी काढून टाकले. यावरुन याची तीव्रता समजू शकते. मात्र, खरी कर्मचारी कपात अजून सुरू व्हायची असल्याचा इशारा कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी दिला. या बातमीने आयटी क्षेत्रात खळबळ उडाली असून, त्यांच्या दाव्यानुसार, एआयमुळे ५०ऽ आयटी व्यावसायिकांच्या नोक-यांवर गदा येणार आहे. शिवकुमार यांच्या मते, बंगळुरूमध्ये २.२६ कोटींहून अधिक आयटी व्यावसायिक आहेत. इतकी मोठी टॅलेंटची खाण आणि येथील आल्हाददायक हवामान यांची बरोबरी जगातील कोणतेही शहर करू शकत नाही. मात्र, तंत्रज्ञानातील प्रगतीबद्दल बोलताना त्यांनी एका गंभीर समस्येकडे लक्ष वेधले. आर्टिफिशियल इंटेलिजन्समुळे बंगळुरू आणि देशाच्या इतर भागांतील ५० टक्के नोक-या कमी होउ शकतात, असे विधान शिवकुमार यांनी केले. हे एक मोठे आव्हान असल्याचे सांगत त्यांनी रोजगाराच्या भविष्याबद्दल चिंता व्यक्त केली. तर दुसरीकडे उद्योग मंत्री एम. बी. पाटील यांनीही याला दुजोरा दिला. सेवा क्षेत्रात आपण देशात पहिल्या क्रमांकावर आहोत, पण आता आपल्याला एआयचा स्वीकार करावाच लागेल. या प्रक्रियेत नोक-यांची कपात निश्चितपणे होणार आहे, असे स्पष्ट मत पाटील यांनी व्यक्त केले. जगातील अग्रगण्य चिपमेकर कंपनी एनव्हिडियाने बंगळुरू मध्ये ७६ लाख चौरस फूट ऑफिस स्पेस भाड्याने घेतली आहे. यावर बोलताना एम. बी. पाटील म्हणाले की, जगातील सर्व फार्च्युन ५०० कंपन्या बंगळुरूमध्ये उपस्थित आहेत. एनव्हिडिया त्यापैकीच एक आहे. तसेच, राज्य सरकारने अलीकडेच एका मोठ्या सेमीकंडक्टर प्रकल्पावर स्वाक्षरी केल्याचेही त्यांनी उघड केले.

**मुंबईच्या तुलनेत बंगळुरू स्वस्त-** शिवकुमार यांनी बंगळुरू आणि मुंबईतील राहणीमान खर्चाची तुलना करत बंगळुरू अधिक स्वस्त असल्याचे सांगितले. रिअल इस्टेटच्या बाबतीत बंगळुरू आजही मुंबईपेक्षा परवडणारे असल्याचे ते म्हणाले. मुंबईत घरभाडे २९२ रुपये प्रति चौरस फूट इतके आहे, तर बंगळुरू मध्ये केवळ ८३ रुपये प्रति चौरस फूट मोजावे लागतील.

---

## चौकीदार भरती जाहिरात दुरूस्त करण्याचे आदिवासी विकास मंत्री वुईके यांचे निर्देश

**मुंबई :** आदिवासी विकास विभागाच्या नाशिक येथील आयुक्तालयाने २७ एप्रिल २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या चौकीदार पदांच्या जाहिरातीत अनुसूचित जमाती (एसटी) संवर्गासाठी एकही पद राखीव नसल्याचे समोर आल्यानंतर आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी तातडीने हस्तक्षेप करत संबंधित अधिका-यांना जाहिरात दुरुस्तीचे निर्देश दिले. मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विभागाचे सचिव व आयुक्त यांच्यासोबत व्हिडिओ कान्फरन्सद्वारे बैठक घेतली. या बैठकीत २० नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदींचा सखोल अभ्यास करून जाहिरात दुरुस्त करण्याचे आणि तत्काळ सुधारित जाहिरात प्रसिद्ध करण्याचे आदेश देण्यात आले. मंत्री डा. अशोक वुईके म्हणाले, चौकीदार पदांच्या भरतीसाठी शुद्धीपत्रक



काढण्यात येणार असून, अनुसूचित जमाती उमेदवारांवर होणारा अन्याय दूर केला जाणार आहे. तसेच, अट्रासिटी कायद्यांतर्गत पीडितांच्या वारसदारांना शासकीय सेवेत संधी देण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आली आहे. आदिवासी विकास विभागातील वर्ग-४ मधील १५१ पदे पुनरुज्जीवित करून एकदाच विशेष बाब म्हणून या पदांवर नियुक्त्या केल्या जाणार आहेत. या सुधारित प्रक्रियेत अनुसूचित जमाती उमेदवारांसाठी पदे राखीव ठेवण्यात येणार आहेत. अनुसूचित जमाती उमेदवारांवर कोणताही अन्याय होउ दिला जाणार नाही. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन मंत्री डा. अशोक वुईके यांनी केले आहे.

---

## मागासवर्गीयांच्या पदोन्नतीतील 87 हजार पदे रिक्त, सर्वोच्च न्यायालयात शासनाची माहिती

**नागपूर/प्रतिनिधी :**अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), भटके विमुक्त जाती-जमाती तसेच विशेष मागास वर्गाच्या (एसबीसी) पदोन्नतीतील आरक्षणाचा प्रश्न गेल्या नउ वर्षांपासून प्रलंबित असून, त्यामुळे राज्यातील वर्ग १ ते वर्ग ४ मधील तब्बल ८७ हजारांहून अधिक पदोन्नतीची पदे रिक्त असल्याची माहिती राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात सादर केली आहे. राज्य सरकारने २००४ मध्ये एससी, एसटी, भटके-विमुक्त आणि विशेष मागास प्रवर्गातील अधिकारी-कर्मचा-यांना पदोन्नतीत आरक्षण देण्याचा कायदा लागू केला होता. मात्र या कायद्याला न्यायालयात आव्हान देण्यात आले. त्यानंतर ऑगस्ट २०१७ मध्ये उच्च न्यायालयाने पदोन्नतीतील आरक्षणासंबंधी आदेश रद्द ठरवला. या निर्णयाच्या आधारे तत्कालीन फडणवीस सरकारने डिसेंबर २०१७ मध्ये पदोन्नतीतील आरक्षणाला स्थगिती दिली. दरम्यान, या निर्णयाविरोधात विविध कर्मचारी संघटनांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने आवश्यक सांख्यिकी माहिती सादर करण्याचे निर्देश सरकारला दिले होते.



मात्र त्यावेळी ती माहिती सादर करण्यात आली नव्हती. महाविकास आघाडी सरकारच्या काळात तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील उपसमितीने या विषयासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेत समिती नेमली होती. समितीने उशिराने सर्वोच्च न्यायालयात अहवाल सादर केला. त्यात राज्य सरकार पदोन्नतीतील आरक्षण लागू करण्यास सकारात्मक असल्याचे नमूद करण्यात आले. या अहवालानुसार राज्यात वर्ग १ ते वर्ग ४ मधील एकूण ८७ हजार १३८ पदोन्नतीची पदे रिक्तआहेत. त्यापैकी अनुसूचित जातींची सर्वाधिक १६ हजार ४८७ पदे रिक्त असून, अनुसूचित जमातींची ७ हजार २ पदे रिक्त आहेत. खुल्या प्रवर्गातील ५३ हजार ९५१ पदे रिक्तअसल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान, अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा मुद्दाही ऐरणीवर आला असून, एससीसाठी असलेल्या १३ टक्के आरक्षणाचे चार गटांत विभाजन करण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याचा परिणाम पदोन्नतीतील आरक्षणावरही होउ शकतो, अशी चर्चा आहे. शासनाने सर्वोच्च न्यायालयात शपथपत्र दाखल करून रिक्त पदांची माहिती दिली आहे. तसेच पदोन्नतीतील आरक्षणाचा शासन आदेश लागू करण्यास समर्थन दर्शवले आहे.

---

## सौर प्रकल्प प्रक्रिया गतीमान करण्यावर शासनाचा भर-मंत्री सावे

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील सौर उर्जा प्रकल्पांची अंमलबजावणी प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद करण्यावर शासनाचा भर राहणार आहे. सौर प्रकल्पांना वेळेत गती व गुंतवणुकीला चालना मिळावी यासाठी शासकीय प्रक्रिया गतिमान करण्यात येणार असल्याचे अपारंपरिक उर्जा मंत्री अतुल सावे यांनी सांगितले. राज्य शासनाने जाहीर केलेल्या अपारंपरिक ऊर्जा धोरणाबाबत या क्षेत्रातील जाणकारांच्या सूचना आणि हरकतीसंबंधी चर्चा करण्यासाठी अपारंपरिक ऊर्जा मंत्री अतुल सावे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. यावेळी विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच कॉन्फड्रेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रिजचे प्रतिनिधी उपस्थित होते.मंत्री अतुल सावे म्हणाले, सौर उर्जा प्रकल्प जलदगतीने कार्यान्वित झाल्यास राज्यातील उर्जा उत्पादन वाढण्यास मदत होईल. यासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत शासन सकारात्मक आहे. सौर प्रकल्पांशी संबंधित मंजुरी, करार प्रक्रिया आणि तांत्रिक बाबी बाबत लवकरच बैठक घेण्यात येईल असेही त्यांनी यावेळी सांगितले. बैठकीत नव्या उर्जा धोरणातील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सीआयआयच्या प्रतिनिधीनी नवीन धोरणाबाबत समाधान व्यक्त केले.

## पद्म पुरस्कार 2027 साठी नामांकन प्रक्रिया सुरू

**नवी दिल्ली :** पद्म पुरस्कार २०२७ साठी नामांकन/ शिफारसी मागवण्याची प्रक्रिया १५ मार्च २०२६ पासून सुरु झालेली आहे. पद्म पुरस्कारांसाठी नामांकन भरण्याची अंतिम तारीख ३१ जुलै २०२६ ही आहे. ही नामांकने/शिफारसी केवळ ऑनलाईन स्वरूपात, राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवरुन https://awards.gov.in स्वीकारली जाणार आहेत.प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला (२६ जानेवारी २०२७) हे पुरस्कार जाहीर केले जातील.पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री अशा तीन श्रेणीत दिले जाणारे हे देशातले सर्वोच्च नागरी पुरस्कार आहेत. १९५४ साली पहिल्यांदा देण्यात आलेले हे पुरस्कार, दरवर्षी प्रजासत्ताक दिनाला जाहीर केले जातात. विविध क्षेत्रांमध्ये केलेल्या उत्कृष्ट आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेत मान्यवरांना ह्या पुरस्कारांनी गौरवण्यात येते . कला, साहित्य आणि शिक्षण, क्रीडा, वैद्यकशास्त्र, सामाजिक कार्य, विज्ञान व अभियांत्रिकी, सार्वजनिक व्यवहार, नागरी सेवा, व्यापार व उद्योग अशा सर्व क्षेत्रांतील विशेष उल्लेखनीय कामगिरी किंवा सेवा यासाठी हा सन्मान दिला जातो. डॉक्टर्स आणि वैज्ञानिक वगळता, सार्वजनिक क्षेत्रातल्या कंपन्यांमध्ये काम करणारे सरकारी कर्मचारी मात्र, या पुरस्कारांसाठी पात्र नसतात. पद्म पुरस्कारांना सर्वसामान्यांचे पद्म पुरस्कार बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. त्यामुळे सर्व नागरिकांना नामांकन किंवा शिफारसी करण्याचे, तसेच स्वताचे नामांकन करण्याचेही आवाहन करण्यात येत आहे. विशेषता महिला, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती व जमाती, दिव्यांग व्यक्ती तसेच एकूण समाजासाठी निस्वार्थ सेवा करणा-या व्यक्तींच्या कार्याची दखल घेत, हे कार्य समाजापुढे आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन करण्यात येते. वर उल्लेख केलेल्या पोर्टलवर दिलेल्या आराखड्यात, संबधित व्यक्तीची सविस्तर माहिती, त्यांच्या संबंधित कार्यक्षेत्रात/शाखेत त्यांनी केलेली विशेष उल्लेखनीय सेवा/कामगिरी यांचा स्पष्ट आणि सविस्तर उल्लेख नामांकन/शिफारसी मध्ये केलेला असावा. तसेच संबंधित व्यक्तीने आपल्या क्षेत्रात केलेली विशेष व उल्लेखनीय कामगिरी किंवा सेवा स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. यासंबंधी अधिक माहिती गृह मंत्रालयाच्या https://mha.gov.in या संकेतस्थळावरील "Awards and Medals" या विभागात तसेच पद्म पुरस्कार पोर्टलवर https://padmaawards.gov.in उपलब्ध आहे. या पुरस्कारांशी संबंधित नियम व अधिनियम खालील लिंकवर पाहता येतील: https://padmaawards.gov.in/AboutAwards.aspx .

## पर्यटन वृद्धीसाठी सुविधा सक्षमीकरणावर भर -मंत्री देसाई

**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील पर्यटन क्षेत्र अधिक सक्षम, परिणामकारक आणि पर्यटकाभिमुख करण्याच्या दृष्टीने पायाभूत सुविधा बळकटीकरण, सेवांचा दर्जा उंचावणे आणि पर्यटन उपक्रमांना गती देण्यावर भर देण्यात यावा, अशा सूचना पर्यटन मंत्री शंभूराज शिवाजीराव देसाई यांनी दिल्या. मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली तथा राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ संचालक मंडळाची १७७ वी सर्वसाधारण बैठक सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे पार पडली. यावेळी पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन संचालनालयाचे संचालक मंगेश जोशी, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल, कंपनी सचिव वर्षा चव्हाण उपस्थित होते. या बैठकीत पर्यटन महामंडळाच्या एकूण कार्याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच राज्यातील पर्यटन विकासाशी संबंधित विविध धोरणात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. पर्यटन क्षेत्रातील पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्याबरोबरच सेवांची गुणवत्ता उंचावणे, पर्यटकांना अधिक दर्जेदार व सक्षम सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच पर्यटन प्रकल्पांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक दिशानिर्देश यावेळी देण्यात आले. बैठकीत मंत्री देसाई यांनी पर्यटन विकासाशी संबंधित प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना देत महामंडळाचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यावर भर दिला. राज्यातील पर्यटन स्थळांचा दर्जा उंचावणे, सुविधा विस्तार, स्वच्छता, सेवा व्यवस्थापन आणि पर्यटकाभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबविण्याबाबत संबंधित अधिका-यांना निर्देश देण्यात आले.

## माजी सैनिक सुरक्षा कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीतील अडचणी दूर करणार

**मुंबई/प्रतिनिधी :** माजी सैनिक कल्याण महामंडळाच्या सुरक्षा कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीतील अडचणी दूर करून सुरक्षा कर्मचा-यांच्या वेतनश्रेणीत सुसूत्रता आणावी असे निर्देश माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी दिले. माजी सैनिक कल्याण महामंडळाच्या सुरक्षा कर्मचा-यांच्या वेतनासंदर्भातील अडचणी दूर करण्यासाठी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. या बैठकीस वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे दी उपस्थित होते. तसेच सामान्य प्रशासन विभागाचे अपर मुख्य सचिव संतोष कुमार, मेस्को व्यवस्थापकीय संचालक कॅप्टन कौस्तुभ गोसावी, कार्यकारी संचालक नितीन वाघ, मुख्य औद्योगिक रिलेशन अधिकारी मुकेश मेश्राम, माजी खासदार ब्रिगेडियर सुधीर सावंत, तसेच राजेश कुंभार, राजीव, राजेश लोंढे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.माजी सैनिकांच्या सेवेला न्याय मिळावा तसेच त्यांच्या कल्याणास प्राधान्य दिले जावे, या दृष्टीने शासन कटिबद्ध असून यासंदर्भात तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश मंत्री देसाई यांनी दिले. माजी सैनिकांच्या सन्मान आणि हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन ठाम असून या संदर्भातील प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, असेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

## पॉश कायद्याची नियमांचे पालन न केल्यास कायदेशीर कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :**महिलांवरील अत्याचाराला आळा बसवा यासाठी राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय तसेच खासगी आस्थापनांनी अंतर्गत समिती स्थापन करणे बंधनकारक आहे. असे न केल्यास ५० हजार रु पयांपर्यंत दंड तसेच पुनरावृत्ती झाल्यास दंड वाढविणे, परवाना रद्द करणे यासारखी कडक कारवाईही करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास विभागाचे आयुक्त जगदीश मिनियार यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे दिली आहे. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ (पाश ॲक्ट) ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश आहेत. या पार्श्वभूमीवर १० किंवा त्याहून अधिक कर्मचारी असलेल्या सर्व कार्यालये, संस्था, संघटना, महामंडळे, तसेच खासगी उद्योग, शैक्षणिक संस्था, आरोग्य सेवा, क्रीडा संस्था, सेवा पुरवठादार आदी सर्व आस्थापनांनी अंतर्गत समिती स्थापन करणे आवश्यक आहे. खासगी आस्थापनांनी केंद्र शासनाच्या SHE Box Portal (https://shebox.wcd.gov.in) वर नोंदणी करून त्यांच्या अंतर्गत समितीची माहिती ऑनलाईन अपलोड करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. नोंदणीसाठी अधिकृत ई-मेल आयडी आवश्यक असून, तांत्रिक अडचणी आल्यास 'Forgot Password' पर्यायाचा वापर करता येतो. तसेच नागरिकांना, विशेषत? महिलांना आवाहन करण्यात आले आहे की, ज्या कार्यालयांमध्ये अंतर्गत समितीबाबत माहिती दर्शविणारा फलक नसल्यास १८१ या टोल-फ्री हेल्पलाईनवर तक्रार नोंदवावी किंवा SHE Box Portal वर ऑनलाईन तक्रार करावी.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## खोटेपणाचा कळस

माजी लष्करप्रमुख निवृत्त जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या 'फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी' या पुस्तकावरून विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली. ज्या पुस्तकावरून राहुल यांनी मोदी आणि सरकारवर आरोप केले, ते पुस्तक अजून प्रसिद्धही झाले नाही. तरीही त्यांनी संसदेत हे पुस्तक नाचवत आणले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी, तसेच भारत सरकारवर चीनच्या घुसखोरीबद्दल निरर्थक आरोप केले. सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे जर हे पुस्तक प्रकाशित झाले नाही, तर ते राहुल यांना कसे मिळाले? ते त्यांनी कुठून मिळवले असे दोन प्रश्न उपस्थित होतात. माजी लष्करप्रमुखांचे हे पुस्तक अद्याप प्रकाशित झाले नाही, तरीही राहुल यांनी ते सभागृहात आणले आणि त्यावर भाष्यही केले. २०२० मध्ये भारत-चीन संबंधात वाद निर्माण झाला होता. पेन्विन रँडम हाऊसने जे या पुस्तकाचे प्रकाशक आहेत, त्यांनी पुस्तक प्रकाशित झाले नाही असा दावा केला आहे. जर हे पुस्तक प्रकाशित झाले नाही तर राहुल गांधी यांनी ते मागील आठवड्यात संसद भवनात राहुल यांनी फडकवले कसे हे कोडेच आहे. हे पुस्तक सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यातील युद्धविंदू ठरले आहे. कारण त्यातील वादाचे मुद्दे अनेक आहेत. लडाखसंदर्भात २०२० मध्ये भारत आणि चीनमध्ये कुंठीत अवस्था म्हणजे ज्याला इंग्रजीत स्टँडऑफ असा शब्द वापरला जातो तशी अवस्था झाली होती. त्याबाबत राहुल यांचे म्हणणे होते, की भारतीय लष्कराने पूर्व लडाखच्याबाबत स्थिती अत्यंत कमकुवतपणे हाताळली, तसेच पंतप्रधान मोदींनी आपली जबाबदारी झटकून लष्कराला पेचप्रसंगात सोडून दिले. त्यात भारताने बराचसा भूभाग गमावला आहे, असा राहुल यांचा दावा आहे. अर्थात नरवणे यांनी राहुल यांना तेव्हाच सडेतोड उत्तर दिले होते. त्यांनी म्हटले होते की, भारताने एक इंचही भूभाग चीनकडे दिलेला नाही. राहुल हे खोटे बोलत आहेत कारण आतापर्यंत त्यांनी अनेकदा खोटे बोलण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्या म्हणण्यावर कसा विश्वास ठेवावा कसा, हा प्रश्न सर्वसामान्य भारतीयांना पडला आहे. राहुल यांना हे सांगावे लागेल की, नरवणे यांनी त्यांचे आरोप साफ फेटाळले असून त्यांनी असेही म्हटले आहे की, लष्करी दलाला या वादात ओढणे गैर आहे. एक इंच जमीनही चीनला दिली नाही असा नरवणे यांनी दावा केला आहे. लष्कराला तसेच चीनच्या सैन्याकडे सोडण्यात आले आणि त्यांचे हाल कुणी खाल्ले नाही हा राहुल यांचा आरोप निराधार होता. सरकारने लष्कराला मुक्त हात दिला होता. लष्करी दलांवर भारत सरकारचा पूर्ण विश्वास होता असे नरवणे सांगतात. त्यामुळे राहुल तोंडावर आपटले. पण भाजपला कोणत्या ना कोणत्या प्रकारे बदनाम करायचे, असा चंग राहुल यांनी बांधला आहे. त्यातूनच अशा प्रकाशित न झालेल्या पुस्तकाचा वाद उकरून काढला. राहुल हे विसरतात की, १९६२ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले होते, तेव्हा त्यांचे आजोबा पंडित नेहरू हे हिंदी चिनी भाई भाई अशा घोषणा देण्यात मग्न होते. त्या धुंदीतच चिनी सैन्याने भारतावर शांतपणे आक्रमण करत अक्साई चीनचा भूभाग विनासायास चीनने बळकावला. तेव्हा नेहरू आपल्या मूढपणात मग्न होते. त्यांनी चीन युद्ध हरल्यावर हाय खाल्ली त्यातच त्यांचा अंत झाल्याचे सांगितले जाते. अर्थात यात खरे-खोटे काय ते कुणालाच माहीत नाही. चीनने भारताची फसवणूक केली हे सत्य नेहरूंना मानवले नाही. मुळात जनतेला असत्य सांगणे आणि तेही अप्रकाशित पुस्तकातून हेच मोठे असत्य आहे. पण राहुल हे वारंवार करतात. कारण त्यांना आपण सत्तेवर नाही हे सत्य पचनी पडलेले नाही. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावरही त्यांनी असेच आरोप केले होते. अजूनही त्यांच्याविरुद्ध कोर्टात सुनावणी सुरू आहे. विरोधी नेता कसा नसावा याचे राहुल गांधी हे उत्तम उदाहरण आहे. नरवणे यांच्या अनधिकृत पुस्तकातील उताऱ्यावर राहुल यांनी लष्करावर बेफाम आरोप करावेत, ज्यामुळे संसदेत कुणीही व्यथित होईल. असे राहुल गांधी विरोधी नेते आहेत. त्यांना विरोधी पक्षनेते म्हणून सरकावर टीका करण्याचा अधिकार आहेच. पण तो अधिकार त्यांनी सत्यकथनासाठीच वापरला पाहिजे. वाट्टेल तसे बरळण्यासाठी नव्हे. नरवणे यांनी ठामपणे सांगितले आहे की, २०२० मध्ये भारतीय सशस्त्र दलांचे पूर्ण नियंत्रण लडाखवर होते. त्यांनी एकही इंच भूभाग चीनच्या ताब्यात जाऊ दिला नाही; मात्र राहुल यांनी वरील आरोप कशाच्या आधारावर केले हे ते सांगत नाहीत. पण तरीही त्यांच्यावर लोकांनी विश्वास ठेवावा, असे त्यांचे म्हणणे आहे. नरवणे यांनी म्हटले आहे, की सरकारने त्यांना पूर्ण स्वातंत्र्य दिले होते. लष्कराने संपूर्ण स्थिती संयमाने हाताळली. त्यामुळेच राहुल गांधी भारतीय लष्करावर जे आरोप करत आहेत. ही त्यांची जुनी सवय आहे. २०२२-२०२५ या काळातही राहुल यांनी भारत जोडो यात्रा काढली होती. त्यावेळीही असाच आरोप केला होता, की अरुणाचल प्रदेशात चिनी सैनिक गलवान खोऱ्यात भारतीय सैनिकांना मारहाण करत आहेत. भारतीय लष्कराचे नीतीधैर्य खच्ची करण्याचा हा प्रयत्न होता. त्यानंतर राहुल यांच्यावर टीकेची झोड उठली. राहुल यांनी केंद्र सरकारने राफेल विमाने खरेदी केली, त्यासंदर्भातही असाच आरोप केला होता की, मोदी यांनी या प्रकरणात भ्रष्टाचार केला होता. जेव्हा की त्यांचे वडील राजीव गांधी यांनीच बोफोर्स तोफा खरेदी प्रकरणात भ्रष्टाचार केला होता. ते भूत अद्यापही काँग्रेसच्या मानगुटीवर उतरलेले नाही. पण त्यांना असे वाटते की, जसे काँग्रेसमधील आपले बापजादे आहेत तसेच राजकारणात इतरही असतात. पण अपवाद असू शकतात. ऑपरेशन सिंदूर प्रकरणातही राहुल यांचा आरोप होता की, ती संपूर्ण कारवाई राजकीय स्टेज मॅनेज्ड आणि त्यांचे हे आरोप कधीच सिद्ध झाले नाहीत. राहुल यांचा आणखी एक खोटेपणा असेच फक्त याबाबत म्हणता येईल.

# 'शक्तिपीठ'ची व्याप्ती रेड्डीपर्यंत

एका बाजूला १४ वर्षे रखडलेला मुंबई-गोवा महामार्ग, दुसऱ्या बाजूला २२ वर्षे रखडलेला रेवस-रेड्डी सागरी महामार्ग, तीन वर्षांपूर्वी घोषित झालेला ग्रीन फिल्ड महामार्ग आणि आता रत्नागिरी-नागपूर महामार्ग अशा असंख्य महामार्गांच्या यादीमध्ये आता नागपूर-रेड्डी शक्तिपीठ महामार्ग होणार, अशी नवी घोषणा गेल्याच आठवड्यात झाली आणि आपल्या शेतजमिनी जाण्याच्या भीतीने शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली. हजारो एकर शेतजमीन या महामार्गासाठी जाणार असल्याने आंबा, कोकम, काजूसह अशी महत्त्वाची फळपिके देणाऱ्या या प्रदेशामधील शेतकऱ्यांची अस्वस्थता ही स्वाभाविक उमटलेली प्रतिक्रिया होती. बहुचर्चित शक्तिपीठ महामार्ग आता कोकणचे महत्त्वाचे व्यापारी बंदर असलेल्या रेड्डीपर्यंत जोडले जाणार आहे. नागपूर ते गोवा अशा या शक्तिपीठ




महामार्गावरून गेले अनेक दिवस राजकीय आणि सामाजिक स्तरावर विरोधाचे राजकारण तापलेले आहे.

माहूर, तुळजापूर, कोल्हापूर या शक्तिपीठांसह एकूण २१ धार्मिक स्थळे जोडणारा हा महामार्ग खेरे तर व्यावसायिक कॉरिडॉर म्हणूनही ओळखला जात आहे. कोल्हापूर, सांगली आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांत झालेला विरोध लक्षात घेऊन हा महामार्ग काही गावे वगळून आता मार्गस्थ होणार आहे. याबाबतची माहिती राज्याचे मत्स्यविकास मंत्री नितेश राणे यांनी गेल्या आठवड्यात दिली आहे. एकूण १३ जिल्ह्यांमधून जाणारा हा मार्ग ८५६ किलोमीटरचा आहे. सिंधुदुर्गात सावंतवाडी, बांदा, माजगाव, दोडामार्ग अशा भागांतून हा मार्ग रेड्डीपर्यंत जाणार आहे. या मार्गावरील प्रवासासाठी ९ तास एवढा कालावधी लागणार आहे.

सिंधुदुर्गातील शेतकऱ्यांनी जमिनी देण्यास विरोध केल्यानंतर मार्गाची दिशा बदलण्यात आली

**नागपूर-रेड्डी शक्तिपीठ महामार्गाच्या नव्या घोषणेमुळे कोकणातील शेतजमिनींचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.**

आणि रेड्डीपर्यंत हा मार्ग विस्तारित करण्यात आला. कोकणातील महत्त्वाच्या दहा बंदरांत रेड्डी बंदराचा समावेश होतो. सिंधुदुर्गातील वेंगुर्ले तालुक्यात हे महत्त्वाचे बंदर आहे. महाराष्ट्राच्या दक्षिण किनारपट्टीवरील शेवटचे गाव म्हणून ते ओळखले जाते. या बंदराचे 'रेवतीपट्टम' हे ऐतिहासिक नाव असून लोहखनिजाच्या निर्यातीसाठी ते प्रासिद्ध आहे. हे बंदर आंतरराष्ट्रीय दर्जाचे करणे असा उद्देश असून रेवस-रेड्डी आणि नागपूर-गोवा अशा दोन महामार्गांनी ते जोडले जाणार आहे. रेड्डी बंदरातून आंबा नैसर्गिक वायू, कोळसा, लोहखनिज निर्यात होते. शक्तिपीठ महामार्ग व्यापारी कॉरिडॉर म्हणूनही महत्त्वाचा ठरणार आहे. १३ जिल्हे ८४ तालुक्यांना जोडणारा हा महामार्ग रेड्डी बंदराला जोडण्याचा नवा अध्याय सुरू झाला आहे. कोकणातील मुंबई-गोवा महामार्ग १४ वर्षे रडत रखडत सुरू आहे. दुसरा एक सागरी महामार्ग रेवस-रेड्डी हा २२ वर्षे रखडलेला आहे, तर तिसऱ्या ग्रीन फिल्ड महामार्गाची घोषणा राज्य सरकारने केली आहे. एका बाजूला नागपूर-रत्नागिरी या महामार्गाचे काम सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला नागपूर-गोवा हा शक्तिपीठ महामार्ग होणार आहे. या असंख्य महामार्गाची झालेली घोषणा. त्यात जात असलेली शेतजमीन त्यामुळे शेतकरी अस्वस्थ आहेत आणि दुसऱ्या बाजूला महामार्गांची एका मागून एक घोषणा सुरूच आहे. त्यामुळे आधी घोषित झालेले महामार्ग कधी पूर्ण होणार, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. कोकणासाठी महत्त्वाच्या मुंबई-गोवा महामार्गाची पूर्ण होण्याची शेवटची तारीख ३० मे आहे. ही सरकारने दिलेली दहावी डेडलाईन आहे. मात्र या डेडलाईनपर्यंतही हा मार्ग पूर्ण होण्याची आशा मावळलेली आहे. एका बाजूला हा महामार्ग पूर्ण होण्याआधीच टोल आकारणीची चर्चा सुरू झाली. टोल घेण्याची तयारीही झाली. त्यात पुन्हा एकदा शक्तिपीठची नवी चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे भविष्यात विरोधाची धार तीव होण्याची शक्यता आहे. विदर्भाचा दगडी कोळसा आणि रेड्डीतील लोहखनिजाचा व्यापार असा शक्तिपीठ महामार्गाचा प्रवास आहे. त्यामुळे त्याचे व्यावसायिक सुसूत्रीकरणही समोर येणे स्वाभाविक झाले आहे.

**शशिकांत सावंत**

# भवानीपूर लढतीकडे लक्ष!

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत, सर्वात लक्षवेधी लढत ही भवानीपूर मतदारसंघात होत आहे.भवानीपूर विधानसभा मतदारसंघात राज्याच्या मुख्यमंत्री आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी या पक्षाच्या उमेदवार आहेत.त्यांच्या विरोधात भाजपातर्फे, पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी उभे आहेत.सुवेंदू अधिकारी हे एकेकाळी ममता बॅनर्जी यांचे उजवे हात होते.२०२१ मध्ये त्यांनी तृणमूल काँग्रेसचा त्याग करून भाजपा मध्ये प्रवेश केला होता.त्यांना धडा शिकविण्यासाठी मग ममता बॅनर्जी यांनी २०२१ च्या विधानसभा निवडणुकीत नंदिग्राम मतदारसंघातून त्यांच्या (सुवेंदू अधिकारी ) विरोधात निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला होता.मात्र सुवेंदू अधिकारी यांनी आपला बालेकिल्ला असलेल्या नंदिग्राम मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता.आता सुवेंदू अधिकारी हे आपल्या नंदिग्राम मतदार संघाबरोबरच,भवानीपूर मतदार संघातूनही विधानसभेची निवडणूक लढत असून त्यांनी ममतांसमोर मोठे आव्हान उभे केले आहे.

पश्चिम बंगाल मधील या दोन बड्या नेत्यांमधील लढतीचे वर्णन 'मदर ऑफ ऑल इलेक्टोरल काँटेस्ट्स'असे केले जात आहे.भवानीपूर विधानसभा मतदारसंघाचा आजवरचा इतिहास लक्षात घेतला तर हा मतदारसंघ संघ पुर्वी काँग्रेसचा बालेकिल्ला होता.या मतदार संघातून काँग्रेसचे नेते आणि पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री सिद्धार्थ शंकर रे हे बऱ्याच वर्षांपूर्वी निवडून आले होते.२०११साली ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसने राज्यातील सत्ताधारी डाव्या आघाडीचा विधानसभा निवडणुकीत पराभव केला आणि डाव्या आघाडीची ३४ वर्षांची प्रदीर्घ राजवट संपुष्टात आणली.नंतर ममता बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील तृणमूल काँग्रेसचे सरकार राज्यात सत्तेवर आले.मात्र तेंव्हा,ममता बॅनर्जी या लोकसभेच्या सदस्य असल्याने,मुख्यमंत्री बनल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्यांना विधानसभेत निवडून येणे गरजेचे होते.ममतांना विधानसभेत निवडून आणण्यासाठी मग भवानीपूर मतदार संघातून विजयी झालेले पक्षाचे उमेदवार सुब्राता बक्षी यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा दिला आणि नंतर झालेल्या पोटनिवडणुकीत तेथून ममता बॅनर्जी विजयी झाल्या.



२०१६ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भवानीपूर मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांनी काँग्रेसच्या उमेदवार दिपा दासमुन्शी यांचा पराभव केला होता.२०२१ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत ममतांनी, आपल्या नेहमीच्या भवानीपूर मतदारसंघातून निवडणूक न लढवता, नंदिग्राम मतदारसंघातून निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला होता.मात्र नंदिग्राममध्ये भाजपाचे उमेदवार सुवेंदू अधिकारी यांनी त्यांचा पराभव केला होता.त्या निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा विजय झाला आणि ममता बॅनर्जी पुन्हा एकदा राज्याच्या मुख्यमंत्री बनल्या.मात्र नंदिग्राम मतदारसंघात त्या पराभूत झाल्याने, त्यांना सहा महिन्यांच्या आत विधानसभेत निवडून येणे गरजेचे होते.

अशावेळी भवानीपूर मतदारसंघातून २८ हजारांच्या मताधिक्याने निवडून आलेले, तृणमूल काँग्रेसचे उमेदवार सोवनदेव भट्टाचार्य यांनी आपल्या आमदारकीचा राजीनामा देऊन,ती जागा, ममता बॅनर्जी यांच्यासाठी मोकळी केली.त्यानंतर झालेल्या पोटनिवडणुकीमध्ये ममता बॅनर्जी या ५८ हजारांच्या मताधिक्याने निवडून आल्या.मात्र २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत कोलकाता दक्षिण लोकसभा मतदारसंघात येणाऱ्या भवानीपूर विधानसभा क्षेत्रात,तृणमूल काँग्रेसच्या विजयी उमेदवाराला फक्त ८ हजाराचे मताधिक्य मिळाले होते.ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात घ्यायला हवी.इतकेच नव्हे तर भवानीपूर विधानसभा क्षेत्रात येणाऱ्या एकूण आठ वॉर्ड्सपैकी पाच वॉर्डांत भाजपाला मताधिक्य मिळाले होते, तर तृणमूल काँग्रेसला फक्त तीन वॉर्डांत मताधिक्य मिळाले होते.ममतांचे निवासस्थान असणारा कालीघाट हा विभाग भवानीपूर मतदारसंघात येतो.या मतदारसंघातील ४२ टक्के मतदार हे बंगाली हिंदू आहेत.३४ टक्के मतदार हे बिगर बंगाली हिंदू आहेत.२४ टक्के मतदार हे मुस्लिम आहेत.या मतदार संघातील हिंदू मतदारांची मेजॉरिटी लक्षात घेऊनच सुवेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांना या मतदारसंघातून आव्हान देण्याचा निर्णय घेतला असावा.

भाजपाने भवानीपूर मतदारसंघात बूथ लेव्हलवर मोठे काम केले असून, मतदार संघातील जातीपातीची समिकरणे लक्षात घेऊन, भाजपाने आपली रणनीती आखली आहे.तृणमूल काँग्रेसने या मतदारसंघातील आपल्या प्रचारात बंगाली अस्मितेच्या मुद्यावर जोर दिला आहे.शिवाय ममता बॅनर्जी यांचे या मतदारसंघात निवासस्थान असल्याने ममतांचा 'द डॉटर ऑफ द हाऊस' असा उल्लेख करून,भवानीपूर मतदारसंघातील मतदारांच्या भावनांना हात घालण्याचा प्रयत्न पक्षाने केला आहे.भाजपाच्या प्रचारचा जोर हा भवानीपूर मतदारसंघात बहुसंख्य असलेल्या हिंदू मतदारांना आपल्याकडे वळवण्यावर आहे.त्याशिवाय या मतदार संघात बिगर बंगाली भाषिकांची संख्या लक्षणीय असल्याने, त्यांना आपल्याकडे मोठ्या प्रमाणात वळवण्यासाठी,भाजपा कडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत.हा बिगर बंगाली मतदार, साधारणपणे नेहमी भाजपा बरोबर राहिला आहे. एसआयआर प्रक्रियेत भवानीपूर मतदारसंघातील ५१ हजारांपेक्षा जास्त मतदारांची नावे मतदार यादीतून वगळण्यात आली आहेत.याचा फायदा कोणाला होतो आणि नुकसान कोणाचे होते,ते पहावे लागेल.ममता बॅनर्जी यांच्यासाठी भवानीपूर मतदारसंघातील लढत अतिशय प्रतिष्ठेची आहे.जेंव्हा सुवेंदू अधिकारी यांना ममता बॅनर्जी यांच्या विरोधात,भवानीपूर मतदार संघातून उतरवण्याचा निर्णय भाजपाने घेतला तेंव्हा,ममतांना त्यांच्या मतदार संघात गुंतवून ठेवण्याचा डाव, त्यामागे असावा असे वाटले होते.परंतु या मतदार संघात गेले काही दिवस सुवेंदू अधिकारी जी मेहनत घेत होते,ती पाहता,भाजपा या निवडणुकीबाबत गंभीर असल्याचे लक्षात आले.नंदिग्राम मतदारसंघात गेल्या खेपेस ममता बॅनर्जी यांना पराभूत करणारे ,सुवेंदू अधिकारी हे जायंट किलर ठरले आहेत.मात्र ममता बॅनर्जी यांना कमी लेखण्याची चूक करता कामा नये.भवानीपूर मतदारसंघ हा त्यांचा गड आहे आणि तेथे त्यांचा पराभव करणे वाटते तेवढे सोपे नाही.

**अभय गोखले**

## मराठीचा लढा 'तारीख पे तारीख'

परिवहन मंत्र्यांसोबतची बैठक पार पडली, मात्र मराठी भाषेच्या सक्तीबाबतचा निर्णय पुन्हा एकदा टांगणीवर लागला आहे. तंत्रज्ञानाच्या युगात ॲप्स आणि सेवांमध्ये मराठी अनिवार्य करणे ही केवळ भाषिक अस्मितेची बाब नसून, ती सामान्य मराठी माणसाच्या सुविधेचा हक्क आहे. खाजगी कंपन्यांच्या तांत्रिक अडचणींचे कारण पुढे करून निर्णय लांबणीवर टाकणे अनाकलनीय वाटते. उद्या होणाऱ्या निर्णयाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष आहे. सरकारने आता केवळ चर्चेचे गुऱ्हाळ न थांबवता, ठोस कायदेशीर आराखडा सादर करण्याची गरज आहे. जर उद्याही स्पष्ट भूमिका घेतली गेली नाही, तर प्रशासकीय इच्छाशक्तीवर प्रश्नचिन्ह निर्माण होईल. भाषेचा आदर हा केवळ कागदावर न राहता तो व्यवहारात आणण्यासाठी सरकारने आता 'करो किंवा मरो'ची भूमिका घेणे अपेक्षित आहे. निर्णय उद्या होईलच, पण तो केवळ आश्वासन नसावा, तर कृती असावी.

**विरेंद्र सोनवणे**

## पाच वर्षात जगात श्रीमंतांची संख्या १.६२ लाखांवर

सध्या जगात दर २४ तासाला ८९ नवीन अति श्रीमंत तयार होत आहेत.'नाईट फ्रँक'च्या रिपोर्ट नुसार ही संख्या २०२६ पर्यंत सात लाख तेरा हजार ६२६ वर पोहचली आहे.भारतात सुपर रिच व्यक्तींची संख्या २०२१ मधील सुमारे १२ हजाराहून वाढून २०२६ मध्ये १९८७७ झाली आहे. गेल्या पाच

**संवाद**

वर्षात सुपर रिच मध्ये ६३ टक्के वाढ झाली आहे.२०३१ मध्ये ही संख्या वाढून २५२१७ पर्यंत पोहचेल.भारतात सध्या २०७ अब्जाधीश आहेत २०३१ मध्ये ही संख्या ५१ टक्क्यांनी वाढून ती ३१३ होणार आहे. जगात इंडोनेशियामध्ये श्रीमंतांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ८२ टक्क्यांनी वाढेल.अमेरिका सुद्धा काही कमी नाही.जगातील अति श्रीमंत मध्ये २०२१ मध्ये अमेरिकेचा वाटा ३३ टक्के होता.तो वाढून आता ३५ टक्के झाला आहे गेल्या चार वर्षात जेवढे नवीन श्रीमंत तयार झाले त्यापैकी एकट्या अमेरिकेचे ४१ टक्के आहेत जगात एकूण अब्जाधीश ३११० एवढे आहेत.

**शांताराम वाघ**

## ट्रम्प यांच्यावरील हल्ला संशयास्पद

२५ एप्रिलच्या रात्री व्हाईट हाऊसचे वार्तांकन करणाऱ्या जगभरातील पत्रकारांसाठी हॉटेल हिल्टन येथे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्नेहभोजनाचे आयोजन केले होते. या स्नेहभोजनाच्या कार्यक्रमात डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर गोळीबार करून त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला.



कॅलिफोर्नियातील थॉमस ॲलन या ३१ वर्षीय तरुणाने त्यांच्यावर जीवघेणा हल्ला केला.सुदैवाने ते हल्ल्यात वाचले या हल्ल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.या हल्ल्यानंतर जगातील सर्वात सुरक्षित व्यक्ती म्हणून समजल्या जाणाऱ्या अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षा व्यवस्थेत असलेल्या त्रुटी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. ट्रम्प यांच्यावर झालेला हा पहिला जीवघेणा हल्ला नाही यापूर्वी आठ वेळा ट्रम्प यांच्यावर असा जीवघेणा हल्ला झाला आहे. अर्थात प्रत्येक वेळी ते हल्ल्यातून सुखरूप बचावतात त्यामुळे हे हल्ले डोनाल्ड ट्रम्प स्वतःच घडवून आणतात अशी चर्चा अमेरिकन प्रसारमाध्यमात आहे. ज्या ज्या वेळी डोनाल्ड ट्रम्प यांच्या विरोधात जनमत तयार होते किंवा त्यांची लोकप्रियता कमी होते त्या त्या वेळी त्यांच्यावर असा जीवघेणा हल्ला होतो हा एक अजब योगायोग आहे. डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर पहिला हल्ला ते निवडणुकीच्या प्रचार करताना झाला. ज्यावेळी त्यांच्यावर हल्ला झाला त्यावेळी निवडणूक सर्वे मध्ये ते पिछाडीवर पडले होते.त्यांच्यावर हल्ला झाल्यानंतर त्यांना प्रचंड सहानुभूती मिळाली व त्यानंतर त्यांनी निवडणूक मोठ्या मताधिक्याने जिंकली.आताही त्यांची लोकप्रियता कमालीची ढासळली आहे. त्यांनी इराणवर ज्या प्रकारे हल्ला केला तो अमेरिकन जनतेला आवडलेला नाही. इराणवर हल्ला केल्या नंतर इराणने ज्या पद्धतीने प्रतिहल्ला केला त्यावरून अमेरिकेची जगभरात नाचक्की झाली. ट्रम्प यांच्यामुळेच अमेरिकेची जगभरात नाचक्की झाली असे म्हणत अमेरिकन जनता ट्रम्प यांच्या विरोधात रस्त्यावर उतरली. रस्त्यावर उतरून करोडो लोकांनी त्यांचा निषेध केला. सध्या डोनाल्ड ट्रम्प यांची लोकप्रियताही कमालीची ढासळली आहे आणि नेमक्या याच वेळेस हा हल्ला झाल्याने लोक या हल्ल्याविषयी शंका घेत आहेत.

**श्याम ठाणेदार**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# जनगणनेतील बदल्या रद्द कर्मचाऱ्यांमध्ये अस्वस्थता

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या आटोपून आता दहा दिवस लोटले आहे. दरम्यान, जनगणनेसाठी 'ड्यूटी' लागलेल्या दोन विस्तार अधिकारी, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक, अशा चौघांच्या बदल्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर उर्वरित कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश सोमवारी (ता. २७) निर्गमित करण्यात आले आहे. बदल्या झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये चांगलीच अस्वस्थता निर्माण झाली आहे.

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बदल्या साधारणतः मे महिन्यात होतात. यंदा मात्र एप्रिल महिन्यातच बदल्यांचे सत्र आटोपून घेण्यात आले. या बदल्यांचे आदेश निर्गमित करण्यापूर्वीच बदल्यांच्या अनुषंगाने शासनाचे पत्र धडकले. यात पत्रानुसार जनगणनेत 'ड्यूटी' लागलेल्या कर्मचाऱ्यांची बदली रद्द करावी, असे स्पष्ट करण्यात आल्याने इतरही कर्मचाऱ्यांना बदल्यांतून सूट मिळेल, असे वाटत होते. मात्र, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी बदल्या जैसे थे ठेवण्याचा निर्णय घेतला. केवळ बदली झालेल्या कर्मचाऱ्यांची जनगणनेत 'ड्यूटी' लागली अथवा नाही, याची माहिती संकलित करण्यात आली होती. ही माहिती नुकतीच प्राप्त झाली आहे. यामध्ये दोन विस्तार अधिकारी सांख्यिकी, एक वरिष्ठ सहाय्यक आणि एक कनिष्ठ सहाय्यक, अशा चौघांचा समावेश आहे. या चौघांपैकी तिघांची जनगणनेत 'ड्यूटी' लागलेली आहे. तर एकाची जागेवर दुसऱ्याची बदली झाल्यामुळे ती रद्द करण्यात आली आहे. दरम्यान, बदली झालेल्या संपूर्ण कर्मचाऱ्यांच्या कार्यमुक्तीची ऑर्डर काढण्यात आल्या असून, बदलीच्या ठिकाणी कर्मचाऱ्यांना रुजू व्हावे, असे स्पष्ट आदेश देण्यात आले आहे. एकंदरीत यंदा बदली सत्रांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड अस्वस्थता असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

## शेतातील साहित्य जळून खाक

जनमाध्यम प्रतिनिधी

नेर : शेतशिवारातील वाकलेला विद्युत पोल पडल्याने शॉटसर्कीमुळे भीषण आग लागली. यामध्ये शेतातील सिंचनाच्या साहित्यासह इतर शेती उपयोगी साहित्य जळून खाक झाले. ही गंभीर घटना २६ एप्रिल रोजी तालुक्यातील मालखेड बु. येथे घडली. तालुक्यातील मालखेड बु. शिवारात गट क्र.३० व ३२ मध्ये संदेश रघुनाथ माहुरे, हेमंत वसंत माहुरे याची शेती आहे. या शेतातील विद्युत पोल गेल्या अनेक दिवसांपासून पूर्णपणे वाकलेले आहे. याबाबत वीज वितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना तोंडी व लेखी तक्रारी केल्या आहेत. परंतु महावितरण कर्मचाऱ्यांनी दखल घेतली नाही. अशातच २६ एप्रिल रोजी दुपारी अचानक आलेल्या वादळाने वाकलेले विद्युत पोल खाली पडल्याने शॉटसर्किट होऊन शेतात आग लागली. या आगीत शेतातील स्प्रिंकलर संच, पाईप, टाक्या व इतर शेतीउपयोगी साहित्य या आगीत भस्मसात होऊन दोन्ही शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान झाले.

# शासकीय कामे वेळेत करा
## राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक

जनमाध्यम प्रतिनिधी



पुसद तालुक्यातील विविध विभागांच्या कामांचा राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक यांनी पुसद येथे सोमवारी सविस्तर आढावा घेतला. वन विभागाच्या कार्यालयात पार पडलेल्या या बैठकीस नगराध्यक्ष मोहिनी इंद्रनील नाईक, उपविभागीय अधिकारी आशिष बिजवल, उपवनसंरक्षक श्री स्वामी, तहसीलदार रेखा वाणी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी आणि पुसद तालुक्यातील आठ जिल्हा परिषद सर्कलचे पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक यांनी अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश देत शासकीय कामे वेळेत आणि जबाबदारीने पूर्ण करणे आवश्यक असून कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा सहन केला जाणार नाही. कामात हलगर्जीपणा आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला. यावेळी पुसद तालुक्यातील रस्त्यांच्या दुरवस्थेचा मुद्दा महत्वाचा ठरला. रस्त्यांची कामे तात्काळ सुरू करावीत तसेच दुरुस्तीची प्रलंबित कामे विलंब न लावता पूर्ण करावीत, अशा सूचना त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

कामात दिरंगाई करणाऱ्या ठेकेदारांना काळ्या यादीत टाकण्याचेही निर्देश त्यांनी दिले. याशिवाय, "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर" अभियान (टप्पा क्र. १) प्रभावीपणे राबविणे, मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजनेअंतर्गत विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीचा आढावा, मान्सूनपूर्व तयारी व आपत्ती व्यवस्थापन, एसआय आर कार्यक्रम, जनगणना कार्यक्रमाची तयारी, अवैध सावकारी प्रकरणांवर नियंत्रण, पीक कर्ज वाटप आणि खरीप हंगामपूर्व नियोजन या विविध मुद्द्यांवर सखोल चर्चा करण्यात आली. सर्व विभागांनी समन्वय साधून कामे गतीने पूर्ण करण्यावर भर देत नागरिकांच्या समस्या तात्काळ सोडविण्याच्या सूचना राज्यमंत्री ना. इंद्रनील नाईक यांनी दिल्या. प्रशासन अधिक कार्यक्षम बनवून विकासकामांना गती देण्याला प्राधान्य असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

## • वेचक

### जिल्हाधिकारी कार्यालयात 'सेवा हक्क दिन' उत्साहात

यवतमाळ - महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ चा अंमलबजावणीला ११ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्हा प्रशासनाच्या वतीने मंगळवारी आयोजित 'सेवा हक्क दिन' उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहात आयोजित या कार्यक्रमास आमदार किसन वानखेडे, नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शनी उईके, सहायक जिल्हाधिकारी रेवैय्या डोंगरे, उपजिल्हाधिकारी देशपांडे, पुनम अहिरे, उपजिल्हाधिकारी अविनाश शिमटे, तहसिलदार राहुल मोरे, प्र.पोलीस उपअधिक्षक सुनील हुड यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आमदार किसन वानखेडे म्हणाले की, आपण सामान्य व्यक्तींच्या सेवेसाठी कार्यतत्परत आहोत. काम करत असतांना शेतकरी, महिला, युवक, सामान्य नागरिकांची वेळेवर कामे तात्काळ केली पाहिजे. सामान्य लोकांची कामे वेळेत केल्या तर अडचणी येणार नाही. प्रशासनाने पारदर्शकता, उत्तरदायित्व, कालमर्यादा आणि कार्यक्षमता या चार स्तंभावर काम केले पाहिजे, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या. लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत विहित काल कालमर्यादेत सेवा देणाऱ्या उत्कृष्ट अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. यामध्ये पोलीस अधिक्षक कुमार चिंता, सहायक जिल्हाधिकारी रेवैय्या डोंगरे, जिल्हा पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम, कार्यकारी अभियंता विक्रांत शिरभाते, तहसीलदार अमित भोईटे, दुय्यम निरिक्षक (कामगार) रविंद्र जतकर, विजय गुल्हाने, दुय्यम निरिक्षक (राज्य उत्पादन शुल्क) चंद्रकांत नागुलवाड, जिल्हा प्रकल्प अधिकारी फिरोज पठाण यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी यांनी केले. यावेळी त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम व त्याअंतर्गत सुरु असलेल्या सेवांची माहिती दिली.

### नेर येथे कृषी विक्रेत्यांचा एल्गार

नेर - शासनाच्या 'साथी' पोर्टलवरील नवनवीन प्रणाली आणि प्रशासनाने लादलेल्या जाचक अटींच्या विरोधात जिल्हाभरातील कृषी केंद्र चालकांनी आजपासून बेमुदत संप पुकारला आहे. यामुळे सर्व कृषी केंद्रे कडकडीत बंद राहिली आहेत. बियाणे विक्रीसाठी अनिवार्य केलेल्या क्लिष्ट प्रणालीला विरोध करण्यात आला. खत कंपन्यांकडून विक्रेत्यांवर केली जाणारी खतांची सक्ती, अनधिकृत एजंटमार्फत होणारी अवैध कीटकनाशके व एचटीबीटी बियाणे विक्रीवर कारवाई करण्यात यावी, बियाणे व कीटकनाशकांबाबतच्या नवीन कडक नियमावलीचा निषेध करण्यात आला. या संपात कृषी विक्रेता युनियनचे अध्यक्ष राजेश सिंगवी यांच्यासह अश्रफ लकडखुट्टा, सलीम मकवानी, मिलन राठोड, मनोज बनसोड, सतीश चव्हाण, अजीम शहा, मनोज जयस्वाल आणि इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. शासनाने मागण्या मान्य करेपर्यंत हा लढा सुरूच ठेवण्याचा निर्धार विक्रेत्यांनी व्यक्त केला आहे

# ज्येष्ठ स्वतंत्रता सेनानी जवाहरलाल दर्डा यांच्या पुतळ्याच्या अनावरण सोहळ्यास माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांची प्रमुख उपस्थिती

जनमाध्यम प्रतिनिधी



यवतमाळ - विद्या प्रसारक मंडळद्वारा संचालित स्वतंत्रता सेनानी जवाहरलाल दर्डा कॉलेज ऑफ लॉ यवतमाळ मध्ये एका ऐतिहासिक सोहळ्यात ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा ऊर्फ बाबूजी यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. येत्या शनिवारी, दि. 2 मे 2026 रोजी सायंकाळी 6:00 वाजता, यवतमाळ येथील गोधनी मार्गावरील अमोलकचंद महाविद्यालयाच्या परिसरात हा सोहळा संपन्न होईल. भारताचे माजी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांच्या शुभहस्ते पुतळ्याचे अनावरण होणार आहे.

या कार्यक्रमाला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे वरिष्ठ प्रशासकीय न्यायाधीश न्यायमूर्ती अनिल किलोर, यवतमाळ जिल्ह्याच्या पालक न्यायाधीश न्यायमूर्ती वृषाली जोशी आणि न्यायमूर्ती नंदेश देशपांडे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच यवतमाळचे मुख्य जिल्हा व सत्र न्यायाधीश शेखर मुनघाटे यांचीही यावेळी सन्माननीय उपस्थिती असेल. तसेच या सोहळ्याला राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते, उच्च शिक्षण संचालक (पुणे) डॉ. शैलेंद्र देवळणकर, यवतमाळ वाशीम चे खासदार श्री. संजय देशमुख, बार कौन्सिल ऑफ इंडिया चे सदस्य ॲड. आशिष देशमुख, यवतमाळचे आमदार श्री. बाळासाहेब मांगुळकर आणि यवतमाळच्या नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आणि लोकमत मीडिया ग्रुपचे चेअरमन, माजी खासदार डॉ. विजय दर्डा भूषविणार आहेत. या प्रसंगी यवतमाळ शहरातील नामांकित निवडक वरिष्ठ वकिलांचे तसेच महाविद्यालयातील निवडक माजी विद्यार्थी जे जिल्हा न्यायाधीश पदावर कार्यरत आहे यांचा सत्कार करण्याचा मानस आयोजाकांद्वारे व्यक्त करण्यात आला आहे. स्वातंत्र्य सेनानी जवाहरलाल दर्डा विधी महाविद्यालयाच्या वतीने या सोहळ्याचे नेटके नियोजन सुरू आहे.

या सोहळ्याला यवतमाळकरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन विद्या प्रसारक मंडळाचे सचिव सीए प्रकाश चोपडा, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजेश मुनोत, ज्येष्ठ अधिवक्ता ॲड. फिरदोस मिर्झा, आणि विद्या प्रसारक मंडळाचे सर्व सदस्य, कर्मचारीने केले आहे. पत्रकार परिषदला विद्या प्रसारक मंडळ चे संचालक माजी आमदार कीर्ती गांधी. किशोर बाबु दर्डा.आमदार बाळासाहेब मागूळकर डॉ. ललित निमोदिया ॲंड प्रवीण जानी ॲंड पंकज ओसवाल आदी उपस्थित होते

## बुद्ध पौर्णिमानिमित्त एक दिवसीय विपश्यना शिबिर

पांढरकवडा - बुद्ध पौर्णिमा निमित्त सारिपुत्त चॅरिटेबल ट्रस्ट, घाटंजी यांच्या वतीने जुन्या विपश्यना साधकांसाठी एक दिवसीय विपश्यना शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर शनिवार,२ मे २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत पार पडणार आहे. शिबिराचे ठिकाण विपश्यना सेंटर पाथरी (ता. पांढरकवडा, जि. यवतमाळ) असे आहे. या शिबिरात केवळ त्या साधकांना सहभागी होता येणार आहे ज्यांनी यापूर्वी एक किंवा अधिक विपश्यना शिबिर पूर्ण केले आहे. ध्यान साधनेचा अनुभव अधिक सखोल करण्यासाठी आणि आत्मिक शांती मिळवण्यासाठी ही एक उत्तम संधी असल्याचे आयोजकांनी सांगितले. "सम्मग्गन तपो सुखो" या तत्वावर आधारित या शिबिरातून साधकांना ध्यान साधनेत अधिक गती मिळणार असून, शिबिरस्थळी नाश्ता व जेवणाची व्यवस्था करण्यात आली आहे. शिबिराबाबत अधिक माहितीसाठी इच्छुकांनी खालील क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाशिवाय राज्यातील 'मेगा भरती' प्रक्रिया राबवू नये

जनमाध्यम प्रतिनिधी

महागाव - अनुसूचित जातींमधील आरक्षणाचा लाभ सर्व घटकांपर्यंत समतोल आणि न्याय्य पद्धतीने पोहोचण्यासाठी उपवर्गीकरण अपरिहार्य असल्याचा ठाम मुद्दा सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार लखन लोंढे यांनी उपस्थित केला आहे. उपवर्गीकरणाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत राज्य सरकारने 'मेगा भरती' राबवू नये, अशी स्पष्ट मागणी त्यांनी मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनातून केली. लोंढे यांनी आपल्या निवेदनात नमूद केले की, उपवर्गीकरणासाठी अचूक आणि विश्वासार्ह 'एम्पिरिकल डेटा' तयार करणे अत्यंत आवश्यक आहे. १९६१ च्या जनगणनेपासून ते अद्ययावत उपलब्ध आकडेवारीचा आधार घेत अनुसूचित जातींतील विविध पोटजातींची लोकसंख्या, त्यांची सामाजिक व शैक्षणिक स्थिती यांचा सखोल आणि तुलनात्मक अभ्यास करण्यात यावा, असे त्यांनी सुचवले. यासंदर्भात नियुक्त न्यायमूर्ती अनंत बदर समितीच्या अहवालात अनुसूचित जातींतील विविध पोटजातींच्या वास्तव स्थितीचे विश्लेषण करण्यात आले असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) यांच्या माध्यमातून हा अभ्यास पूर्ण करण्यात आल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच, उपवर्गीकरण करताना केवळ लोकसंख्या हा निकष न ठेवता संबंधित घटकांचा प्रत्यक्ष सामाजिक व शैक्षणिक मागासलेपणा हा मुख्य आधार मानणे गरजेचे असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

अनुसूचित जातींतील सर्व घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्य सरकारने उपवर्गीकरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी आणि त्यानंतरच 'मेगा भरती' राबवावी, अशी ठाम भूमिका लखन लोंढे यांनी मांडली आहे.

# ढाणकी नगरपंचायतचा कोंडवाडा बनला मृत्यूवाडा !
## कोंडवाड्यात चारा-पाण्याविना गाढवाचा मृत्यू

जनमाध्यम प्रतिनिधी


### ढाणकी न.पं. चा भोंगळ कारभार बेतला गाढवाच्या जीवावर



ढाणकी - शहरात दिनांक २८ एप्रील रोजी एक गंभीर आणि अमानवीय घटना घडली. येथील कोंडवाड्यात एका गाढवाचा मृत्यू झाला आहे. सदर गाढवाला गेल्या ४ दिवसांपासून पुरेसा चारा आणि पाणी देण्यात आले नव्हते. म्हणूनच त्याचा मृत्यू झाला असे प्रत्यक्षदर्शी सांगत होते.

प्राण्यांची देखभाल करण्याची जबाबदारी असलेल्या कर्मचाऱ्यांच्या आणि व्यवस्थापनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे या मुक्या प्राण्याचा तडफडून मृत्यू झाला. हे कृत्य 'प्राण्यांवरील क्रूरता प्रतिबंधक कायदा, १९६०' आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांचे उल्लंघन आहे. सरकारी/सार्वजनिक कोंडवाड्यात प्राण्यांना अशा प्रकारे वागवणे हा कायदेशीर गुन्हा आहे. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन दोषींवर कडक कारवाई व्हावी, जेणेकरून भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही. विशेष म्हणजे नगरपंचायत प्रशासनाने दोन गाढव कोंडवाड्यात टाकली होती. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला व एक अर्ध मेल्या अवस्थेत होते. या परिस्थितीतही जिवंत असलेल्या गाढवाचा दंड नगरपंचायत प्रशासनाने सदर गाढवाच्या मालकाकडून वसूल केला. अन जे गाढव मृत पावले त्याची जबाबदारी कोण घेणार ? ज्यावेळी एक गाढव गतप्राण झाले होते व एक अत्यवस्थ होते, त्यावेळी जे गाढव गतप्राण झाले त्याचे शव विच्छेदन करणे आवश्यक असताना, नगरपंचायत चा कोणताही कर्मचारी व अधिकारी तेथे फिरकलाही नाही. मृत पावलेल्या गाढवाचे शवविच्छेदन करण्याची माणुसकी सुद्धा भावनाशून्य नगरपंचायत प्रशासनाने दाखवली नाही.

## माता कन्यका परमेश्वरी जन्मोत्सव उत्साहात साजरा



जनमाध्यम प्रतिनिधी

घाटंजी - २६ एप्रिल रोजी आर्य वैश्य समाज घाटंजी येथे माता कन्यका जन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी सर्व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम माता कन्याकेच्या प्रतिमेचे पूजन समाजाचे अध्यक्ष श्री मनोजभाऊ उत्तरवार व महिला कार्यकारणीच्या अध्यक्षा सौ. साधनाताई माडुरवार आणि सौ. कांचनताई मारावार यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. व विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व महिलांनी गरबा खेळून कार्यक्रमाचा आनंदही लूटला.या कार्यक्रमात आर्य वैश्य समाज बांधवांना अमृत योजने बद्दल सविस्तर माहिती श्री परीक्षीत शर्मा (व्यवस्थापक, अमृत संस्था, यवतमाळ)यांनी दिली. तसेच महिलांच्या कला गुणांना वाव मिळावा यासाठी आरतीचे ताट डेकोरेशन व फ्लॉवर डेकरेशन या स्पर्धा घेण्यात आल्या. आरतीचे ताट सजावट स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ स्वाती बुक्कावार, द्वितीय क्रमांक सौ अनुश्री भांडारवार व तृतीय क्रमांक सौ प्रीती अंजीकर यांनी मिळविला तर फ्लॉवर डेकरेशन स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ स्मिता नार्लावार, द्वितीय क्रमांक सौ स्वप्नाली भास्करवार, तृतीय क्रमांक सौ सोनाली चिंतावार यांनी मिळविला.

## कृषी केंद्रचालकांचा बंदला पाठिंबा

यवतमाळ - अनधिकृत एचटीबीटी बियाणे विक्रीवर निर्बंध आणण्यात यावे, साथी ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्रीची जाचक अट रद्द करण्यात यावी. या मागण्यांसाठी घाटंजीसह तालुक्यातील सर्वच कृषी केंद्र चालकांनी बंदला पाठिंबा दिला आहे. या अनुषंगाने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे. या आंदोलनांतर्गत खते, बियाणे कीटकनाशकांची खरेदी विक्री पूर्णपणे बंद ठेवण्यात आली, तसेच कोणतीही मालवाहतूक केली जाणार नाही, असा इशारा संघटनेने दिला आहे. शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल. हंगामाच्या तोंडावर कृषी केंद्रे बंद राहिल्यास त्याचा थेट परिणाम शक्यता आहे.

# विविध मागण्यांबाबत पुकारला एल्गार, कृषीसेवा केंद्र बेमुदत बंद

जनमाध्यम प्रतिनिधी



घाटंजी - अनधिकृत एच टी बी टी बियाणे विक्रीवर निर्बंध आनन्यात यावे, साथी ॲपच्या माध्यमातून बियाणे विक्री अनिवार्य करण्यात आली आहे. ही जाचक अट रद्द करण्यात यावी. यासह विविध मागण्याच्या पूर्ततेसाठी यवतमाळ जिल्हा कृषी साहित्य विक्रेता असोसिएशनने माफदाच्या नेतृत्वात बेमुदत बंद पुकारला आहे. यामुळे आजपासून घाटंजी शहरासह तालुक्यातील सर्व कृषी केंद्र चालकांनी बंद पुकारला आहे. जिल्ह्यातील १२५० कृषीसेवाकेंद्र बंद राहणार आहे. याचा फटका शेतकऱ्यांना बसण्याची शक्यता आहे. खत कंपन्याकडुन कृषी सेवा केंद्रावर लिंकिंग लादली जात आहे. यासंदर्भात कृषी मंत्र्याकडे निवेदन सादर करण्यात आले. बैठका झाल्या यानंतरही लिंकिंगचा प्रश्न अजूनही कायम आहे. हे लिंकिंग थांबविण्यात यावे, यासह अनेक मागण्यांचा समावेश आहे.

चुकीच्या नियमाने दुकानदार अडचणीत: अनाधिकृत बीटी बियाण्यांची घुसखोरी सूरू झाली आहे. यातच काही जाचक नियमही लादले जात आहे. या चुकीच्या नियमामुळे दूकानदार चांगलेच अडचणीत आले आहेत. या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी कृषी सेवा केंद्र चालकांनी बंद पुकारला आहे. खरेदी-विक्री बंद ठेवणार या आंदोलनांतर्गत खते, बियाणे कीटकनाशकांची खरेदी विक्री पूर्णपणे बंद ठेवण्यात आली, तसेच कोणतीही मालवाहतूक केली जाणार नाही, असा इशारा संघटनेने दिला आहे. शासनाने या मागण्यांकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर हे आंदोलन अधिक तीव्र केले जाईल. हंगामाच्या तोंडावर कृषी केंद्रे बंद राहिल्यास त्याचा थेट परिणाम शेतीकामांवर आणि शेतकऱ्यांवर होण्याची शक्यता आहे. घेतलेल्या नमुने व या नंतर घेणा-या नमुन्याचे पैसे त्वरित मिळणेबाबत. खत विक्रेत्यांवर लादलेले जाचक नियम रद्द करावेत.खत कंपन्यांकडून होणाव्या लिंकिंग पद्धतीचा विरोध.अनधिकृत BT/HT बियाणे विक्रीवर बंदी आणावी.कीटकनाशके व खतांची अनधिकृत एजंटमार्फत विक्री थांबवावी.नवीन बियाणे व कीटकनाशक कायद्यातील अन्यायकारक तरतुदी रद्द कराव्यात.

ऑनलाईन / ॲपद्वारे बियाणे विक्री अनिवार्य करण्यास विरोध. किरकोळ दुकानांवर दुकानदारावर होणारी कडक कारवाई थांबवावी. यासह विविध मागण्यांबाबत तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले व दि.२७ एप्रिल पासून बेमुदत संप सुरू झाला आहे यामुळे अनेक शेतकऱ्यांना याचा फटका बसणार आहे तेव्हा शासनाने त्वरित लक्ष पुरवायला हवे अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

> "साथी ॲप व कीटकनाशक कायद्याचा वापर करून केवळ विक्रेत्यांना वेठीस धरण्यापेक्षा, या यंत्रणेद्वारे कंपन्यांच्या गुणवत्ता मानकांवर शाश्वती आणावी. तसेच परराज्यातून येणाऱ्या HTBT बियाणे आणि बनावट कीटकनाशकांवर कडक नियंत्रण आणावे, जेणेकरून शेतकऱ्यांची फसवणूक होणार नाही याची काटेकोर काळजी घेतली जाईल." **- भावेश ग़ंडेचा, कृषी विक्रेते घाटंजी**

या संपामध्ये घाटंजी शहरासह तालुक्यातील सर्व कृषी केंद्रधारकांचा समावेश आहे. यावेळी प्रमोद हांडे, संजय पालतेवार, भावेश गंडेचा, राजू इंगोले, निलेश निलावार, अक्षय मुंगीनवार, नकुल चौधरी, नितीन भोयर, मंगेश बोंडे, पियुष वातीले, भारत पोतराजे,सह अन्य कृषी विक्रेत्यांचा समावेश होता.

# छत्रपती राजे संभाजी महाराज उद्यानातील संगीतकारंजे पडले बंद, अधिका-यांचे दुर्लक्ष

जनमाध्यम प्रतिनिधी



उमरखेड़ - येथील नगर परिषदेच्या राजे संभाजी महाराज उद्यानातील संगीत कारंजे बंद असून या परिसरात अनेक वस्तूची तूट फूट झाली आहे, शहराच्या सौंदर्याचे आणि आकर्षणाचे केंद्र असलेले हे कारंजे आता प्रशासनाच्या दुर्लक्ष आणि निष्काळजीपणाची कहाणी सांगत आहे.उद्यानाच्या देखभालीसाठी जबाबदार असलेले अधिकारी आणि कर्मचारी त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचे दिसते. या उद्यानातील संबंधित अधिकारी कधीही हजर नसतात तसेच परिसरातील अनेक मूल्यवान वस्तू खराब होताना दिसत आहे जबाबदार अधिकाऱ्यावर कारवाई कवा होणार अशा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहे, तसेच कारंजाचे अनेक भाग खराब झाले आहेत आणि त्याची अवस्था दिवसेंदिवस खंडरासारखी होत आहे.हे संगीत कारंजे २०२० मध्ये पूर्ण झाले होते आणि २०२३ मध्ये त्याचे उद्घाटन झाले, उद्घाटन झाल्यानंतर फक्त तीन वर्षे हे कारंजे सुरू होते व यावर्षी पूर्णपणे बंद पडले आहे. दररोज उद्यानाला भेट देणाऱ्या पर्यटकांसाठी मनोरंजन आणि आकर्षणाचा केंद्र असलेले हे कारंजे आता दुर्लक्षाचा बळी ठरले आहे.उन्हाळ्याच्या तप्त वातावरणात दिलासा मिळवण्यासाठी लोक या उद्यानात गर्दी करतात, परंतु कारंजाची दयनीय अवस्था त्यांना निराश करत आहे. स्थानिक रहिवाशांनी नगर परिषद प्रशासनाकडे दुरुस्ती आणि नियमित देखभालीची मागणी केली आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

भर वस्तीतील

# नवीन ‘कचरा संकलन केंद्र’ ठरताहेत आरोग्याकरीता धोकादायक

**अमरावती/का.प्र.**

महापालिका प्रशासनाने राजापेठ येथे नवीन कचरा डेपो सुरू केला आहे. या कचरा संकलन केंद्राकडे राजापेठ पोलीस ठाण्यापासून वळावे लागते. हा मार्ग नेहमी वर्दळीचा असतो आणि बाजूलाच शाळा असल्याने वाहतुकीची कोंडी होते. मनपाच्या झोन ऑफिसमध्ये आणि शेजारच्या हॉटेलमध्ये ये-जा करणाऱ्यांनाही याचा त्रास होतो. कचरा गाड्यांमधून कचरा मुख्य रस्त्यावर सांडतो, ज्यामुळे घाण साचते आणि नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. त्यामुळे हा कचरा डेपो तात्काळ बंद करण्याची मागणी जोर धरत आहे.



अमरावती शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या या जागेवर व्यापारी संकुल उभारून पालिकेला उत्पन्नाचा नवा स्त्रोत मिळू शकला असता. मात्र, त्याच जागेवर कचरा डेपो सुरू केल्याने नागरिकांमध्ये असंतोष खदखदत आहे.हा नवीन कचरा डेपो राजापेठ पोलीस ठाणे, मनपाचे व्यापारी संकुल आणि झोन कार्यालयाच्या अगदी मागे अमरावती-बडनेरा महामार्गावर उघडण्यात आला आहे. पूर्वी या ठिकाणी अतिक्रमण हटवताना जप्त केलेली सामग्री ठेवली जात असे. आता या जागेला ‘कचरा संकलन केंद्र’ असे नाव देऊन येथे एक मोठा रॅम्प बांधण्यात आला आहे. शहरातील कचरा गोळा करून आणणारी सुमारे आठ ते दहा वाहने आपला कचरा येथे उभ्या असलेल्या मोठ्या ट्रकमध्ये दाबून भरतात, जो नंतर कंपोस्ट डेपोवर नेला जातो.

कचरा गाड्या आत नेण्यासाठी अमरावती-बडनेरा महामार्गावरील राजापेठ पोलीस ठाण्यापासून वळावे लागते. हा मार्ग नेहमी वर्दळीचा असतो आणि बाजूलाच शाळा असल्याने वाहतुकीची कोंडी होते. मनपाच्या झोन ऑफिसमध्ये आणि शेजारच्या हॉटेलमध्ये ये-जा करणाऱ्यांनाही याचा त्रास होतो. कचरा गाड्यांमधून कचरा मुख्य रस्त्यावर सांडतो, ज्यामुळे घाण साचते आणि नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागतो. त्यामुळे हा कचरा डेपो तात्काळ बंद करण्याची मागणी जोर धरत आहे.

# धामणगावातील सर्व कृषी केंद्रे बंद

**धामणगाव रेल्वे/ वार्ताहर**

महाराष्ट्र फर्टिलायझर्स, पेस्टिसाईड्स अँड सीड्स डिलर्स असोसिएशन यांच्या नेतृत्वा खाली जाहीर करण्यात आलेल्या आवाहनानुसार, राज्यभरात २७ एप्रिल २०२६ पासून कृषी साहित्य विक्रेत्यांचा बेमुदत बंद सुरू झाला असून, धामणगाव रेल्वे तालुक्यातील सर्व कृषी केंद्रे पूर्णपणे बंद ठेवण्यात आली आहेत.

या पार्श्वभूमीवर, धामणगाव रेल्वे तालुका कृषी साहित्य विक्रेता सेवा संघटनेच्या वतीने यापूर्वीच तहसीलदार, तालुका कृषी अधिकारी यांना सविस्तर निवेदन देण्यात आले होते.

तथापि, त्या निवेदनांवर कोणतीही ठोस व समाधानकारक कार्यवाही न झाल्यामुळे अखेर विक्रेत्यांनी बेमुदत बंदाचा मार्ग स्वीकारला आहे.संघटनेच्या मते, बियाणे, खते व कीटकनाशके यांना शासनाची मान्यता व तपासणी झाल्यानंतरच बाजारात विक्रीसाठी येतात. कृषी विक्रेते केवळ सीलबंद व अधिकृत माल शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणारे माध्यम आहेत. तथापि, उत्पादनामध्ये दोष आढळल्यास कारवाई मात्र विक्रेत्यांवरच केली जाते, ही बाब अन्यायकारक असल्याचे विक्रेत्यांनी स्पष्ट केले.लिंकिंग, बोगस विक्री व नियमांबाबत तीव्र नाराजी, खत कंपन्यांकडून आवश्यक खतांसोबत इतर माल घेण्याची सक्ती (लिंकिंग) होत असल्याचा आरोप विक्रेत्यांनी केला आहे. नकार दिल्यास पुरवठा कमी केला जातो, अशीही तक्रार करण्यात आली.तसेच, बोगस बियाणे व नकली औषधांची विक्री मोठ्या प्रमाणात सुरू असून, त्यावर प्रभावी कारवाई होत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली.संघटनेचे अध्यक्ष राधेश्याम मुंदडा आणि सचिव दिनेश वैरागड़े म्हणाले की,‘मागील अनेक वर्षांपासून निवेदनांद्वारे आमच्या समस्या मांडत आलो आहोत. मात्र कोणतीही ठोस कार्यवाही झाली नाही. उत्पादन कंपन्यांच्या चुका असूनही कारवाई फक्त विक्रेत्यांवर होते, ही अन्यायकारक परिस्थिती आहे. त्यामुळे आजपासून आम्ही बेमुदत बंद सुरू केला असून, लेखी निर्णयाशिवाय माघार घेणार नाही.

’तालुक्यातील सर्व कृषी केंद्र संचालकांनी या बंदमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला असून, शासनाने तात्काळ सकारात्मक भूमिका न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# स्नेहसंमेलनातून उजळल्या ३३ वर्षांच्या आठवणी

## तत्कालीन शिक्षक व विद्यार्थी आले एकत्र



**अमरावती/का.प्र.**

येथील सरस्वती विद्यालयाच्या १९९३ इयत्ता दहावीच्या बॅच स्नेहसंमेलन तब्बल ३३ वर्षांनंतर उत्साहपूर्ण व भावनिक वातावरणात झाले.

तत्कालीन शिक्षक व विद्यार्थ्यांनी आठवणींना उजाळा दिला.हॉटेल वंदू इंटरनॅशनल येथे २६ एप्रिल रोजी झालेल्या या विशेष सोहळ्यास विद्यालयातील तत्कालीन शिक्षक विनायक बोधडे, पुष्पा बाराहाते, वनमाला रहाने, विजया लांडे, मनिषा लांडे,अनिल धोटे, रेखा इंगोले,अशोक गायकी, अशोक लताड, संध्या आखरे तसेच संस्थाचालक शुभम वानखडे, सुरेश पाखरे यांची उपस्थिती लाभली.स्नेहसंमेलनादरम्यान गुरु-शिष्य नात्याचे भावपूर्ण दर्शन घडले. विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त करत त्यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला. याप्रसंगी गुरुजन व माजी विद्यार्थी भावनांनी भारावून गेले होते. तसेच दिवंगत विद्यार्थी व शिक्षकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यावेळी उपस्थितांचे डोळे पाणावले. सोनाली पाखोडे हिने आपल्या सुरेल गायनाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.राजश्री बहिरम हिने उत्कृष्ट संचालन करत कार्यक्रमाची सूत्रे समर्थपणे हाताळली व सर्वांची मने जिंकली. या स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी शरद साबळे, अॅड.संध्या वानखडे तसेच पंकज कापसे यांनी विशेष परिश्रम घेतले. ३३ वर्षांनंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी आनंदाने नाचत-गाजत जुन्या आठवणींना उजाळा दिला. एकूणच या स्नेहसंमेलनाने जुन्या मैत्री, गुरुजनांप्रती आदर आणि शालेय जीवनातील आठवणींना नव्याने उजाळा देत सर्वांच्या मनात कायमस्वरूपी स्थान निर्माण केले. हा कार्यक्रम सर्वासाठी अविस्मरणीय ठरला.

# श्री विठोबा संस्थानच्या नवनियुक्त विश्वस्तपदी वसंत चोखाजी शेंडे विराजमान

## सामान्य सभेत बहुमताने निवड; उपस्थित विश्वस्तांकडून अभिनंदनाचा वर्षाव



**चांदुर रेल्वे/ वार्ताहर**

अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यात कापुराची यात्रा म्हणून सर्वत्र प्रसिद्ध असलेल्या श्री क्षेत्र सावंगा (विठोबा) येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे संस्थानच्या सभागृहात सामान्य सभा संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम वैतागराव नेमाडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

सभेमध्ये दिवंगत विश्वस्त वामन केळबाजी रामटेके यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या विश्वस्त पदासाठी निवड प्रक्रिया पार पडली.यामध्ये वसंत चोखाजी शेंडे (रा. नागपूर) यांची बहुमताने नवनियुक्त विश्वस्त पदी निवड करण्यात आली.वसंत चोखाजी शेंडे हे संस्थानच्या विविध धार्मिक कार्यात सातत्याने सहकार्य करत असून धार्मिक सेवाभावातून महाराजांच्या सेवेशी बालपणा पासून जोडलेले आहेत. संस्थानच्या गाथा समिती, यात्रा उत्सव समिती तसेच इतर सर्व धार्मिक उत्सवांमध्ये ते निस्वार्थपणे सहभागी होऊन अविरतपणे सेवा देत असत.त्यांच्या या सेवाभावी कार्याची दखल घेत विश्वस्त मंडळाने त्यांच्यावर विश्वास व्यक्त करत बहुमताने निवड केली.या प्रसंगी संस्थानचे जेष्ठ विश्वस्त विनायक पाटील यांचे हस्ते नवनियुक्त विश्वस्त यांचा शाल श्रीफळ देवून सत्कार करण्यात आला.सभेला संस्थानचे अध्यक्ष पुंजाराम नेमाडे, उपाध्यक्ष कृपासागर राऊत, सचिव अशोक सोनवाल तसेच सर्व विश्वस्त विनायक पाटील, गोविंद राठोड, फुलसिंग राठोड, चरणदास कांडलकर, प्रविण कुकडकर, लक्ष्मण राठोड, वैभव मानकर आणि स्वप्निल चौधरी यांची उपस्थिती होती.

# ‘पाचही झोन सभापती पदांसाठी आज निवडणूक

**अमरावती/का.प्र.**

नगरसेवकांना आता झोन सभापती अर्थात ‘मिनी महापौर’ पदाचे डोहाळे लागले असून, या पाचही पदांसाठी बुधवार, २९ एप्रिल रोजी निवडणूक होणार आहे. दरम्यान, झोन अंतर्गत प्रभागांतील नगरसेवकांच्या संख्याबळावर ही निवडून होणार असल्याने भाजपासह युवा स्वाभिमान व एमआयएमच्या वाट्याला झोन सभापती पद येणार असल्याचे निश्चित असून, महायुतीमधील मित्रपक्ष म्हणून राष्ट्रवादी काँग्रेस व इतरांनाही आलटून पालटून एक झोन मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसला मात्र या पदासाठी दुसऱ्या पक्षासोबत आघाडी केल्याशिवाय पर्याय नसल्याचे चित्र आहे.

स्व. सुदामकाका देशमुख सभागृहात बुधवारी पीठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांच्या अध्यक्षतेत ही निवडणूक होणार आहे. झोन १ रामुपरी कॅम्प अंतर्गत भाजपाचे नऊ, काँग्रेसचे पाच, राष्ट्रवादी काँग्रेसचे चार, युवा स्वाभिमानचे एक, शिंदेंच्या शिवसेनेचे एक, तर उद्धव ठाकरे गटाचे एक अशाप्रकारे एकूण २१ नगरसेवक आहेत. झोन दोन राजापेठ अंतर्गत भाजपाचे नऊ, युवा स्वाभिमानचे चार, राष्ट्रवादीचे दोन, तर शिंदेंच्या शिवसेनेचे एक अशाप्रकारे १६ नगरसेवक आहेत. झोन तीन दस्तूरनगर अंतर्गत भाजपाचे चार, बसपाचे तीन, काँग्रेसचे पाच व राष्ट्रवादीचे चार, अशाप्रकारे १६ नगरसेवक आहेत. झोन चार बडनेरा अंतर्गत भाजपाचे तीन, युवा स्वाभिमानचे सात, शिंदेंच्या शिवसेनेचे दोन, एमआयएमचे तीन व उद्धव ठाकरे गटाचे एक, अशाप्रकारे १६ नगरसेवक आहेत. तसेच झोन पाच भाजीबाजार अंतर्गत काँग्रेसचे चार, युवा स्वाभिमानचे तीन, भाजपाचे एक व एमआयएमचे नऊ आणि वंचित बहुजन आघाडीचे एक, अशाप्रकारे १८ नगरसेवक आहेत. त्यानुसार प्रत्येक झोनसाठी झोनमधील नगरसेवक हात उंचावून मतदान करणे अपेक्षित असून, ही निवडणूक बिनविरोधही होण्याची शक्यता नाकारता येत नाही.रामपुरी कॅम्पध्ये व राजापेठ झोनमध्ये भाजपाचे सर्वाधिक म्हणजे प्रत्येकी नऊ नगरसेवक आहे. त्यामुळे येथे भाजपाचाच सभापती होणे निश्चित असून, बडनेरा झोनमध्ये युवा स्वाभिमानचा सभापती होणार आहे. भाजीबाजार झोनमध्ये एमआयएमचे सर्वाधिक नऊ नगरसेवक असून, येथे एमआयएम व काँग्रेस आपापसात सभापती पद वाटून घेण्याची रणनिती सुरू आहे. याशिवाय दस्तूरनगर झोनमध्ये मात्र महायुती म्हणून निर्णय घेतल्या जाण्याची शक्यता आहे.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे वास्तु विद्येवर चर्चासत्र

**अमरावती/का.प्र.**

पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर मध्ये वास्तु विद्येवर चर्चासत्र नुकताच संपन्न झाले. या चर्चासत्रात महाविद्याल याच्या सर्व प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला. या सत्राच्या निष्कर्षामध्ये आर्किटेक्चरल (वास्तु विद्या) फील्ड हे एक महत्त्वाचे, आकर्षक आणि भविष्याभिमुख क्षेत्र म्हणून समोर येत आहे. आर्किटेक्चर म्हणजे केवळ इमारती उभारणे नसून, समाजशास्त्र, कला, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा सुंदर समन्वय साधणारी एक सर्जनशील प्रक्रिया आहे. त्यामुळेच आज अनेक विद्यार्थी या क्षेत्राकडे मोठ्या प्रमाणावर आकर्षित होत आहेत.

या क्षेत्रात करिअरच्या अनेक वाटा खुल्या आहेत.

आर्किटेक्ट, इंटीरियर डिझायनर, अर्बन प्लॅनर, लँडस्केप आर्किटेक्ट अशा विविध पदांवर काम करता येते. आधुनिक तंत्रज्ञान जसे AutoCAD, 3D Pee F&ve, BIM यांचा वापर करून काम अधिक प्रभावी आणि आधुनिक पद्धतीने करता येते.आर्थिक दृष्ट्याही हे क्षेत्र फायदेशीर आहे.



अनुभव वाढत गेल्यावर उत्पन्नाच्या संधी वाढतात. पर्यावरणपूरक आर्किटेक्चरचे महत्त्व आजच्या काळात पर्यावरण संरक्षण अत्यंत गरजेचे बनले आहे.ग्रीन आर्किटेक्चर – सौर ऊर्जा, नैसर्गिक प्रकाश, पाणी बचत यावर भर सस्टेनेबल आर्किटेक्चर-दीर्घकालीन टिकाऊ आणि पर्यावरणपूरक रचना लँडस्केप आर्किटेक्चर- हरित क्षेत्र वाढवून मानसिक आणि शारीरिक आरोग्यास मदत अर्बन प्लॅनिंग-शहरांचे नियोजन करून वाहतूक आणि प्रदूषण नियंत्रण इको-फ्रेंडली आर्किटे क्चर- कार्बन उत्सर्जन कमी आणि नैसर्गिक वायुवीजन व्हर्नॅक्युलर आर्किटेक्चर- स्थानिक साहित्य व पारंपरिक तंत्रज्ञानाचा वापर या सर्व प्रणालीमुळे पर्यावरण संतुलन राखण्यास मोठी मदत होते.वरील मुद्द्याचे तर्कसंगत सादरीकरण प्राध्यापक हरीश पळसोकर अधिविख्याता संगणक कार्यशाळा यांनी केले.

वास्तुविद्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली डिप्लोमा आणि डिग्री अभ्यास क्रम उपलब्ध आहेत.डिप्लोमा अभ्यासक्रम-दहावी नंतर, प्रवेश परीक्षेविना डिग्री अभ्यासक्रम- बारावीनंतर JEE-II आणि NATA परीक्षा आवश्यक महाराष्ट्रातील प्रख्यात पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, अमरावती येथे हे दोन्ही अभ्यासक्रम तसेच NATA परीक्षा केंद्र सुद्धा उपलब्ध आहे. इच्छुक विद्यार्थ्यांसाठी येथे मोफत समुपदेशन व मार्गदर्शनाची सुविधा देखील उपलब्ध आहे.महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.सरतेशेवटी आर्किटेक्चरल फील्ड हे सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि समाजसेवेचा अनोखा संगम आहे.

# बागेश्वर बाबाचा नांदगावात काँग्रेसने केला निषेध

## तहसीलदार यांना निवेदन देऊन कारवाई करण्याची मागणी



**नांदगाव खंडेश्वर/ वार्ताहर**

छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल अत्यंत चुकीचे, तथ्यहीन आणि अवमानकारक विधान करणाऱ्या धीरेंद्र कृष्ण शास्त्री उर्फ ‘बागेश्वर बाबा’ याच्या विरोधात नांदगाव खंडेश्वर तालुका काँग्रेस कमेटी आणि युवक काँग्रेस कमेटी व नांदगाव खंडेश्वर शहर काँग्रेस कमेटीचे वतीने आक्रमक पवित्रा घेत युवक काँग्रेसचे महासचिव परीक्षित जगताप यांच्या नेतृत्वात निषेध व्यक्त करून बागेश्वर बाबा यांच्यावर कारवाई करण्यात यावी या मागणीचे तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. निवेदन सादर करतेवेळी महाराष्ट्र प्रदेश युवक कॉंग्रेस महासचिव परिक्षित जगताप तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष समिर दहातोंडे युवक काँग्रेस तालुका अध्यक्ष दिपक भगत व शहर कॉंग्रेस कमेटी शहर अध्यक्ष अमोल धवसे, निशांत जाधव, नगर पंचायत नांदगाव खंडेश्वर चे बांधकाम सभापती मो.रियाज मो.मुमताज, सुनिल शिरभाते, मंगेश जोगे दिपक सवई माजी सरपंच सुशिल थोरात, राहुल गुल्हाने, शेख हारुन शेख युसुब, मो.ईद्रिसभाई, मोरेश्वर दिवटे गजानन भडके तनविर माजी उपसरपंच शिवाजी चव्हाण पटेल, मो.सलिम, या. या. रशिद कुरेशी, युनुस सर , गजानन चव्हान, नरेंद्र थोरात, प्रदिप ब्राम्हवाडे, अमोल गुल्हाने ,बाबु पवार, बाल्या पवार, जितेंद्र चितोडीया नंदु रावेकर, शेख रहुफ, मंगेश जोगे, मोफिक पठाण, पारस चौधरी, संजय कुंभलकर, ऋषींकेश मुंदे प्रकाश ओलीवकर, सलिम खा चांदखा, रमेश ठाकरे, अजर अली कौसर अली, मनोहर बगळे, विजय चिंचे, निलेश मेंढे, मुस्तुफाभाई, पवन काळेकर यांच्यासह काँग्रेसचे ग्रामीण व शहरातील पदाधिकारी,व कार्यकर्ते आणि शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संक्षिप्त

## गुरुकुंजात येथे ग्रामजयंती महोत्सवास सुरुवात

**गुरुकुंज (मोझरी) -** परिसरातील श्रद्धा, भक्ती आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने गुरुकुंज येथे चार दिवसीय धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. २७ एप्रिल पासून सुरू होणाऱ्या या सोहळ्यात सामुदायिक प्रार्थना, ध्यान, भजन, कीर्तन, प्रवचन, रथोत्सव, तसेच महाप्रसाद यांसारख्या विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल सुरु आहे.कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी, सोमवार रात्री ७.३० ते १०.०० या वेळेत सामूहिक प्रार्थना, पठन व मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले.दि. २८ एप्रिल रोजी पहाटेपासूनच कार्यक्रमांची सुरुवात झाली. सकाळी ४.०० ते ८.०० या वेळेत महासमाधी अभिषेक, पूजन व विधीस्थापना पार पडणार आहे.दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ध्यान चिंतनाने दिवसाची सुरुवात होईल. त्यानंतर प्रार्थना, महिला भजन मंडळांचे कार्यक्रम आणि विविध धार्मिक सत्रे आयोजित करण्यात आली आहेत.गुरुवार, दि. ३० एप्रिल हा कार्यक्रमाचा समारोपाचा दिवस असून, सकाळी सामुदायिक ध्यान चिंतन व पालखी सोहळा काढण्यात येणार आहे.या धार्मिक पर्वणीचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



## मनरेगा मजुरीवाढीचा निर्णय रखडला

**अंजनगाव बारी -** ग्रामीण भागातील गरजूंसाठी आधार मानली जाणारी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) यामध्ये मजुरीवाढीचा निर्णय यंदा रखडल्याने मजुरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. दरवर्षी एप्रिल महिन्यात मजुरीत वाढ जाहीर करण्याची परंपरा असताना यावर्षी केंद्र सरकारकडून अद्याप कोणतीही वाढ घोषित करण्यात आलेली नाही.सध्या मनरेगा अंतर्गत मजुरांना प्रतिदिन केवळ ३१२ रुपये मजुरी मिळत आहे. मात्र, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढल्या असताना मजुरीत वाढ न झाल्याने मजुरांचे आर्थिक गणित बिघडले आहे.मनरेगा योजनेअंतर्गत वर्षाला १०० दिवस कामाची हमी देण्याची तरतूद आहे. सध्या रब्बी हंगाम संपून खरीप हंगामाची तयारी सुरू असल्याने शेतमजूर रोजगारासाठी मनरेगा कामांकडे वळत आहेत. मात्र मजुरीवाढीचा निर्णय न झाल्यास त्यांच्या आर्थिक अडचणी वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे.वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर सध्याच्या ३१२ रुपयांमध्ये कुटुंबाचा उदरनिर्वाह करणे कठीण होत असल्याची भावना मजुरांकडून व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने लवकरात लवकर मजुरीवाढीचा निर्णय घ्यावा, अशी मागणी ग्रामीण भागातून होत आहे.



## जिल्हाधिकारी यांनी केला प्रबंधक जयदीप राठोड यांचा गौरव

**अमरावती -** शासकीय योजनांच्या अंतर्गत कर्ज वाटपाचे टार्गेट सर्व बँकांना देण्यात आले होते. या अनुषंगाने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या बँक कर्मचारी अधिकारी यांचा सत्कार जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे नुकताच करण्यात आला. यामध्ये बँक ऑफ बडोदा सराफा शाखेचे जयदीप राठोड यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सन्मानपत्र, सन्मानचिन्ह देऊन त्यांना जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी सन्मानित केले.दरम्यान शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची आपली जबाबदारी असून यापुढे जनसामान्यांच्या सेवेसाठी दिलेली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडणार, असे बँक ऑफ बडोदा सराफा शाखेचे प्रबंधक जयदीप राठोड म्हणाले.जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम आणि प्रधानमंत्री सूक्ष्म प्रक्रिया उद्योगामध्ये कर्ज मंजूरीचे उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा सत्कार करण्यात आला. तसेच यावेळी उद्दिष्ट पूर्ण करणाऱ्या बँकांचा आढावा घेण्यात आला.यावेळी कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे उद्दिष्ट पूर्ण केलेल्या बँक व्यवस्थापकांचा सत्कार करण्यात आला.



## विद्यार्थ्यांचे एनएमएमएस परीक्षेत यश

**चांदूर रेल्वे -** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे द्वारा आयोजित आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा (एनएमएमएस) घेण्यात आली होती. या परीक्षेमध्ये श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदूर रेल्वे या शाळेचे ५८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १७ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यामधून ३ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. चांदुर रेल्वे तालुक्यातून सर्वाधिक निकाल बापूसाहेब देशमुख शिवाजी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, चांदुर रेल्वे या शाळेचा लागलेला आहे. शाळेतील पात्र विद्यार्थ्यांमध्ये तालुक्यातून सर्वाधिक गुण मिळवणारी येवले, तनिष्क अर्चना फरकाडे व संस्कृती रमेश ढोले यांचा समावेश आहे.

## बुद्ध जयंतीनिमित्त ग्रंथाचे प्रकाशन

**अमरावती-**श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट, अमरावती द्वारा संचालित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तक्षशिला महाविद्यालयाच्या वतीने बुद्ध जयंतीच्या पावन पर्वावर ‘बौद्ध तत्त्वज्ञान आणि आधुनिक जगापुढील आव्हाने’ या विषयावरील महत्त्वपूर्ण संपादित ग्रंथाचे प्रकाशन ३० एप्रिल २०२६ रोजी करण्यात येणार आहे.या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. कमलताई गवई राहणार असून, मुख्य अतिथी म्हणून डॉ. सागर जाधव उपस्थित राहणार आहेत.

# विदर्भाच्या हक्कांवर पुन्हा घाला!

**महाराष्ट्रातील विकास हा अजूनही 'प्रादेशिक राजकारणाचा कैदी' आहे. पश्चिम महाराष्ट्राला झुकते माप आणि विदर्भ-मराठवाड्याची उपेक्षा, ही परंपरा अजूनही कायम आहे. ही परंपरा तोडण्यासाठी आवश्यक असलेली राजकीय इच्छाशक्ती दिसत नाही.**




महाराष्ट्राच्या विकासाचा आलेख मांडताना नेहमीच 'समतोल प्रादेशिक विकास' ही संकल्पना पुढे केली जाते. पण प्रत्यक्षात पाहिले तर ही संकल्पना केवळ धोरणात्मक कागदोपत्री मर्यादित राहिली आहे,हे वारंवार सिद्ध होत आहे.२०२६-२७ च्या अंदाजपत्रकाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण रस्ते व पुलांच्या बांधकामासाठी 'नाबार्ड'कडून घेतलेल्या ५०० कोटी रुपयांच्या कर्जाच्या वाटपातून पुन्हा एकदा हे स्पष्ट झाले आहे की, विदर्भाच्या वाट्याला अन्याय, उपेक्षा आणि दुय्यमत्व याशिवाय काही वाट्याला आले नाही. ही बाब केवळ आकडेवारीतून नाही, तर शासनाच्या निर्णय प्रक्रियेतील मानसिकतेतून उघड होते.

या अंदाजपत्रकात सातारा जिल्ह्याला तब्बल १५० कोटी रुपये, म्हणजे एकूण निधीच्या ३० टक्के, वाटप करण्यात येणे हे केवळ प्रशासकीय योगायोग नसून एक नियोजित प्रादेशिक झुकाव आहे. त्याचवेळी कोल्हापूर, सांगली, पुणे या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांनाही मोठ्या प्रमाणात निधी देण्यात आला आहे. याउलट विदर्भातील अनेक जिल्ह्यांच्या वाट्याला १० कोटी रुपयांपेक्षाही कमी निधी येणे, ही केवळ तफावत नसून ती 'विकासातील विषमता' आहे.

हा प्रश्न केवळ निधीच्या वाटपापुरता मर्यादित नाही; तो सत्तेच्या दृष्टिकोनाचा आणि प्राधान्यक्रमाचा आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे स्वतः विदर्भातील असूनही विदर्भाच्या विकासाचा समतोल राखण्यात अपयशी ठरत आहेत, हे अधिक वेदनादायक आहे. विदर्भातून आलेल्या नेतृत्वाकडून अपेक्षा अधिक असतात, पण त्या अपेक्षा पूर्ण होत नसतील, तर ते केवळ अपयश नसून विश्वासघात मानला जातो.

वास्तविक, प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासनाने अनेक वेळा धोरणात्मक घोषणा केल्या आहेत. पण या घोषणांचा परिणाम काय? विदर्भातील रस्ते, पूल, सिंचन प्रकल्प, औद्योगिक विकास यामध्ये अजूनही मोठ्या प्रमाणात तफावत आहे. जर 'निधीचे समान वाटप' ही शासनाची भूमिका असेल, तर मग या वाटपात इतकी प्रचंड तफावत का दिसते?या संपूर्ण प्रकरणात महाराष्ट्राचे अर्थतज्ज्ञ प्रा. श्रीनिवास खांदेवाले यांचे निरीक्षण लोकसत्ता वृत्तपत्रातील अत्यंत बोलके ठरते,'निधीचा ओघ साताऱ्याकडे.' हे विधान केवळ एका घटनेपुरते मर्यादित नसून, महाराष्ट्रातील दीर्घकालीन प्रादेशिक विषमतेचे प्रतीक आहे. 'देवाघरी सुद्धा न्याय नाही' असे म्हणण्याची वेळ येणे, हा केवळ भावनिक उद्गार नसून आर्थिक आणि राजकीय वास्तवाचा आरसा आहे. कारण कोल्हापूर, सांगली आणि पुणे या पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांना भरघोस निधी दिला जात असताना, विदर्भ मात्र पुन्हा एकदा उपेक्षित ठरतो आहे.

विदर्भाच्या वाट्याला केवळ नाममात्र निधी देण्यात आला असून रस्ते व पुलांसारख्या अत्यावश्यक पायाभूत सुविधांसाठीही राज्य सरकारने जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न केला आहे.'ही कामे केंद्रीय रस्ते निधीतून केली जातील, त्यासाठी आमदारांनी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे निधी मागावा,' असे सांगणे म्हणजे राज्याने स्वतःची भूमिका दुय्यम ठेवण्यासारखे आहे. ही परिस्थिती अगदी त्या म्हणीप्रमाणे आहे,हाती पडलेली कुल्फी स्वतः खाऊन टाकायची आणि रडणाऱ्या धाकट्या भावंडाला सांगायचे,'उगी रहा, तुला चॉकलेट देऊ, मोठा झाल्यावर.'हा 'न्याय' नसून उघडपणे केलेला प्रादेशिक पक्षपात आहे. अशा असमतोल निर्णयांमध्ये मुख्यमंत्री समतोल प्रस्थापित करण्यात अपयशी ठरत आहेत, हे त्यांच्या नेतृत्वाचे गंभीर अपयश ठरते. परिणामी, हा केवळ निधीतील तफावत नसून, विदर्भाच्या हक्कांवर झालेला अन्यायाचा कळस आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी दिलेले स्पष्टीकरण की 'साताऱ्यातील नवीन आमदारांना प्राधान्य दिले गेले,' हे अधिकच धक्कादायक आहे. शासनाचा निधी हा कोणत्याही 'राजकीय नवखेपणाच्या बक्षिसासाठी' नसतो, तर तो जनतेच्या मूलभूत गरजांसाठी असतो.जर निधी वाटपाचा निकष हा 'नवीन आमदार' किंवा 'राजकीय समीकरण' असेल, तर मग विकासाची संकल्पना पूर्णपणे विकृत झाली आहे.याहूनही अधिक संतापजनक बाब म्हणजे विदर्भातील आमदारांनी या उघड अन्यायाविरोधात एकदाही ठाम आवाज का उठवला नाही?जनतेच्या हक्कांसाठी उभे राहण्याची शपथ घेणारे हेच लोक आज सत्तेच्या मोहात इतके बधिर झाले आहेत की,त्यांना आपल्या मतदारसंघातील लोकांचे प्रश्नही दिसेनासे झाले आहेत?

सत्ता ही जनतेच्या हक्कांसाठी लढण्याचे,न्याय मिळवून देण्याचे साधन असते.पण येथे तर सत्तेचा वापर केवळ पद, प्रतिष्ठा आणि प्रभाव टिकवण्यासाठी केला जात असल्याचे उघडपणे दिसत आहे.जर जनतेच्या विकासासाठी असलेला निधी अक्षरशः 'दिवसा ढवळ्या'लुटला जात असेल आणि त्यावर जनप्रतिनिधी मौन बाळगत असतील, तर त्यांची ही भूमिका केवळ निष्क्रियता नाही,ती जनतेच्या विश्वासाचा विश्वासघात आहे.आज प्रत्येक आमदाराने स्वतःला आरशात पाहण्याची वेळ आली आहे. 'आपण खरोखरच विदर्भाचे जनप्रतिनिधी आहोत की केवळ सत्तेचे लाभार्थी?' हा आत्मचिंतनाचा कठोर प्रश्न त्यांच्या समोर उभा आहे.

विदर्भातील अनेक जिल्ह्यांची स्थिती अत्यंत चिंताजनक आहे.गोंदिया, वाशीम यांसारख्या जिल्ह्यांना १० कोटी रुपयांपेक्षाही कमी निधी मिळणे,हे त्या भागातील नागरिकांच्या विकासाच्या अधिकारावर गदा आणणारे आहे.ग्रामीण भागातील रस्ते आणि पूल हे केवळ पायाभूत सुविधा नसून ते आर्थिक विकासाचे 'धमनी' असतात.जर या धमनीच दुर्लक्षित राहिल्या, तर विकासाचा प्रवाह कसा होणार?राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या मते, विदर्भातील कामे 'केंद्रीय रस्ते निधी'तून केली जातील. पण हा युक्तिवादही अपुरा आहे. राज्य सरकारच्या जबाबदाऱ्या टाळण्यासाठी केंद्राकडे बोट दाखवणे, ही एक प्रकारची 'जबाबदारीपासून पळवाट' आहे. जर राज्य सरकार स्वतःच्या निधीतून समतोल साधू शकत नसेल, तर त्याची जबाबदारी कोणाची?

यामुळेच आता विदर्भातील जनतेसमोर एक मूलभूत प्रश्न उभा राहतो,'आपण महाराष्ट्रात राहून काय मिळवत आहोत?'आर्थिकदृष्ट्या समृद्ध असलेल्या विदर्भातून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल मिळतो. खनिज संपत्ती, वीज निर्मिती,शेती उत्पादन या सर्व बाबींमध्ये विदर्भाचे योगदान मोठे आहे. पण त्याच्या बदल्यात मिळणारा विकासाचा हिस्सा अत्यल्प आहे.ही परिस्थिती बदलण्यासाठी केवळ सरकारवर टीका करून चालणार नाही; तर विदर्भातील समाज, बुद्धिजीवी, राजकीय नेते आणि सामान्य नागरिक यांनी एकत्र येऊन ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे. 'विदर्भवाद' हा केवळ भावनिक मुद्दा नसून तो आर्थिक न्यायाचा प्रश्न आहे.जर शासनाने ही बाब गांभीर्याने घेतली नाही, तर भविष्यात विदर्भातील असंतोष वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.विकासाचा समतोल राखणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नाही, तर ती लोकशाहीची मूलभूत अट आहे.आणि जर ही अट पूर्ण होत नसेल, तर लोकशाहीची विश्वासार्हता धोक्यात येते.

आज गरज आहे ती 'धोरणात्मक पुनर्विचाराची' निधी वाटपाचे निकष पारदर्शक आणि न्याय्य असले पाहिजेत. प्रत्येक प्रदेशाला त्याच्या गरजेनुसार आणि योगदानानुसार निधी मिळाला पाहिजे. अन्यथा 'विकास' हा शब्द केवळ एक राजकीय घोषवाक्य बनून राहील.एकंदरीत असे म्हणता येथील की, विदर्भाच्या संदर्भात एकच प्रश्न पुन्हा उभा राहतो,'हा विकासाचा प्रवास आहे की अन्यायाचा वारसा?' जोपर्यंत या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळत नाही, तोपर्यंत विदर्भाच्या मनातील असंतोष शांत होणार नाही, तेव्हा 'समतोल विकास' ही संकल्पना केवळ एक अपूर्ण स्वप्न म्हणूच राहील हे मात्र निश्चित!



**डॉ.प्रशांत विघे**
राजकीय विश्लेषण
तथा सिनेट सदस्य
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती.
मो.९३२६८७७७४९



# वन स्टॉप सेंटर

## पीडित महिलांच्या हक्काचे माहेरघर

**अमरावतीत एका वर्षात १९६ महिलांना मदतीचा हात**

संकटग्रस्त महिलांना एकाच छताखाली सर्व प्रकारची मदत मिळावी या उद्देशाने केंद्र पुरस्कृत 'मिशन शक्ती' योजनेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात 'वन स्टॉप सेंटर' (OSC) प्रभावीपणे कार्यरत आहे.महिला व बाल विकास मंत्रालय आणि जिल्हा महिला व बाल विकास विभाग,अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या या उपक्रमातून गेल्या एका वर्षात तब्बल १९६ पीडित महिलांना विविध प्रकारची मदत व आधार देण्यात आला आहे.

**सर्वंकष सुविधा 'एकाच छताखाली'**

कौटुंबिक हिंसाचार, लैंगिक छळ, महिला तस्करी, ॲसिड हल्ला किंवा कोणत्याही प्रकारच्या मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जाणाऱ्या महिलांसाठी हे केंद्र म्हणजे एक सुरक्षित आश्रयस्थान ठरत आहे. येथे पीडित महिलांना न्याय, सुरक्षा, कायदेशीर मदत, पोलीस मदत, समुपदेशन, वैद्यकीय सहाय्य आणि तात्पुरता निवारा अशा सर्व सुविधा विनाविलंब उपलब्ध करून दिल्या जातात.वन स्टॉप सेंटरचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे येथे येणाऱ्या पीडित महिलेचे वय, शिक्षण,वैवाहिक स्थिती याचा विचार न करता तिला तात्काळ आधार दिला जातो. अमरावती येथे सन २०१७ पासून हे केंद्र अविरतपणे सेवा देत असून, हिंसाचाराने बाधित झालेल्या महिलांचे पुनर्वसन करण्यासाठी हे केंद्र कटिबद्ध आहे.

**२४ तास अखंड सेवा आणि संपर्क**

संकटग्रस्त महिलांसाठी ही सेवा २४ तास सुरू असते.जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, अमरावती येथे हे केंद्र स्थित असून, मदतीसाठी ९३७१७०८५३५ किंवा ७७२०८८४१९८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधता येईल. तसेच, हिंसाचाराने पीडित महिला १८१ या हेल्पलाईन क्रमांकावर कॉल करून कधीही मदत मिळवू शकतात.समाजात कोठेही पीडित महिला आढळल्यास त्यांना या केंद्राचा लाभ मिळवून देण्यासाठी पोलीस विभाग, सामाजिक संस्था, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका मदत करतात. पीडित महिलांसाठी वन स्टॉप सेंटर म्हणजे हक्काचे माहेरघरच आहे !

**अपर्णा यावलकर**
माहिती अधिकारी,
जिल्हा माहिती कार्यालय,अमरावती

# जनगणना आणि राष्ट्रउभारणी

प्रत्येक दहा वर्षांनी जनगणना होणे अपेक्षित असताना वर्ष २०११ नंतर करोना महामारी आणि अन्य काही अडचणींमुळे २०२२ मध्ये न होता अंतिमता ही प्रक्रिया एक एप्रिल २०२६ पासून चालू झाली आहे.या जनगणनेमुळे सामाजिक आणि आर्थिक स्तर,जातीय आणि धार्मिक आकडेवारी, स्त्री पुरुष आणि वयोगट,कुठल्या प्रदेशात किती जण राहतात,भाषिक आकडेवारी आणि कुणाला कुठल्या भाषा येतात आधी वस्तुनिष्ठ माहिती मिळवून घुसखोरी,स्थलांतर, कुणाला कुठल्या सहाय्याची आवश्यकता आहे किंवा ते काढून घेतले पाहिजे आदी अनेक गोष्टी उलगडता येणार आहे. या सर्वांमागील सामाजिक, भौगोलिक, धार्मिक, आर्थिक आदी कारणे समोर येऊन अनेक व्यापक स्तरांवर वरील भारताचा संपूर्ण आडवा उभा लेखाजोखा समोर येणार आहे.जगातील सर्वात मोठी लोकशाही असणाऱ्या,महासत्ता होऊ पाहणाऱ्या भारताची जनगणना इतकी महत्त्वाची आहे की तिचे केवळ भारतावर राजकीय आणि सामाजिकच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध अंगी परिणाम होणार आहे.

ही जनगणना संगणकीय तंत्रज्ञानामुळे (डिजिटलायझेशन मुळे) होणार असल्याने यातील त्रुटी किंवा खोटेपणा अधिक पटकन लक्षात येऊ शकतो आणि काही आकडेवारी संशयास्पद वाटली तर संबंधित अधिकारी अधिक खोलात जाऊन परीक्षण करू शकतो. जनगणनेत अधिकाधिक सत्य आणि बिनचूक माहिती येण्यासाठी शासनाने विज्ञापने,समाज आणि प्रसार माध्यमातून जनतेला जनगणनेचे अनन्य साधारण महत्व आणि त्यासाठी सत्य माहिती देण्याचे महत्त्व सांगायला हवे आणि त्यांना शिक्षित करणे गरजेचे आहे.संपूर्ण देशात पोट जातींची अतिप्रचंड संख्या असल्यामुळे विशेषतः जातींची माहिती भरताना पुष्कळच सतर्कता ठेवावी लागणार आहे.संगणकीकरणामुळे दुरुस्ती टाळली जाऊ शकते, व्यक्तीच्या माहितीची वस्तुनिष्ठता लगेचच लक्षात येऊ शकते आणि अधिक वस्तुनिष्ठ माहिती गोळाही होऊ शकते.मोठी सामग्री (डाटा) एकाच वेळी कळू शकते. मानवी चुका टाळून अधिकाधिक सदोष माहिती मिळू शकते. माहिती भरल्यावर ती तत्परतेने उपलब्ध होऊ शकते असे अनेक लाभ संगणक संगणकीयकरण्याचे आहेत.



स्वतःचीच स्वतः माहिती भरणे शक्य होणे हे ही या वेळेच्या जनगणनेचे वैशिष्ट्य आहे.ह्या जनगणनेतील आणखीन एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे विवाह न करता एकत्र राहणारे (लिविंग रिलेशन रिलेशनशिप मध्ये राहणारे) यांना विवाह प्रमाणे ग्राह्य धरता येणार आहे. भारताची ही १६ वी जनगणना मार्च २०२७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या जनगणनेतून लोकसंख्या, शैक्षणिक स्थिती, बेरोजगारी,व्यवसायिकांची संख्या हे सारे प्रदेशानुसार अद्यावत उपलब्ध होऊ शकणार असल्याने त्यातून विविध अहवाल सिद्ध करून सरकार राष्ट्र रचनेच्या दृष्टीने अनेक सकारात्मक निर्णयापर्यंत येऊ शकते. जनगणनेच्या वेळी विजेच्या माहितीतून सौरऊर्जा किती जणांकडे आहे आणि कोरोना महामारीनंतर कुणाचे किती स्थलांतर झाले हेही लक्षात येऊ शकणार आहे. या जनगणनेतून प्रत्येक घरात पाणी, वीज, शौचालय, गॅस आहे का हे कळणार आहे. संगणकीय तंत्रज्ञानाचा लाभ घेऊन वीज आणि पाणी चोरी करणाऱ्यांना यातून पकडता येण्याची शक्यता आहे पण भ्रष्टाचार मुळे सर्व व्यापक उद्देश साध्य होईल का याविषयी शंका आहे.

शासन या जनगणनेच्या माध्यमातून एक मोठा नवा राष्ट्रीय उभारणीचा टप्पा गाठू शकते हे निश्चित. रस्त्यावर राहणारे, घुसखोर, विस्थापित हिंदू, विख्यात गुंड आदी साऱ्यांची माहिती यातून मिळू शकणार आहे.खरे गरीब किंवा घुसखोर कोण आहे हेही यातून कळेल आणि जर मनात आणले आणि विविध विभाग आणि यंत्रणा यांच्या समन्वयाने विविध वस्तूंची तस्करी,स्मगलिंग, खोटे धंदे,अवैध व्यवसाय, देश विधायक कारवाया आदी कोण करत आहे हेही यातून एक प्रकारे उघड होण्यास मोठी संधी मिळू शकते. सरकारची इच्छाशक्ती असेल तर या जनगणनेचा लाभ घेऊन या गोष्टी समूळ नष्ट करण्याच्या दिशेने सरकार पावले उचलू शकते. अगदी देशाच्या सर्व संवेदनशील सीमा भागातील ये जा ही यातून काही प्रमाणात कळू शकते.

या जनगणनेतून भारताला त्याची बलस्थाने आणि कमकुवतपणा कळणार आहे. शासनाने जनगणनेच्या व्यापक माहितीच्या आधारे संपूर्ण देशात राष्ट्रहिताच्या दृष्टीने काय परिवर्तन होऊ शकते याचा 'रोड मॅप' (नियोजन आराखडा) केला तर त्यातून केवळ क्रांतिकारी योजना आणि विकासच नव्हे, तर देशातील अपप्रकार,अवैध मालमत्ता, अनाधिकृत व्यवसाय, भ्रष्टाचार, घुसखोरी, रस्त्यापासून सीमेपर्यंत झालेली अतिक्रमणे या गोष्टीही यातील विविध विभागाच्या अभ्यासाने आणि संगणकीय गुणसूत्रे जुळवून उघड्या पाडणे शक्य होऊ शकते.या अद्यावत जनगणनेचा लाभ उठवून सरकारने या साऱ्या गोष्टी नष्ट करण्यासाठी कृतिशील होऊन खऱ्या अर्थाने आदर्श राष्ट्रउभारणी करण्यासाठी वाटचाल केली पाहिजे.

या जनगणनेचे महत्त्व पंतप्रधान यांनी पण अधोरेखित केले आहे. या जनगणनेची व्यापक व्याप्ती पाहून काही समाज कंटकांनी, पुरोगाम्यानी लोकांना भ्रमित करण्याचे प्रयत्न सुरु केले आहे. सर्व मुसलमानांनी धर्म इस्लाम आणि भाषा उर्दू लिहावी असे फतवे काढण्यात आलेले आहे.त्याचप्रमाणे इतरही जातींनी आपली भाषा आणि धर्म वेगवेगळे लिहिण्याचे सुचित करण्यात आले आहे.भारताची मूळ भाषा ही संस्कृत असल्याने सर्वांनी संस्कृत या भाषेला प्राधान्य देणे आवश्यक आहे.भाषा येणाऱ्यांनी अन्य भाषे बरोबरच संस्कृत भाषेचा उल्लेख आवश्यक करावा.जनगणना २०२७ च्या माहितीचा लाभ उठवून भारत सरकारने राष्ट्र उभारणीचा नवा इतिहास रचावा.

**लीना गाडगीळ**

# मोफत एआयचा गैरसमज?

आधुनिक तंत्रज्ञानाच्या जगात सध्या आर्टिफिशिअल इंटेलिजन्स म्हणजे एआय चा परवलीचा शब्द आणि तंत्र बनले आहे. एआयच्या वापरामुळे अनेक क्षेत्रात मोठमोठे बदल घडत चालले आहेत. संगणक, लॅपटॉप आणि मोबाइलवरूनसुद्धा कोणालाही सहजपणे वापरता येणारे एआय तंत्रज्ञान मोफत असल्याचे सर्वांना वाटते. परंतु, मानवी इतिहासातील सर्वात शक्तिशाली तंत्रज्ञान सामान्य लोकांसाठी तथाकथित मोफत का दिले जात आहे, यावर प्रत्येकाने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे. आपण कशावर विश्वास ठेवायचा, आपणास काहीही माहित नाही असे जेव्हा वापरकर्ते म्हणायला लागतात तेव्हा ते कोणाच्यातरी हातातले बाहुले बनलेले असतात. लोकांची विचार करण्याची सवय काढून घेण्याचाही यामागे उद्देश असतो. एकदा सत्याची जाणीव निघून गेली की कोणीही एआयच्या वापराकडे वळतो. तेही केवळ माहितीसाठी नव्हे तर जगण्याचे अनेक निर्णय घेण्यासाठीदेखील तो सहजपणे एआयचा वापर करायला लागतो.




सध्याच्या काळात एआयचा अतिवापर हा मानवाची सखोल विचार करण्याची क्षमता संपवणारा ठरत चालला आहे. सतत एआयसारख्या यंत्रणेवर अवलंबून राहिल्यामुळे निर्णयक्षमता, सर्जनशीलता आणि विचारशक्ती क्षीण होत चालली आहे. पूर्वीच्या काळी आपल्या खासगी आयुष्यांसंबंधीचे अनेक प्रश्न आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींना किंवा मित्र आणि शिक्षकांना विचारले जात असत.

आता मात्र बिनदिक्कतपणे एआयशी संवाद साधण्याचा प्रघात पडला आहे.काही तरुणांनी एआयसोबत भावनिक नाते जडल्याने आत्महत्यादेखील केल्या आहेत. त्यामुळेच एआय मोफत उपलब्ध आहे, असे मानणे गैरसमज आहे.

**प्रा. मधुकर चुट**
नागपूर

# डिजिटल युगातील तरुणांसाठी सावधगिरीची गरज

आजकाल सगळे ऑनलाइन झाले आहे. सोशल मीडिया, नोकरी, मैत्री, नाती सगळीकडे तरुण-तरुणी पुढे आहेत.पण,जसे जग बदलत आहे तसे धोके देखील वाढत आहे.त्यामुळे स्वतःला जपणे, शांततेने निर्णय घेणे आणि मन खंबीर ठेवणे गरजेचे झाले आहे.आज मुली आणि मुले शिकत आहेत, करिअर करताहेत, स्वतःच्या पायावर उभे राहताहेत. हे बघून खरेच अभिमान वाटते. पण त्याचवेळी ऑनलाइन असो किंवा प्रत्यक्षात, नात्यांमध्ये फसवणूक, खोटी माहिती, इमोशनल ब्लॅकमेल असे प्रकार पण खूप वाढले आहे.आपल्या हिंदू संस्कृतीत नेहमी सांगितले आहे की 'संस्कार', 'विवेक' आणि 'मर्यादा' खूप महत्त्वाच्या आहेत. फक्त मनाला वाटते म्हणून निर्णय घेऊ नका. डोके वापरा, बरोबर-चूक काय ते तपासा. नाते असो वा आयुष्यातला कोणताही मोठा निर्णय असो,स्वतःचा विचार, घरच्यांचा सल्ला आणि आपले संस्कार हे सोबत ठेवा. तरुण वयात प्रेमात किंवा मैत्रीत आपण पटकन गुंततो. समोरची व्यक्ती खरी कोण आहे, तिचा उद्देश काय आहे, तिची पार्श्वभूमी काय आहे हे समजून घेणे खूप गरजेचे आहे. कारण एक चुकीचा निर्णय अख्खे आयुष्य बदलू शकतो.



म्हणूनच शिकणें जसे महत्त्वाचे आहे तसेच चांगले संस्कार, घरच्यांशी मोकळेपणाने बोलणे आणि आपल्या मुल्यांशी प्रामाणिक राहणे तितकेच महत्त्वाचे आहे. हिंदू धर्माची शिकवणच अशी आहे ज्ञानासोबतच चारित्र्य आणि चांगली वागणूक हाच आयुष्याचा पाया आहे. सोशल मीडियावर अनोळखी लोकांशी बोलताना जपून राहा. जर कुणी फसवत असेल, दबाव टाकत असेल, चुकीच्या मार्गाला नेत असेल तर घाबरू नका. थेट कायदेशीर तक्रार करा. भारतात कुणावरही जबरदस्ती करायला कायद्याने परवानगी नाही. प्रत्येकाच्या स्वातंत्र्याची आणि सुरक्षेची काळजी घेतली जाते.

**राधा पिंपळापुरे**

# रासायनिक खत खरेदीत शेतकऱ्यांची लूट थांबवा - कपिल ढोके

» लिंकिंग बंद करा, साठेबाजांवर कारवाई करा; अन्यथा आंदोलनाचा इशारा



• अकोला | प्रतिनिधी •

खरीप हंगाम अगदी तोंडावर येऊन ठेपला असताना जिल्ह्यात रासायनिक खतांच्या खरेदीत शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर लूट सुरू असल्याचा गंभीर आरोप युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कपिल ढोके यांनी केला आहे. खत विक्रेत्यांकडून लिंकिंग पद्धतीने सक्तीची विक्री, जादा दराने खतांची विक्री आणि कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा मुद्दा त्यांनी प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिला.

या पार्श्वभूमीवर कपिल ढोके यांनी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अकोला यांची भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. खरीप हंगामासाठी शेतकरी खत व बियाण्यांची खरेदीला सुरुवात करत असतानाच विक्रेत्यांकडून अडथळे निर्माण होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. अनेक ठिकाणी खत खरेदीसाठी इतर अनावश्यक वस्तू घेण्याची सक्ती केली जात असून ही लिंकिंग पद्धत सर्रासपणे सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. काही विक्रेत्यांकडून खतांचा साठा लपवून ठेवून बाजारात कृत्रिम टंचाई निर्माण केली जात आहे. परिणामी शेतकऱ्यांना जादा दराने खत खरेदी करावी लागत असून त्यांची आर्थिक अडचण अधिकच वाढत आहे. या प्रकारामुळे खरीप हंगामाच्या तयारीवर थेट परिणाम होत असल्याने प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करणे गरजेचे असल्याचे ढोके यांनी नमूद केले.

**प्रशासनाकडे ठोस मागण्या :**
• खत विक्रीतील लिंकिंग पद्धत तात्काळ बंद करावी • जादा दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कठोर कारवाई करावी • खतांचा साठा लपवून काळाबाजार करणाऱ्यांवर छापेमारी करून गुन्हे दाखल करावेत • शेतकऱ्यांना पुरेशा प्रमाणात खते सहज उपलब्ध करून द्यावीत • खरीप हंगामात खत व बियाण्यांचा नियमित आणि सुरळीत पुरवठा सुनिश्चित करावा

शेतकऱ्यांना अडचणीत आणणाऱ्या कोणत्याही प्रकाराला युवक काँग्रेस सहन करणार नसून तात्काळ कारवाई न झाल्यास शेतकऱ्यांच्या हितासाठी तीव्र आंदोलन उभारले जाईल असा ठाम इशारा यावेळी कपिल ढोके व उपस्थितांच्या वतीने देण्यात आला. यावेळी निवेदन देताना शिवाजी नवले, वैभव झांबरे, सोनु केवट, मिलिंद झांबरे, गोपाल सावरकर, आतिफ उमेर, निसार पठाण, गजानन जगताप, पवन निकम, दिपक सित्रे, शुभम थोरात, अर्जुन मालाणी, विपुल लाखे, वैभव लाखे, प्रविण माठे, गौरव गायकवाड, अभय चतार यांच्यासह युवक काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी महापौरांच्या प्रभागातच कचरा संकलनाचा बोजवारा

» शहीद वीर भगतसिंग चौकात ढिगारे; नागरिकांचा संताप उसळला



• अकोला | प्रतिनिधी •

शहर स्वच्छतेच्या गप्पा आणि वास्तव यामधील दरी पुन्हा एकदा उघड झाली आहे. महानगर पालिका क्षेत्रातील प्रभाग क्रमांक ५ मधील लहान उमरी परिसरात शहीद वीर भगतसिंग चौकात थेट पुतळ्यासमोरच कचऱ्याचे मोठे ढीग साचल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे हा प्रभाग माजी महापौर अर्चना जयंत मसने आणि विद्यमान सभापती विजय अग्रवाल यांचा असल्याने प्रशासनाच्या कामकाजावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मागील अनेक महिन्यांपासून शहरात कचरा संकलनाचा बोजवारा उडाल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत आहेत. शहर सुधार आघाडी सत्तेत आल्यानंतर किमान स्वच्छतेच्या प्रश्नावर तरी ठोस सुधारणा होतील, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली होती. मात्र प्रत्यक्षात परिस्थिती बदलण्याऐवजी 'जैसे थे'च राहिल्याचे चित्र दिसून येत आहे. मनपाच्या सर्वसाधारण सभांमध्ये स्वच्छतेच्या मुद्द्यावरून अनेकदा गदारोळ झाला, ठरावही मंजूर झाले, पण प्रत्यक्ष अंमलबजावणीत मात्र पूर्णपणे निष्काळजीपणा दिसून येत आहे. पडीक वार्डच्या प्रश्नावरही चर्चा झाली, तरीही नागरिकांच्या दैनंदिन आयुष्यात कोणताही सकारात्मक बदल झालेला नाही.

मंगळवारी सकाळी शहीद वीर भगतसिंग चौकात पुतळ्यासमोरच मोठ्या प्रमाणात कचरा साचलेला दिसून आला. दुर्गंधी, अस्वच्छता आणि आजारांचा धोका वाढवणारी ही स्थिती पाहून स्थानिक नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या. परिसरातील नागरिकांनी या प्रकाराचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल करत प्रशासनाला जाब विचारला आहे.

"स्वच्छतेच्या नावावर कर वसूल केला जातो; पण सेवा कुठे आहे?" असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. विशेषतः शहरातील महत्त्वाच्या चौकात आणि तेही लोकप्रतिनिधींच्या प्रभागात अशी परिस्थिती असल्याने इतर भागांची अवस्था काय असेल, असा सवालही उपस्थित होत आहे. एकंदरीतच, कचरा व्यवस्थापनातील ढिसाळपणाचा फटका आता सत्ताधाऱ्यांच्या प्रभागाला बसल्याने प्रशासन जागे होणार का, की पुन्हा एकदा केवळ आश्वासनांचीच धूळफेक होणार, याकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

# शिवछत्रपतींचा अवमान; बागेश्वरविरोधात कारवाईची मागणी

» कारवाई न झाल्यास प्रहारचा राज्यभर आंदोलनाचा इशारा



• अकोला | प्रतिनिधी •

महाराष्ट्राच्या इतिहासाबाबत वादग्रस्त वक्तव्य केल्याच्या पार्श्वभूमीवर बागेश्वर नावाच्या कथित बाबाविरोधात राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. "शिवराय थकले आणि राजपाट समर्थकांडे दिला" असा दावा केल्याने शिवप्रेमींमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या प्रकरणावर प्रहार जनशक्ती पक्षाचे अकोला जिल्हा महासचिव राजेश पाटील खारोडे यांनी संतप्त प्रतिक्रिया देत, "इतिहासाची जाण नसताना महाराष्ट्राच्या अस्मितेशी खेळ करणाऱ्यांना सहन केले जाणार नाही. संबंधित व्यक्तीवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी, अन्यथा प्रहार जनशक्ती पक्ष रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल," असा इशारा दिला.

दरम्यान, या कथित बाबाने यापूर्वीही संत परंपरेतील महान व्यक्तिमत्वांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे संत ज्ञानेश्वर व संत तुकोबाराय यांच्या वारशावरही आघात करण्याचा प्रयत्न होत असल्याची भावना समाजात व्यक्त केली जात आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरेवर गालबोट लावण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोपही केला जात आहे. या कार्यक्रमाला काही सत्ताधारी नेते उपस्थित असल्याने त्यांच्यावरही टीका होत आहे. "शिवछत्रपतींचा अवमान होत असताना सत्ताधारी गप्प का?" असा सवाल उपस्थित केला जात असून, संबंधित बाबावर महाराष्ट्रात बंदी घालण्याची मागणी जोर धरत आहे. राज्य सरकारने या प्रकरणात तातडीने भूमिका स्पष्ट करून योग्य ती कारवाई करावी, अन्यथा जनतेचा रोष तीव्र होईल, असा इशारा देण्यात आला आहे.

## निधन वार्ता



• अकोला | प्रतिनिधी •

रेणुका नगर, काळी पाण्याची टाकी जवळ डाबकी रोड अकोला येथील रहिवासी रामकृष्ण हिरळकर यांच्या पत्नी मंदाबाई रामकृष्ण हिरळकर यांचे दिनांक 27/04/2026 रोजी 3 दुपारी वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यामागे पती, मुलगा, सून व नातू असा आप्त परिवार आहे. पी.आर. हिरळकर (सुवर्णकार) चे संचालक प्रशांत हिरळकर यांच्या त्या आई होत.

## विविध रेल्वेस्थानकात तिकीट तपासणी

• अकोला | प्रतिनिधी •

प्रवाशांना सुरक्षित, सुरळीत आणि आरामदायी प्रवासाचा अनुभव देण्याच्या आपल्या वचनबद्धतेनुसार भुसावळ विभागाने अनधिकृत व विनातिकिट प्रवासाला आळा घालण्यासाठी प्रयत्न अधिक तीव्र केले आहेत. रेल्वे विभागाने तिकीट तपासणी मोहिमेत ४९१ प्रकरणांमधून २ लाख ८२ हजार ७७० रुपये दंड वसूल केला आहे. भुसावळ विभागातील अकोल्यासह विविध रेल्वे स्थानकात फोर्ट्रेस तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली. विशेष मोहीम विभागातील अकोला, बडनेरा व अमरावती या स्थानकांचा समावेश होता. प्रवाशांनी नियमांचे पालन करून वैध तिकीटासह प्रवास करावा. या मोहिमेद्वारे एकूण ४९१ प्रकरणांमधून २ लाख ८२ हजार ७७० रुपये दंड वसूल करण्यात आला. तसेच स्थानक परिसरात अनधिकृतरीत्या व्यवसाय करणाऱ्या ५ विक्रेत्यांवर कारवाई करून गुन्हे दाखल केले.


## जाहिर नोटीस

सर्व जनतेस वित्तीय संस्थाना बँकांना या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते कि आमचे पक्षकार (SMFG India Home Finance Company Ltd. Br. Akola) एस एम एफ जी होम फायनान्स क. लि. शाखा - अकोला ता. जि. अकोला यांनी ग्राहक नामे श्री. अतुल रमेशराव बास्कडे रा. श्रीराम नगर, गुडधी रोड अकोला ता. जि. अकोला यांनी खालील मालमत्ता आमचे पक्षकाराकडे सदरची मिळकत गहाण ठेऊन कर्ज मिळण्या करीता अर्ज केला आहे.

मालमत्तेचे वर्णन :- मौजे - गुडधी शेत सर्व्हे क्र. ६०/ १ मधील लेआऊट प्लॉट क्र. ६ क्षेत्रफळ ३६८ ची मीटर या पैकी पूर्व पश्चिम वाटणीने दक्षिणेकडील भागाचा प्लॉट क्षेत्रफळ १८४ ची मीटर (१९८१.० ची. फु.) त्यावरील बांधकामासह वॉर्ड क्र. A-११, मालमत्ता क्र. ११९८, म.न.पा. हद्दीतील अकोला, ता. जि. अकोला त्याचा चतुःसिमा :- पूर्वेस : सरकारी रस्ता, पश्चिमेस :- श्री. साखडी यांचे लेआऊट, उत्तर :- यातील उर्वरित प्लॉट/ जागा, दक्षिण :- प्लॉट क्र. ५ ची जागा वरील सदरहू मालमत्ता हि श्री. अतुल रमेशराव बास्कडे यांना दि. ११/०२/२०११ रोजी रजि. दस्त क्र. ८२२/२०११ च्या बक्षीस पत्रद्वारे मिळाली आहे. सदरहू मालमत्तेचे पूर्वीचा मूळ खरेदी खत दि. २२/०३/२००४ दस्त क्र. १९२३/२००४ व दि.२१/०१/२०११ रोजीचे रजि. दस्त क्र. ४०४ व दि. ६३/०१/२०११ रोजीचे रजि. दस्त क्र. ४४७४/२०११ सदरहू मूळ खरेदीखत श्री. अतुल रमेशराव बास्कडे यांचे जवळून दिनांक २१/०४/२०२६ रोजी गहाळ झाले आहे. त्या करिता श्री. अतुल रमेशराव बास्कडे यांनी दि. २७/०४/२०२६ ला पोलीस स्टेशन सिविल लाईन येथे रीतसर तक्रार केली आहे. तरी वरील मालमत्ता बाबत आज रोजी कुणाचाही कसल्याही प्रकारचा हक्कसंबंध खरेदी, गहाण, बोजा व इसार व इतर काही व्यवहार असल्यास वर दिलेल्या पत्यावर ७ दिवसाच्या आत लेखी हरकत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी अन्यथा कोणाचाही कसल्याही प्रकारचा आक्षेप नाही. असे समजून आमचे पक्षकार (SMFG India Home Finance Company Ltd. Br. Akola) एस एम एफ जी होम फायनान्स क. लि. शाखा - अकोला वरील मालमत्ता गहाण ठेऊन श्री. अतुल रमेशराव बास्कडे यांना कर्जाची रक्कम वितरित करतील त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. नाही करीता जाहीर नोटीस.

दिनांक : २८/०४/२०२६
ठिकाण : अकोला

अधिवक्ता रुपेश ना. इसापे
(नोटरी भारत सरकार)
ऑफिस: आनंद बेकरी जवळ, रामदास पेठ,
अकोला. मो. ९४२३४३०१७१

## जाहिर नोटीस

प्रोसेस नं 1570/२०२६ तारीख: २१/०४/२०२६

**अकोला येथील वि. दिवाणी न्यायाधीश (व.स्तर) यांच्या न्यायालयात**
**"वाद प्रश्न नक्की करण्यासाठी समन्स"**
(दिवाणी व्यवहार संहिता, नियमक्रम ५ नियम १५)
अनुसूची एक, परिशिष्ट व क्र.२

दावा रु./- नि.दि.दा.नं.३७१/२०२५
पी. ता.: ०४/०५/२०२६

**साई कन्स्ट्रक्शन... विरुद्ध... हिरालाल**

बनाम:- 1.Hiralal Jagjivandas, 2.Gulam Nabi Sk.Iman, 3.Iliyas Ahmed Abdul Latif, All R/o- 1783, Kalal Ki Chawl, Akola Tq. Dist. Akola

ज्याअर्थी वादी यांनी " SUIT FOR EVICTION, POSSESSION, ARREARS OF RENT AND INQUIRY INTO FUTURE MESNE PROFIT" करिता तुमच्या विरुध्द या न्यायालयात वाद दाखल केला आहे, त्याअर्थी त्या वादासंबंधी तुम्हाला जे काही सांगावयाचे असेल ते सांगण्यासाठी दिनांक ४/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता तुम्ही स्वत किंवा ज्यास योग्यरित्या सूचना दिलेल्या आहेत व जो वादसंबंधीच्या महत्वाच्या सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकेल अशा वकीलामार्फत किंवा अशा सर्व प्रश्नांचे उत्तर देऊ शकणारा एखादा इसम बरोबर असलेल्या वकीलामार्फत या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर समन्स बजावण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा निर्देश देण्यात येत आहे की समन्स बजावल्यापासून ३० दिवसाचे आत तुम्ही तुमच्या बचावाचे लेखी निवेदन दाखल करावे व त्याच दिवशी तुमचा बचाव किंवा उलट वाद (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) ज्या दस्तऐवजावर आधारलेला असेल असे तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेले सर्व दस्तऐवज सादर करावेत आणि जर तुम्ही तुमच्या पंचायया किंवा उलट वादाच्या (सेट ऑफ) किंवा प्रतिवाद (काउंटर क्लेम) पुष्ठ्यर्थ पुरावा म्हणून तुमच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या किंवा नसलेल्या इतर कोणत्याही दस्तऐवजावर विसंबून असाल तर अशा दस्ताऐवजाची एक सूची करून ती सूची तुमच्या बचावाच्या लेखी निवेदनास जोडावी. तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादाची सुनावणी केली जाउन त्याचा निर्णय केला जाईल. आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमून केलेल्या तारखेस किंवा कालावधीत जावणीकरिता तुमचा पत्ता दाखल करण्यात तुम्ही कसूर केल्यास तुमचा बचाव रद्द केला जाण्यास पात्र ठरेल. आज दिनांक २१/०४/२०२६ रोजी अकोला येथे माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. समन्स मिळाल्यापासून ३० दिवसाच्या आत लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे.

शिक्का
आदेशानुसार
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व स्तर), अकोला

## जाहिर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी.नं. ६४५/२०२६ प्रोसेस नं: ५४९३/२०२६
पी. ता.: १६/०६/२०२६ दिनांक : २२/०४/२०२६

**अर्जदार :** - १. मंदा सतिष रायबोले, रा. गॅस गोडाउन, न्यु भिम नगर, कृषी नगर, अकोला. २. मयुर सतिष रायबोले, रा. दामले हॉस्पिटल जवळ, पंचशिल नगर, कृषी नगर, अकोला. ३. अश्विन सतिष रायबोले, रा. न्यु भिम नगर, एचपी गॅस गोडाउन जवळ, अकोला. ४. शुभम सतिष रायबोले, रा. न्यु भिम नगर, एचपी गॅस एजन्सी जवळ, अकोला.

__विरुध्द__

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता : मयत** :- सतिष रतन रायबोले
**पत्ता** :- रा. न्यु भिम नगर, एचपी गॅस एजन्सी जवळ, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सतिष रतन रायबोले यांचे दि. ३०/११/२०२५ रोजी न्यु भिम नगर, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०६/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही, असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला

## CHANGE IN NAME

I, **Maherunnisa Shaikh Yusuf**, hereby declare that my name mentioned on my School Leaving Certificate is **Maherunnisa Shaikh Samad**.
Sign.

## CHANGE IN NAME

I, **Aasiya Bi Shaikh Babbu**, hereby declare that my name mentioned on my School Leaving Certificate is **Aasiya Bano Mohammed Yusuf**.
Sign.

## जाहिर नोटीस

प्रोसेस नं 1570/२०२६ तारीख: २१/०४/२०२६

**विद्यमान जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति सत्र न्यायाधीश,**
**अकोला यांचे न्यायालय**
गैरअर्जदार/गैरअपिलार्थी यांनी अपिलमध्ये चौकशी तारीख रोजी हजर होण्यासाठीची जाहीर नोटीस

Guardian Ward No. 221/ 2026 Fix for: 16/06/2026

1) Sandhya Sharad Tayade,
2) Ku. Trupti Sharad Tayade,
3) Jay Sharad Tayade,
On behalf of mother de-facto guardian signed the petition,
R/o Nakashi, Tq. Balapur, Dist. Akola
--- Vrs ---
Nil

ज्याअर्थी या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार यांनी "जिल्हा न्यायाधीश- २ तथा अति सत्र न्यायाधीश, अकोला" या न्यायालयामध्ये "APPLICATION U/S. 7 AND 29 & 34 GUARDIANS AND WARDS ACT 1890 FOR GRANT PERMISSION TO SALE THE PROPERTY OF MINOR KU. TRUPTI SHARAD TAYADE AND JAY SHARAD TAYADE" दिवाणी प्रक्रिया संहिता प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. सदर प्रकरणामध्ये पुढील चौकशी तारीख १६/०६/२०२६ आहे. त्याअर्थी आपणांस याद्वारे कळविण्यात येते की, जर आपण स्वत: किंवा आपले वकील अथवा आपल्या वतीने कायदेशीर बाजू मांडणारा व्यक्ती चौकशी तारखेला १६/०६/२०२६ जिल्हा न्यायालयात सकाळी ११:०० वाजता आपणापैकी कोणीही हजर झाले नाहीत तर सदर प्रकरणामध्ये आपल्या गैरहजेरीत कायदेशीर आदेश पारीत करण्यात येईल. आज दिनांक २१ माहे एप्रिल सन २०२६ रोजी माझे सही व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
अधिक्षक
न्यायीक विभाग, जिल्हा न्यायालय, अकोला

## जाहिर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी.नं. ५१२/२०२६ प्रोसेस नं.: ५५१०/२०२६
पी. ता. ११/०६/२०२६ दिनांक : २४/०४/२०२६

**अर्जदार :** - १. कांता अरूण गणोजे, २. प्रशाम अरूण गणोजे, ३. श्रीकांत अरूण गणोजे, सर्व रा. बी- ४०५, कमल विला को. ऑप. हाउसिंग सोसायटी, कात्रज कोंढवा रोड, गोकुळ नगर, पुणे शहर, ता. जि. पुणे.

__विरुध्द__

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता : मयत** :- अरूण गोविंदसा गणोजे
**पत्ता** :- रा. बी ४०५, कमल विला को. ऑप. हाउसिंग सोसायटी, कात्रज कोंढवा रोड, गोकुळ नगर, पुणे शहर, ता. जि. पुणे.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अरूण गोविंदसा गणोजे यांचे दि. २१/०८/२०१४ रोजी नॅशनल कॅन्सर इन्स्टीट्यूट, नागपूर येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ११/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरून सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २४/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला

## जाहिर नोटीस

प्रोसेस क्र. 979/26 18/04/2026

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**श्रीमती डि.एम.पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क.स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/ 111/2026
नंदा भिमराव शेळके वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : 22-06-2026

**अर्जदार :** - १. नंदा भिमराव शेळके, वय अं ५६ वर्ष, धंदा - घरकाम, रा.मु.पो. मनारखेड, ता. बाळापूर, जि. अकोला, २. रजनी अनुभव सिंह, वय अं ४६ वर्ष, धंदा घरकाम, रा. ऑरमेट कॅलिस्टो, ए.विंग ३०७ टेमघर, भिवंडी, दाईकरवाडी ठाणे, ३. वृंदा संजय गाढवे, वय अं ५२ वर्ष, धंदा घरकाम, रा. टिचर कॉलनी पारस ता. बाळापूर जि. अकोला

__विरुध्द__

**गैरअर्जदार :** निरंक

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये. या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दुर्गा शंकरलाल जोशी यांचे दि. १८/०१/१९९७ रोजी लोरडिया, ता. फलोदी, जि. जोधपूर, राजस्थान येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (क. स्तर), बाळापुर

## जाहिर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी.नं. ६६५/२०२६ प्रोसेस नं. : ५५४२/२०२६
पी. ता.: १६/०६/२०२६ दिनांक: २३/०४/२०२६

**अर्जदार :** - महेश शंकरलाल जोशी, रा. ज्ञानेश्वर नगर, गल्ली नं. ५, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

__विरुध्द__

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता : मयत** :- दुर्गा शंकरलाल जोशी
**पत्ता** :- रा. ज्ञानेश्वर नगर, गल्ली नं. ५, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये. या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दुर्गा शंकरलाल जोशी यांचे दि. १८/०१/१९९७ रोजी लोरडिया, ता. फलोदी, जि. जोधपूर, राजस्थान येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १६/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायलयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला

## जाहिर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), अकोला यांचे न्यायालयात**

एम.जे.सी. नं. ६८७/२०२६ प्रोसेस नं.: ५६६७/२०२६
पी. ता.: १८/०६/२०२६ दिनांक: २७/०४/२०२६

**अर्जदार :** - १. ताई वासुदेव गोसटकर, रा. शरद नगर, शिवर, पो. एमआयडीसी शिवर, अकोला. २. सागर वासुदेव गोसटकर, रा. शरद नगर, शिवर, अकोला.

__विरुध्द__

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता : मयत** :- वासुदेव गोपालराव गोसटकर
**पत्ता** :- रा. शरद नगर, शिवर, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत वासुदेव गोपालराव गोसटकर यांचे दि. ०१/०६/२०२५ रोजी शिवर अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार,
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व. स्तर), अकोला

## जाहिर नोटीस

प्रोसेस क्र. 980/26 18/04/2026

**दिवाणी न्यायालय क. स्तर बाळापुर**
**श्रीमती डि.एम.पाटील यांचे न्यायालयात**
**दिवाणी न्यायाधिश क.स्तर. बाळापुर, बाळापुर, अकोला.**

दिवाणी किरकोळ अर्ज/109/2026
केसरबाई देविदास शेळके वि. कोणीही नाही
पुढिल तारिख : 22-06-2026

**अर्जदार :** - १. केसरबाई देविदास शेळके, वय अं ७३वर्ष, धंदा घरकाम. २. नंदा भिमराव शेळके, वय अं ५६ वर्ष, धंदा घरकाम. ३. सुजय भिमराव शेळके, वय अं २७ वर्ष, धंदा शिक्षण. ४. वैताली भिमराव शेळके, वय अं २६ वर्ष, धंदा - शिक्षण, सर्व रा. मु.पो. मनारखेड, ता. बाळापुर, जि. अकोला.

__विरुध्द__

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी कलम २ बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII १८२७ अंतर्गत वारस प्रमाणपत्र मिळणे करीता वि.न्यायालयामध्ये अर्ज केला आहे. मय्यत भिमराव देविदास शेळके हे दिनांक ११.०३.२०२६ रोजी मनारखेड ता. बाळापुर जि. अकोला येथे मरण पावले. वरील नमुद अर्जदार हे मय्यत भिमराव देविदास शेळके यांचे एकमेव वारस असल्यामुळे त्यांना शासकीय, निमशासकीय कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जा विरुध्द इतर कोणतीही कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप असल्यास त्यांनी या न्यायालयात स्वत: अथवा वकीलामार्फत दिनांक २२/०६/२०२६ रोजी किंवा त्याअगोदर या न्यायालयात हजर राहावे अन्यथा प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक १७.०४.२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी प्रकाशित करण्यात येत आहे.

शिक्का
आदेशानुसार,
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (क. स्तर), बाळापुर


जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट क्र.४१,४२, श्रीकांत नगर, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला -४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १४५
आर.एन.आय.नो.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन्स क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय : अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन : ९८२३०१६३०० | ९४२२९५६२६८
email : atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# ढोल-ताशांच्या गजरात आर्वी पेटली

## नगरपरिषदेच्या 'हुकूमशाही'ला जनतेचा एल्गार





**आर्वी/जनमाध्यम**

शहराच्या मध्यवर्ती रस्त्यांवर आज संतापाचा आवाज घुमला ढोल-ताशांच्या कडकडाटात नागरिकांनी आर्वी नगरपरिषदेच्या मनमानी कारभाराविरोधात जोरदार एल्गार पुकारला. काँग्रेस नेते व प्रहार सोशल फोरमचे संस्थापक अध्यक्ष बाळा जगताप यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनाने प्रशासनाच्या 'झोपे'ला धक्का दिला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), प्रहार सोशल फोरम, ऑटो युनियन संघटना आणि गवंडी बांधकाम मंजूर संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने उभारलेल्या या आंदोलनात शेकडो नागरिक सहभागी झाले. करवाढ मागे घ्या, अन्याय थांबवा अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.नगरपरिषदेने केलेली मकान करवाढ ही जुन्या प्रणालीच्या तुलनेत तब्बल पाच पट असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. ही वाढ म्हणजे जनतेचे सरळ आर्थिक शोषण असून, त्यामानाने सुविधा मात्र अत्यंत अपुऱ्या असल्याचा संताप व्यक्त करण्यात आला. करवाढीचा बोजा काढा, नागरिकांना दिलासा द्या, ही प्रमुख मागणी आंदोलकांनी लावून धरली.शहरातील नाले-गटारे तुंबलेली असून, त्यामुळे डासांचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. साथीच्या रोगांचा धोका निर्माण झाल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली.

पावसाळ्याआधी तातडीने स्वच्छता मोहीम राबवण्याची मागणी करण्यात आली. तसेच कचरा संकलनासाठी असलेल्या घंटागाड्या वेळेवर येत नसल्याने नागरिक त्रस्त असून, गाड्यांची संख्या वाढवावी, अशी मागणीही करण्यात आली.

वॉर्ड क्रमांक २ व १२ मध्ये तीव्र पाणीटंचाई भेडसावत असून, आठ-आठ दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याची गंभीर बाब समोर आली. नवीन पाइपलाईन कार्यान्वित होईपर्यंत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली. शहरात ऑटोस्टँड नसल्याने वाहतूक व्यवस्थेत गोंधळ निर्माण होत असून, तातडीने स्टँड उभारण्याची गरज आंदोलकांनी अधोरेखित केली.DBR-२ व DBR-३ अंतर्गत घरकुल लाभार्थ्यांना पहिला टप्पा मिळालेला नसल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.

तसेच बांधकाम कामगारांसाठी मंजूर अतिरिक्त २ लाख रुपयांच्या अनुदानाची तरतूद करून निधी त्वरित वितरित करावा, अशीही मागणी करण्यात आली.या आंदोलनात विरोधी पक्ष गटनेते पंकज वाघमारे, सुधीर जाचक, विक्रम भगत, सोहेल खान, संजय कुरील, गुड्डू पठाण, फारुख मिस्त्री, संतोष गौरकर, धीरज गिरडे, संजय डोंगरे, सुरेंद्र वाटकर, राजीव देऊळकर, चेतन घोडमारे, चेतन डकरे, युवराज रामटेके, प्रशांत रामटेके, वेदांत वानखेडे, समीर दिलकश, किशोर गुल्हाने, नाना बिलोली, राहुल थोरात यांच्यासह अनेक नगरसेवक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रशासनाला जाग येणार का?

ढोल-ताशांच्या गजरात व्यक्त झालेला हा जनआक्रोश आता प्रशासनाला जागे करणार का, की नागरिकांना पुन्हा अशाच आंदोलनांचा मार्ग अवलंबावा लागआहे हा प्रश्न आर्वीकरांच्या मनात ठाण मांडून बसला आहे.

# सेवाग्राम स्थानकावर ऑटोवाल्यांचा माज प्रवाशांना शिव्या, आरटीओ गप्प



**वर्धा/जनमाध्यम**

सेवाग्राम रेल्वे स्थानक येथे ऑटोचालकांच्या मनमानीने प्रवाशांचे अक्षरशः हाल सुरू आहेत. रेल्वेतून उतरलेल्या प्रवाशांना सेवा मिळण्याऐवजी अपमानाची वागणूक मिळत असल्याने संतापाची लाट उसळली आहे. ऑटो चालकांकडून वाद घालणे, मनमानी दर सांगणे आणि नकार दिल्यास शिवीगाळ करणे हीच जणू काही इथली रोजची 'सेवा' झाली आहे.भाडे आमचे, नियम आमचे अशा थाटात काही मोजक्या ऑटोचालकांनी स्थानक परिसरात दादागिरी सुरू केली आहे. परिणामी, प्रवाशांना नाईलाजाने डोके खाली घालून पायी निघावे लागत आहे. या गुंडगिरीमुळे प्रामाणिक ऑटोचालकही हैराण झाले असून, काही मोजक्या लोकांमुळे आमच्यावर डाग लागतो, अशी खंत ते व्यक्त करत आहेत.

या प्रकाराबाबत अनेक वेळा प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि वाहतूक विभागाकडे तक्रारी करूनही कुठलीच कारवाई होत नसल्याने संशयाची सुई आरटीओकडे वळली आहे. ऑटोवाल्यांचा माज एवढा कसा वाढला असा प्रश्न नागरिक विचारत आहेत. काही ऑटो विनाआवश्यक कागदपत्रे इन्शुरन्स, लायसन्स यांशिवाय सर्रास धावत असल्याचेही धक्कादायक वास्तव समोर आले आहे.विशेष म्हणजे, दुचाकीस्वारांवर मात्र वाहतूक पोलीसांचा धडाका सुरू असतो. चालत्या वाहनांचे फोटो काढून चालन पाठवले जाते, पण ऑटोवाल्यांच्या बाबतीत मात्र 'गरीब आहेत' असे कारण पुढे केले जाते. मग दुचाकीस्वार श्रीमंतच आहेत का असा प्रश्न वाहनचालकांनी उपस्थित केला आहे.प्रवाशांची होणारी ही रोजची पिळवणूक थांबवण्यासाठी प्रशासनाने तात्काळ जागे होऊन दंडात्मक कारवाई करावी, अन्यथा नागरिकांचा संताप उफाळून येईल, असा इशारा दिला जात आहे. आता पाहायचे एवढेच आरटीओ आणि वाहतूक विभाग खरोखरच कारवाई करणार, की पुन्हा 'मस्त' राहणार,

# आठवडी बाजारातून दुचाकी चोरी

**समुद्रपूर-** स्थानिक आठवडी बाजार परिसरात दुचाकी चोरीची घटना उघडकीस आली. रेनकापूर येथील स्वप्नील भाले (४१) हे खरेदीसाठी बाजारात आले होते. त्यांनी मटन मार्केटजवळ आपली एमएच-३२-एएम-५९२४ क्रमांकाची दुचाकी उभी केली होती. खरेदी आटोपून परत आले असता दुचाकी जागेवर नसल्याचे निदर्शनास आले. अज्ञात चोरट्याने वाहन पळविल्याची खात्री झाल्यानंतर त्यांनी समुद्रपूर पोलिसांत तक्रार दाखल केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरू केली आहे. आठवडी बाजारात वाढत्या गर्दीचा फायदा घेत चोरट्यांकडून वाहनचोरीच्या घटना वाढत असल्याची चर्चा नागरिकांत सुरू आहे. त्यामुळे बाजार परिसरात पोलिस गस्त वाढवावी, अशी मागणी व्यापारी व नागरिकांकडून होत आहे.

# कलिंगडातून विषबाधेचा संशय; एकाच कुटुंबातील चौघांचा हृदयद्रावक अंत



**मुंबई/जनमाध्यम**

अन्नातून झालेल्या विषबाधेमुळे एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पती-पत्नी आणि त्यांच्या दोन अल्पवयीन मुलींचा या घटनेत मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पहाटे ५ वाजताच्या सुमारास कुटुंबातील सर्वांची प्रकृती अचानक बिघडली. त्यांना तीव्र उलट्या व जुलाब सुरू झाले. शेजाऱ्यांनी तत्काळ त्यांना रुग्णालयात दाखल केले. मात्र डॉक्टरांच्या प्रयत्नांनंतरही चौघांचाही मृत्यू झाला.शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालात अन्नातील विषबाधेमुळे त्यांच्या किडन्यांवर गंभीर परिणाम झाल्याचे स्पष्ट झाले आहे. पुढील तपासासाठी मृतदेहांचे व्हिसेरा नमुने न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठवण्यात आले असून, अंतिम अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.मृत अब्दुल्ला यांच्या आईने या घटनेबाबत हृदयद्रावक प्रतिक्रिया देताना सांगितले, माझ्या मुलाचे संपूर्ण कुटुंब संपले. अजूनही विश्वास बसत नाही. गेल्या आठवड्यातच आम्ही भेटलो होतो. माझ्या नातींसोबत छान वेळ घालवला होताष्ठ आता सगळं संपलं. या शब्दांत त्यांनी आपल्या दुःखाला वाट मोकळी करून दिली.दरम्यान, नातेवाईकांनी कलिंगडातून विषबाधा झाल्याचा संशय व्यक्त केला आहे.

कुटुंबाने चिकन बिर्याणीसोबत कलिंगड खाल्ल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी संबंधित कलिंगड विक्रेत्याची चौकशी केली असता, त्याच्याकडून इतर कुणालाही त्रास झाल्याची तक्रार आढळून आलेली नाही. तरीही या प्रकरणाचा सर्व बाजूंनी तपास सुरू आहे.घटनेच्या वेळी शेजारी राहणाऱ्या डॉक्टरांनी सर्वांना वाचवण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सीपीआर देऊन तातडीने रुग्णालयात हलवले. मात्र शरीरात गेलेल्या विषारी घटकामुळे त्यांच्या प्रकृतीत झपाट्याने बिघाड झाला आणि अखेर चौघांचाही मृत्यू झाला.या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून, अन्नसुरक्षेच्या प्रश्नावरही गंभीर चिंता व्यक्त केली जात आहे.

# कोचिंग क्लासेसबाबत पालकांनी सजग राहावे-प्रा.अजय पहाडे


## अकरावीतील विद्यार्थ्यांवर वाढता ताण; वैयक्तिक लक्षाच्या अभावाची चिंता

**वर्धा/जनमाध्यम**

अकरावीमध्ये प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या आयुष्यात महत्त्वाचा टप्पा सुरू होतो. मात्र या काळात कोचिंग क्लासेसची वाढती स्पर्धा, पालकांच्या अपेक्षा आणि जाहिरातींचा प्रभाव यामुळे अनेक विद्यार्थी मानसिक तणावाखाली येत असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर पालकांनी अधिक सजग राहण्याची गरज असल्याचे मत प्रा. अजय म. पहाडे (अध्यक्ष, प्रोफेशनल टीचर्स असोसिएशन, वर्धा जिल्हा) यांनी व्यक्त केले.

प्रा. पहाडे यांनी सांगितले की, लहानपणापासूनउ मुलांना नियंत्रित वातावरणात ठेवणारे पालक अकरावीच्या टप्प्यावर मात्र त्यांना मोठ्या कोचिंग क्लासेसमध्ये पाठवतात. १६ ते १७ वयोगटात अचानक मिळणारे स्वातंत्र्य, नवीन मित्रपरिवार आणि गर्दीचे वातावरण यामुळे विद्यार्थ्यांच्या वागणुकीत बदल होण्याची शक्यता वाढते.NEET, JEE यांसारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी मोठ्या क्लासेसकडे कल वाढला असला तरी वैयक्तिक लक्षाचा अभाव ही गंभीर समस्या ठरत आहे. अनेक वेळा विद्यार्थ्यांच्या शंका अनुत्तरित राहतात, परिणामी त्यांचा आत्मविश्वास कमी होतो.

सुरुवातीच्या काळात उत्साहाने सुरू झालेली तयारी नंतर कमी होत असल्याचेही त्यांनी नमूद केले.फक्त जाहिरातींना भुलून किंवा क्लासमधील



विद्यार्थ्यांची संख्या पाहून निर्णय घेऊ नये. पालकांनी मुलांच्या अभ्यासावर, मित्रपरिवारावर आणि मोबाईल वापरावर सातत्याने लक्ष ठेवणे आवश्यक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.तसेच, लहान गटांमध्ये किंवा वैयक्तिक लक्ष देणाऱ्या शिक्षकांकडूनही गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळू शकते, हे पालकांनी लक्षात घ्यावे, असेही त्यांनी सांगितले. एकूणच, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योग्य मार्गदर्शन, समतोल अपेक्षा आणि पालकांची सक्रिय भूमिका महत्त्वाची असल्याचे या निमित्ताने अधोरेखित झाले.

# अस्वस्थ समाजजीवनाला साहित्यिकांनी दिशा द्यावी-पद्मश्री लक्ष्मण माने



**वर्धा/जनमाध्यम**

सध्याच्या काळात समाजातील विविध स्तरांवर अस्वस्थता वाढत असून, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर साहित्यिकांनी केवळ लेखनापुरते मर्यादित न राहता समाजाला योग्य दिशा देण्याची जबाबदारी स्वीकारावी, असे प्रतिपादन पद्मश्री लक्ष्मण माने यांनी केले.

मारोतराव नारायणे स्मृती प्रतिष्ठानतर्फे स्थानिक सार्वजनिक बजाज वाचनालयाच्या सभागृहात आयोजित वाङ्मय पुरस्कार प्रदान सोहळ्यात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. आजचे समाजजीवन आणि साहित्यव्यवहार' या विषयावरील व्याख्यानात त्यांनी सध्याच्या सामाजिक परिस्थितीचा वेध घेतला. बहुजन समाजाला शिक्षणापासून दूर ठेवण्याचे प्रयत्न होत असल्याचा उल्लेख करत त्यांनी या परिस्थितीविरोधात जागरूकता निर्माण करण्याची गरज अधोरेखित केली.

विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर निधी खर्च केला जात असला, तरी त्याचा सर्वसामान्य नागरिकांपर्यंत अपेक्षित परिणाम पोहोचत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. जनतेच्या करातून उभा राहणारा विकास अधिक पारदर्शक आणि सर्वसमावेशक असणे आवश्यक आहे. समाजातील विषमता कमी करण्यासाठी विचारमंथनासोबतच कृतीचीही गरज आहे, असे ते म्हणाले. समारंभाच्या अध्यक्षस्थानी यशवंत महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. विलासराव देशमुख होते. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात समाज आणि साहित्य यांचे परस्पर संबंध स्पष्ट करत, अशा उपक्रमांमधून प्रबोधनाची प्रक्रिया अधिक बळकट होते, असे सांगितले. विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते यांनी साहित्य पुरस्कारांचे महत्त्व विशद करत नवोदित साहित्यिकांना प्रोत्साहन देण्याची गरज व्यक्त केली. या प्रसंगी राज्यस्तरीय उत्कृष्ट वाङ्मय पुरस्काराने अकोला येथील दिवाकर कृष्ण आचार्य, इस्लामपूर येथील सूरज चैगुले, वसई येथील सखाराम डाखोरे, कोल्हापूर येथील आलोक जत्राटकर आणि मुंबई येथील डॉ. स्मिता दातार यांचा सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती होती. प्रास्ताविकात डॉ. प्रमोद नारायणे यांनी प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली. संचालन प्रा. अभय दांडेकर यांनी केले, तर आभार हेमलता नारायणे यांनी मानले. आयोजनासाठी प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.एकंदरीत, या सोहळ्याच्या माध्यमातून साहित्य आणि समाज यांच्यातील नाते अधोरेखित झाले असून, बदलत्या काळात साहित्यिकांच्या भूमिकेचा पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित झाली.

# बजाज चौकात जीवघेणा खड्डा

## प्रशासन झोपेत, नागरिकांनीच घेतली जबाबदारी

**वर्धा/जनमाध्यम**

शहरातील बजाज चौक परिसरात प्रशासनाच्या निष्क्रियतेचा धक्कादायक नमुना समोर आला आहे. मुख्य रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यामुळे अनेक दिवस नागरिकांचे जीव मुठीत घेऊनच प्रवास सुरू होता. महिला, पुरुष, लहान मुले या खड्ड्यात पडल्याच्या घटना घडल्या, तर अनेक वाहनधारकांची वाहने अडकून अपघाताच्या उंबरठ्यावर पोहोचली.

परिसरातील दुकानदार आणि नागरिकांनी वारंवार तक्रारी करूनही प्रशासनाने कानाडोळा केल्याचा आरोप होत आहे. तक्रारी केल्या, पण कोणी ऐकायलाच तयार नाही, अशी प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली. प्रशासनाच्या या ढिसाळ कारभारामुळे नागरिकांचा संताप उफाळून आला आहे.दरम्यान, बजाज ग्रुप यांच्या माध्यमातून परिसरात सौंदर्यीकरणाची कामे सुरू आहेत. स्ट्रीट लाईटसाठी अंडरग्राउंड वायरिंग करताना हा खड्डा करण्यात आला. मात्र, तो योग्य पद्धतीने न बुजवल्यानेच हा 'मृत्यूचा सापळा' ठरला. आश्चर्य म्हणजे, ना प्रशासन पुढे आले, ना संबंधित संस्था दोघांनीही जबाबदारी झटकली. अखेर त्रस्त नागरिकांनीच पुढाकार घेतला. स्वतःच्या खिशातून पैसे गोळा करून हा खड्डा बुजवण्यात आला आणि वाहनधारकांना तात्पुरता दिलासा मिळाला. मात्र, प्रश्न कायम आहे, नागरिकांनीच रस्ते दुरुस्त करायचे असतील, तर प्रशासन कशासाठी?या घटनेमुळे शहरातील विकासकामांच्या गुणवत्तेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. कामे करायची आणि जबाबदारी टाळायची, हीच का विकासाची नवी व्याख्या असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. आता तरी प्रशासन जागे होणार का, की पुन्हा एखादा अपघात झाल्यावरच हालचाल होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# सामाजिक परिवर्तनाची ठाम दिशा-श्यामसुंदर राठी



## नेत्रहीनांसाठी मदतीचा हात

**आर्वी/जनमाध्यम**

नेत्रहीन बांधवांना मदत करणे म्हणजे केवळ दानधर्म नव्हे, तर सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी आणि मानवी विकासाची खरी दिशा आहे, असे ठाम प्रतिपादन ज्येष्ठ समाजसेवी श्यामसुंदर राठी यांनी केले.

येथील माहेश्वरी भवनात २२ एप्रिल रोजी ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरम व श्यामसुंदर राठी मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्रहीन बांधवांना जीवनोपयोगी साहित्य वितरण सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. राठी पुढे म्हणाले, नेत्रहीन व्यक्तींना अन्न, वस्त्र, निवारा यापलीकडे शिक्षण, वैद्यकीय मदत आणि रोजगारासाठी आवश्यक साधनांची मोठी गरज असते. त्यांना साहित्य देणे म्हणजे त्यांच्या आत्मसन्मानाला बळ देणे आणि समाजात सन्मानाने उभे राहण्याची संधी देणे होय.कार्यक्रमाचे उद्घाटन बुलडाणा अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे विभागीय व्यवस्थापक राजेश बगाडे यांच्या हस्ते झाले. प्रमुख अतिथी म्हणून ऑल इंडिया शास्त्री सोशल फोरमचे राष्ट्रीय उपाध्यक्ष इमरान राही, उपविभागीय अभियंता विजय नाखले, ज्येष्ठ समाजसेवी जगन्नाथ बेलवे, स्नेहालय संस्थेचे अध्यक्ष विलास कुळकर्णी, माहेश्वरी मंडळाचे अध्यक्ष सत्यनारायण चांडक, डॉ. हेलन केअर अंध व अपंग संस्थेचे सचिव प्रकाश सिंग बावरी, प्रदेश संघटक हरीष तांदळे व समाजसेवी जमील शेख उपस्थित होते.

प्रास्ताविकात इमरान राही यांनी आदर, प्रेम आणि ओळख हीच खरी मदत आहे, असे सांगत समाजाने संवेदनशीलतेने पुढे येण्याचे आवाहन केले. तर राजेश बगाडे यांनी 'दुसऱ्याला मदत करणे म्हणजे स्वतःलाच उंचावणे,' असे मत व्यक्त केले.या प्रसंगी सुमारे ५० नेत्रहीन बांधवांना जीवनोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन रवि मंशानी यांनी केले, तर आभार प्रदर्शन हरीष तांदळे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुरेश चांडक, गिरीश राठी, संदीप केला, राजेश चांडक, विठ्ठलदास गांधी, वासुदेव सलामे, राजेश धोपटे, संदीप देशमुख, प्रसन्न बंब आदींनी परिश्रम घेतले.या उपक्रमामुळे आर्वीतील सामाजिक जाणिवांना नवी धार मिळाली असून, मदत हीच माणुसकीची खरी ओळख हा संदेश पुन्हा अधोरेखित झाला.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १५२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# स्त्री शक्ती ज्येष्ठ महिला मंडळाचे उद्घाटन व प्रबोधन



**अमरावती/प्रतिनिधीः-** स्त्री शक्ती महिला ज्येष्ठ नागरिक मंडळाची दि.२७ एप्रिल रोजी श्री शिव साई मंदिर शकुंतला कॉलनी व्हि एम व्ही परिसर अमरावती येथे स्थापना झाली.त्यासाठी पश्चिम विदर्भ प्रादेशिकचे अध्यक्ष पुरुषोत्तम गावंडे अध्यक्ष म्हणून व उद्घाटक म्हणून हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ अध्यक्ष व अमरावती महानगर ज्येष्ठ नागरिक संघ समन्वय समितीच्या अध्यक्ष डॉ शोभा गायकवाड व अतिथी म्हणून आशा दाभाडे लाभल्या.

स्त्री शक्ती महिला मंडळाच्या अध्यक्ष संगीता देवतळे, दर्णे ताई.विधळे ताई,मसाराम ताई ,वानखेडे,राजगुटे ताई व ५० महिला उपस्थित होत्या .आयोजित सभेत उद्घाटक डॉ शोभा गायकवाड अध्यक्ष हितगुज ज्येष्ठ भगिनी मंडळ व शहर समन्वय समिती अध्यक्ष यांनी महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक संघ फेस्कॉमची माहीती दिली. ज्येष्ठ महिलांसाठी असलेल्या विविध सवलती,करावयाचे कार्यक्रम, संस्थेचे नियम व कार्यक्रम यांची माहिती देऊन नवनियुक्त मंडळाचे अभिनंदन केले.

संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.ज्येष्ठ नागरिक महासंघाचे प्रादेशिक अध्यक्ष पी टी गावंडे यांनी मार्गदर्शन करून मंडळाच्या अध्यक्ष संगीता देवतळे यांना फेस्कॉम नियमावली ,युवा मनोहरीचा महिला विशेषांक, व मंडळाचे रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट दिले.स्त्रीशक्ती महिला ज्येष्ठ नागरिक मंडळांना योग्य मार्गदर्शन व ज्येष्ठ नागरिकांचे सामाजिक कर्तव्य व शासनाकडून मिळणाऱ्या सुविधा याची माहिती देऊन मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अतिथी आशा निचत यांनी सम्योचित विचार मांडून उद्बोधन केले.कार्यक्रमाचे योग्य सूत्रसंचालन संगीता देवतळे यांनी करून त्यांनी सर्व महिला सदस्यांचे योग्य रीतीने स्वागत करून मंडळ स्थापनेचा उद्देश विदित केला. ह्या परिसरातील महिला पदाधिकारी दरणे मॅडम,घोरमाडे मॅडम,भुयार मॅडम,राजगुरू मॅडम सर्व उपस्थित महिला शक्ती वेळोवेळी सामाजिक कार्यास बांधील राहील ह्याची ग्वाही दिली.सभेला महिला सदस्यांनी सुंदर भक्ती गीते सादर केली. आभार प्रदर्शनानंतर चहापाण्याने कार्यक्रमाची सांगता झाली.

# ‘कडक उन्हात ‘कोचिंग’चा तडाखा! -विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ थांबवा’



**अचलपूर/प्रतिनिधीः-** आकाशातून जणू आग ओकणारा सूर्य आणि वाढत चाललेले तापमान अशा जीवघेण्या उकाड्यातही अचलपूर-परतवाडा शहरासह तालुक्यात काही खाजगी कोचिंग क्लासेस व अवैध खासगी शिकवणी वर्ग सकाळी दहा वाजेनंतर सुरू असल्याचे चित्र समोर येत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची कोणतीही तमा न बाळगता केवळ आर्थिक फायद्यासाठी घेतले जाणारे हे वर्ग आता संतापाचे कारण ठरत आहेत.

विद्यार्थ्यांना कडक उन्हात घराबाहेर पडून क्लासला जाण्याची सक्ती होत असून, यामुळे उष्माघात, निर्जलीकरण, थकवा यांसारख्या गंभीर आरोग्य समस्यांचा धोका वाढत आहे. विशेषतः लहान विद्यार्थी आणि किशोरवयीन मुलांवर याचा विपरीत परिणाम होत असल्याची पालकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे.

शिक्षण हे महत्त्वाचे असले तरी विद्यार्थ्यांचे आरोग्य त्याहून अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे अशा क्लासेसच्या वेळांमध्ये तातडीने बदल करणे गरजेचे आहे. सकाळी ६ ते ९ आणि संध्याकाळी ६ नंतर अशा वेळेतच शिकवणी वर्ग घेण्यात यावेत, अशी मागणी आता पालक व सुजाण नागरिकांकडून जोर धरत आहे.

यासोबतच, अनेक ठिकाणी कोणतीही अधिकृत परवानगी न घेता सुरू असलेल्या अवैध शिकवणी वर्गांवर प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशीही मागणी होत आहे. शिक्षणाच्या नावाखाली विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ करणाऱ्या अशा बेजबाबदार प्रकारांना आळा बसणे आवश्यक आहे.

दरम्यान, संबंधित प्रशासन, शिक्षण विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी तातडीने याची दखल घेऊन मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोचिंग क्लासेसवर कारवाई करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

## प्रतिकूल परिस्थितीवर मात:
# तक्षशिला महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींची पोलीस विभागात निवड



**अमरावती/प्रतिनिधीः-** श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट द्वारा संचालित स्थानिक तक्षशिला महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थिनींनी आपल्या जिद्दीच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस भरतीत दैदीप्यमान यश संपादन केले आहे. मीनाक्षी मेश्राम हिची मुंबई पोलीस दलात, तर गुंजन बागडे हिची यवतमाळ पोलीस विभागात निवड झाली आहे. विशेष म्हणजे गुंजन बागडे हिने पोलीस उपनिरीक्षक (PSI-पीएसआय) पूर्व परीक्षादेखील उत्तीर्ण करून दुहेरी यश मिळवले आहे.

या दोन्ही विद्यार्थिनींच्या यशाबद्दल महाविद्यालयात मंगळवारी २८ एप्रिल रोजी एका विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. माधुरी फुले यांच्या हस्ते दोन्ही यशस्वी विद्यार्थिनींचा यथोचित सत्कार करण्यात आला. ग्रामीण भागातील आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून येणाऱ्या या मुलींनी मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या यशाबद्दल संस्थेच्या अध्यक्ष कीर्तीताई अर्जुन, सचिव डॉ. कमलाकर पायस आणि प्रशासकीय अधिकारी डॉ. सचिन पंडित यांनी यशस्वी विद्यार्थिनींचे कौतुक करून त्यांच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या सत्कार प्रसंगी प्रा. आनंद देशमुख, प्रा.प्रवीण वानखडे, प्रा.सचिन कुमरे, प्रा. स्वाती गवई, प्रा रुपेश बेलसरे, प्रा.प्रितेश पाटील, प्रा.नवल पाटील, प्रा.मोनाली पाटील, प्रा.निरुपमा भोरे,प्रा निलेश गणगणे, प्रा.सुभाष मुंडे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# सासन येथील सरकारी जागेवरील अतिक्रमण काढा

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर सासन बु. येथील रहिवासी राजेश गजानन पडघामोळ यांनी त्यांच्या घरासमोरील सरकारी जागेवर झालेल्या अतिक्रमणाबाबत तहसिलदारांना निवेदन देत कारवाईची मागणी केली आहे. संबंधित प्रकरणाची वेळेत दखल न घेतल्यास कुटुंबासह तहसिल कार्यालया समोर उपोषणाला बसण्याचा इशारा देखील दिला आहे.गावातील काही स्थानिकांनी संगनमत करून राजेश पडघामोल यांच्या घरासमोरील सरकारी जागेवर अतिक्रमण केले असून त्याठिकाणी टपऱ्या उभारल्या आहेत. त्या टपऱ्यावर अवैध दारू विक्री सुरू आहे. यामुळे गावाची शांतता भंग होत आहे.दि. २२ एप्रिलला टपरीवर वाद झाला होता. तो वाद सोडविण्याचा प्रयत्न करीत असतांना संबंधितांनी त्यांच्या आईवर हल्ला केला. यात त्यांच्या आईला गंभीर दुखापत होऊन उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यामुळे संबंधितांवर कारवाई करुन अतिक्रमण तात्काळ हटवावे, अवैध दारू विक्री बंद करावी तसेच सरकारी जागेवरील अतिक्रमण हटविण्यात यावे,अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने सात दिवसांत योग्य ती कारवाई न केल्यास दि. ३० एप्रिलपासून दर्यापूर तहसिल कार्यालयासमोर कुटुंबासह आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा पडघामोल यांनी दिला आहे.


## पाहिजे

ऑटोमोबाईल स्पेअर पार्टच्या गोडाऊनमध्ये काम करण्याकरीता दोन मुले पाहिजेत.
तसेच अकौन्टींग करीता एक मुलगी पाहिजे.
**--पत्ता--**
सी-१२, सातुर्णा,
एम.आय.डी.सी.-बडनेरा रोड,
अमरावती
मो.नं.७०२०८७९१६८/ ८००७३४२३३५


### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८३१/२०२६**
शंकर व ईतर -वि- निरंक
**पुढील ता.०३.०७.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Shankar Kamalkumar Pingle, Age 56 Yrs. Occu.: Service
2. Dnyanesh Kamalkumar Pingle, Age 50 Yrs. Occu.: Service
3. Yogesh Kamalkumar Pingle, Age 49 Yrs. Occu.: Service
All R/o Dharmraj Colony, Saraswati Vihar Somanwadi, H.V.Nagar, Amravati. Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : ग़ल्थ

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत कमलकुमार पांडुरंग पिंगळे आणि प्रतिभा कमलकुमार पिंगळे हे अनुकमे दिनांक 11.02.2023 व 21.02.2020 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार शंकर व ईतर विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा शंकर व ईतर विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८०२/२०२६**
शेख व ईतर -वि- निरंक
**पुढील ता.२२.०६.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Shaikh Muzamil Shaikh Vajir Saudagar, Age 46 Yrs. Occu.: Labour
R/o Shaikh Vajir Saudagar Takali Amravati
2. Shahanaj Parveen Sheikh Hamid, Age 40 Yrs. Occu.: Household
R/o Saudagar Pura, Walgaon, Amravati
3. Shaikh Anis Shaikh Vajir Saudagar, Age 38 Yrs. Occu.: Labour
R/o Takali Jahagir, Tq. Dist. Amrvati
4. Quiser Jahan Shaikh Firoz, Age 36 Yrs. Occu.: Household
R/o Shaikh Firoz, Opp.Wahed Khan College, Wahed Nagar, Amravati
5. Shaikh Rajik Shaikh Vajir Saudagar, Age 33 Yrs. Occu.: Labour
R/o Shaikh Vajir Saudagar Takali Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : ग़ल्थ

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत शेख वाजीर शेख रज्जाक व महेजबीन शेख वजीर सौदागर हे अनुकमे दिनांक 28.04.2022 व 25.11.2017 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार शेख व ईतर विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा शेख व ईतर विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १८.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**


जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २३१**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६९
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com


### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.८३७/२०२६**
दिलीप व ईतर -वि- निरंक
**पुढील ता.२१.०६.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Dilip Devrao Suryawanshi, Age 64 Yrs. Occu.: Labour
2. Sumer Diliprao Suryawanshi, Age 31 Yrs. Occu.: Labour
Both R/o Behind Deshmukh Lawn, V.M.V. Amravati
3. Bhagyashri Diliprao Suryawanshi, Age 35 Yrs. Occu.: Household
R/o Income Tax Colony, Opp.Custome Colony, Near Rambag, V.T.C. Mumbai

-- विरुध्द --

गैरअर्जदार : ग़ल्थ

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत सुनंदा दिलीपराव सूर्यवंशी हे दिनांक 02.04.2025 रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार दिलीप व ईतर विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा दिलीप व ईतर विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २४.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

### मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील
**किरकोळ (R.M.J.C.) क्र.१२७/२०२६** **ने.ता.१७.०६.२०२६**

अर्जदार :
१. राजेंद्र बापुराव मुंडवाईक,
रा.फुबगांव, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
२. नामदेव बापुराव मुंडवाईक,
रा.जांब रोड, दांडेकर लेआऊट, वडगांव, ता.जि.यवतमाळ
३. छबुताई शंकर शिंगाने, रा.राजुरा, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. मंदाबाई मधुकरराव अजमिरे, रा.कोठा फत्तेपूर, ता.जि.यवतमाळ
५. सुनंदा गोविंद गुल्हाने, रा.विरुळ रोंघे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

ज्याअर्थी मयत जनाबाई बापुराव मुंडवाईक यांचा मृत्यू दि.०९.१०.२००५ रोजी विरुळ रोंघे, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. मयतांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले असुन अ.नं.३ ते ४ ह्या मुली आहेत. मयतांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा
**दिनांक**

आज दि. / /२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार निमखेड, ग्रा.पं.कार्यालय निमखेड, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निमखेड यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव आबिद हुसैन अब्दुल खालीक अर्जात नमूद जन्म दिनांक ०२.०७.१९६८ च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे निमखेड येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ................ हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) ---------------------------------------------------------------------------

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) कु.जे.व्ही.यावले (सचिव) | १) कु.जे.व्ही.यावले (सचिव) |
| २) प्रल्हाद पारणुजी सिरसाठ | २) प्रल्हाद पारणुजी सिरसाठ |
| ३) पंकज नानासाहेब राऊत (पो.पा.) | ३) पंकज नानासाहेब राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) | ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत निमखेड
पंचायत समिती चांदूर बाजार

### स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा
**दिनांक**

आज दि. / /२०२६ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार निमखेड, ग्रा.पं.कार्यालय निमखेड, निबंधक, जन्म व मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत निमखेड यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव खुर्शिद हुसेन अब्दुल खालीक अर्जात नमूद जन्म दिनांक ०७.०३.१९६२ च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे निमखेड येथील स्थानिक रहिवासी आहेत.

२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.

३) सदरील जन्म/मृत्यू नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण ................ हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा).

४) ---------------------------------------------------------------------------

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) कु.जे.व्ही.यावले (सचिव) | १) कु.जे.व्ही.यावले (सचिव) |
| २) प्रल्हाद पारणुजी सिरसाठ | २) प्रल्हाद पारणुजी सिरसाठ |
| ३) पंकज नानासाहेब राऊत (पो.पा.) | ३) पंकज नानासाहेब राऊत (पो.पा.) |
| ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) | ४) जी.डी.फुटाणे (तलाठी) |

शिक्का

निबंधक,
जन्म मृत्यू नोंदणी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत निमखेड
पंचायत समिती चांदूर बाजार

## सायटेशन नोटीस
**P.No.252/ 2026**

विद्यमान जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश वरुड यांचे न्यायालयात

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२६** **ने.ता.११.०६.२०२६**

अर्जदार :
1. Smt.Sushma Vinod Gadwe, Age 44 Yrs. Occu.: Household
2. Utkarsh Vinod Gadwe, Age 17 Yrs. Occu.: Education
3. Kaustubh Vinod Gadwe, Age 10 Yrs. Occu.: Education
2 & 3 through Guardian her Mother Sushma Vinod Gadwe
Both R/o Morshi, Tq.Morshi, Dist.Amravati.
At present Amar Colony, Amravati. Tq. Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

Application U/s 8(2) of Hindu Minority and Guardianship Act 1956, for Grant of Permission to Sale Share of Minor in Property

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी नांवे असलेली खालील वर्णनाची मालमत्ता विकण्याची परवानगी मिळण्याकरीता वि.जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वरुड यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

मालमत्तेचे वर्णन - मौजा रसुलपूर कोपरा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील शेत गट नं.०९/१, हे.आर ३.०१, आ.रु.पै.७.००, भो.वर्ग-१ ही शेतजमीन आहे.

त्याअर्थी कोणास सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाची असल्यास अर्जदारांचे सर्व नातलग व हितसंबंधी यांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक ११.०६.२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता वि.जिल्हा न्यायाधीश-१ व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, वरुड, जि.अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. जर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदरहू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दि.२४.०४.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
अधीक्षक
**जिल्हा न्यायालय-१ ,**
**वरुड**

## जाहीर नोटीस

विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

**आर.एम.जे.सी.क्र.२११/२०२६** **ने.ता.२०.०६.२०२६**

अर्जदार :
१. श्रीमती उमाबाई गजाननराव तट्टे, वय ५५ धंदा - घरकाम
२. निकिता वैभव वानखडे, वय ३५ धंदा - घरकाम
३. सुमीत गजाननराव तट्टे, वय ३० धंदा - नोकरी
सर्व रा.शिरजगाव बंड, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती

-- विरध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. मयत गजाननराव गुणवंतराव तट्टे यांचा मृत्यू दिनांक १८.०२.२०२६ रोजी युनिटी सिगमा हॉस्पीटल, औरंगाबाद येथे झाला. ते कायमचे शिरजगांव बंड, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथील रहिवासी होते. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात आर.एम.जे.सी.क्र.२११/२०२६ नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२२.०४.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी व फौजदारी न्यायालय ,**
**चांदूर बाजार**

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेद्वारे सुचित करतो की, माझे पक्षकार मुकेश वासुदेवराव तायडे व प्राजक्ता मुकेश तायडे, रा.अमरावती यांनी केलेल्या ईसारचिठ्ठी नुसार मौजे नवसारी, ता.जि.अमरावती येथील सर्व्हे नं.४९/१-अ मधील रेसिडेंशियल प्लॉट नं.३०-ब याचे क्षेत्रफळ २०४.७५ चौ.मी. म्हणजेच २२०३.०० चौ.फुट या प्रियंका दिनेश खैरकर व दिनेश साहेबराव खैरकर यांचेकडून विकत घेण्याचा सौदा केलेला आहे. आणि सदर लेआऊट प्लॉट नं.३०-ब हा प्रियंका दिनेश खैरकर व दिनेश साहेबराव खैरकर यांच्या मालकीत व ताब्यात दि.२१.०८.२०१७ रोजीचे खरेदी दस्त क.३६७२ नुसार आहे.

प्रियंका दिनेश खैरकर व दिनेश साहेबराव खैरकर यांचेजवळ दि.२१.०८.२०१७ रोजीचे रजि.खरेदी दस्त क.३६७२ चे मुळ दस्त यांच्याकडे आहे. परंतु दिनांक २८.१२.२०११ रोजी रजि.खरेदी दस्त क.६३०६ चे मूळ रजि.दस्त माझे पक्षकाराचे वरील नामे विकेते यांचेकडून गहाळ झालेल आहेत व इतर मूळ दस्त यांच्याकडे आहे.

तरी याबाबत कोणाचेही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशीर वाद, लवाद, दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

अमरावती
दिनांक २८.०४.२०२६

**(ॲड.राहुल व्ही.मोहोड)**
**प्रेरणा कॉलनी, राधा नगर**
**अमरावती-४४४६०३**
**मो.९०९६४६०६७०**

### दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
विद्यमान श्री.श्री.एस.एस.भिंगारदेव, ८ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात

**किरकोळ अर्ज क्र.६१७/२०२६**
श्री.सतीश अधिक तीन -वि- निरंक
**पुढील ता.०७.०५.२०२६**

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
**१. सतीश पुंडलिकराव मोहोड, वय ४२ वर्षे, व्यवसाय - मजुरी**
**२. संजय पुंडलिकराव मोहोड, वय ५१ वर्षे, व्यवसाय - मजुरी**
**१ व २ रा.धानोरा कोकाटे, पो.ब्राम्हणवाडा गोविंदपूर, ता.जि.अमरावती**
**३. नर्मदा श्रीकृष्ण राऊत, वय ५० वर्षे, व्यवसाय - गृहिणी**
**रा.नेरपिंगळाई, ता.मोर्शी, जि.अमरावती**
**४. पार्वताबाई गौतम वानखडे, वय ४७ वर्षे, व्यवसाय - गृहिणी**
**रा.अंजनवती, ता.धामणगांव रेल्वे, जि.अमरावती**

-- विरुध्द --

गैरअर्जदार : ग़ल्थ

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत पुंडलिक आकाराम मोहोड यांचे दिनांक ०९.०९.२०१९ रोजी धानोरा कोकाटे, ता.जि.अमरावती येथे निधन झाले. अर्जदार सतीश अधिक तीन विरुध्द निरंक यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत [illegible] प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा सतीश अधिक तीन विरुध्द निरंक वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०४.०४.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

**आदेशानुसार,**
सहायक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर**
**अमरावती**

# जनगणना २०२७च्या कार्यात येणाऱ्या अडचणी दूर करा

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे उपसंचालक यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

जनगणना २०२७मधिल अडचणी व मागण्याचे निवेदन जनगणना संचालक निरुपमा डांगे यांना दिलेले पत्र उपसंचालक यशवंत पाटिल यांना शिक्षक समितीचे राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर व कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील, रश्मी कोरगांवकर यांनी दिले.राज्य शासनाशी पत्रव्यवहार करू असे आश्वासन त्यांनी दिले. संघटनेच्या वतीने मांडलेली भूमिका रास्त आहे असे सांगितले. कर्मचारी सुरक्षिततेच्या सूचना जिल्हास्तरावरील संबंधित विभागांना दिलेल्या आहेत.



२७ एप्रिल २०२६ रोजी जनगणना संचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांची भेट घेऊन विविध मागण्याचे निवेदन सादर केले यामध्ये जनगणनेच्या कामासाठी संबंधित यंत्रणेने डमोबाईल उपकरण उपलब्ध करून द्यावे.प्रत्यक्ष जनगणनेदरम्यान प्रगणकांना यांना योग्य सुरक्षा पुरविण्यात यावी. सुट्टीच्या कालावधीत कालावधी एवढ्या अर्जित रजा मंजूर करण्यात याव्या.उन्हाळी सुट्टीतील दीर्घ सुट्टीतील डवाहतूक भत्ताङ अदा करण्यात यावा.उन्हाची तीव्रता व उष्माघात यांचा विचार करून प्रशिक्षणाचे सर्व टप्पे लवकरात लवकर पूर्ण करावे. शिक्षणसेवकांचे अकाली निधन झाले तर सहाय्य म्हणुन किमान २० लाख रुपये अनुदान देण्यात यावे.या व इतर मागण्यांसंबंधी संचालक यांच्यासोबत सकारात्मक चर्चा झाली.असे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

शाळा मानांकन (SCAF/ School Quality Assessment Framework) प्रक्रियेमधील अनावश्यक ऑनलाइन कामकाज, वैयक्तिक मोबाईलचा सक्तीने वापर, पुराव्यांच्या अतिरेकामुळे अध्यापन प्रक्रियेवर होणारा विपरीत परिणाम कसा होतो. याबाबतचे निवेदन अध्यक्ष / प्रमुख, राज्य शाळा मानक प्राधिकरण (SSSA), महाराष्ट्र राज्य तसेच संचालक / प्रमुख, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना पत्र देण्यात आले.तसेच शिक्षण सेवक कालावधीत मृत्यू झाल्यास २० लाख रुपये सानुग्रह अनुदान लागू करण्याबाबत व अन्य प्रलंबित मागण्यांबाबत देवेन्द्रजी फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट राज्य तसेच नामदार दादाजी भुसे साहेब शिक्षण मंत्री महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई. यांना निवेदन देण्यात आले. यावेळी राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर व कार्यालयीन चिटणीस किशोर पाटील उपस्थित होते.

## बेटी बचाओ, बेटी पढाओ समर्थ भारतासाठी स्त्री-शक्तीचा जागर

**अमरावती/का.प्र.**

भारताच्या सामाजिक आणि आर्थिक जडणघडणीत महिलांचे योगदान अमूल्य आहे. मात्र, एकेकाळी स्त्री जन्माचे स्वागत करण्यास कचरणाऱ्या समाजात आता परिवर्तनाचे वारे वाहू लागले आहेत. केंद्र सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' या महत्त्वाकांक्षी मोहिमेने केवळ शासकीय आकडेवारीच नव्हे, तर सामान्यांच्या मानसिकतेतही क्रांती घडवून आणली आहे. आज ही मोहीम केवळ घोषणा न राहता 'समर्थ भारता'चा पाया ठरत आहे.

दशकांपूर्वी घसरलेला स्त्री-जन्मदर ही देशासमोरील मोठी चिंता होती. परंतु, गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्र (PCPNDT )कायद्याची कडक अंमलबजावणी आणि व्यापक जनजागृतीमुळे आज चित्र बदलले आहे. ग्रामीण भागातही आता मुलीच्या जन्मावर आनंदोत्सव साजरा केला जात आहे, ही या मोहिमेची पहिली मोठी यशप्राप्ती आहे. केवळ मुलगी वाचवणे पुरेसे नाही, तर तिला स्वावलंबी करणे हे या योजनेचे दुसरे महत्त्वाचे पाऊल आहे. शाळांमध्ये मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची निर्मिती आणि सायकल वाटप यांसारख्या उपक्रमांमुळे माध्यमिक शिक्षणातील मुलींच्या गळतीचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झाले आहे. 'सुकन्या समृद्धी योजने'द्वारे मुलींच्या उच्च शिक्षणासाठी पालकांची होणारी आर्थिक ओढाताण थांबली असून, भविष्यातील गुंतवणुकीचा एक सुरक्षित मार्ग उपलब्ध झाला आहे.

मुलींना सुरक्षित वातावरण देण्यासाठी सरकारने 'महिला हेल्पलाईन १८१' आणि 'वन स्टॉप सेंटर' सारख्या यंत्रणा उभारल्या आहेत. तंत्रज्ञान, संरक्षण क्षेत्र आणि क्रीडा क्षेत्रात मुलींनी मारलेली भरारी ही या सक्षमीकरणाची उदाहरणे आहेत. जेव्हा आपण एका मुलीला शिक्षित करतो, तेव्हा आपण संपूर्ण पिढीला सुसंस्कृत करत असतो.'लेक वाचवा, लेक शिकवा' ही मोहीम भारताला 'विश्वगुरू' बनवण्याच्या प्रवासातील एक महत्त्वाचा घटक आहे.जिल्हा परिषदेच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी देखील 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' या मोहिमेला विशेष पाठबळ दिले होते.आजची 'लेक' ही उद्याच्या भारताची आधारस्तंभ आहे. घराघरांतून सुरू झालेला हा स्त्री-शक्तीचा जागर जेव्हा पूर्णत्वास येईल, तेव्हाच भारत खऱ्या अर्थाने आर्थिक महासत्ता म्हणून जगात नावाजला जाईल. गरज आहे ती फक्त आपली सामाजिक जबाबदारी ओळखून, प्रत्येक मुलीला प्रगतीची समान संधी देण्याची !

## स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शिक्षकांवर अतिरीक्त भार

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रातील प्राथमिक शिक्षकांवर सध्या शैक्षणिक आणि अशैक्षणिक कामांचा मोठा ताण आहे. मे २०२६ मध्ये नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण, जनगणना आणि मतदारयादी पडताळणी ही तीन महत्त्वाची कामे एकाच वेळी आल्याने शिक्षकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.

शिक्षकांवरील कामाचा तपशील नवीन अभ्यासक्रम प्रशिक्षण: इयत्ता २ री, ३ री आणि ४ थीचा अभ्यासक्रम २०२६ पासून बदलणार आहे. यासाठी जिल्हास्तरीय प्रशिक्षण ११ मे ते १४ मे आणि तालुकास्तरीय प्रशिक्षण १८ मे ते ३० मे या दरम्यान आयोजित करण्यात आले आहे.दशवार्षिक जनगणना (Census २०२७): जनगणनेचा पहिला टप्पा एप्रिल ते सप्टेंबर २०२६ या काळात राबवला जात आहे. यासाठी शिक्षकांना प्रगणक आणि पर्यवेक्षक म्हणून नियुक्त केले असून, त्यांचे प्रशिक्षण एप्रील चे शेवटी व मे महिन्याच्या सुरुवातीला होणार आहे.मतदारयादी पडताळणी




(SIR): निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार बीएलओ (BLO) म्हणून नियुक्त शिक्षकांकडून घरोघरी जाऊन मतदार सर्वेक्षण केले जात आहे.

मुख्य अडचणी आणि मागण्या सुट्ट्यांवर गदा: ही सर्व कामे उन्हाळ्याच्या सुट्टीत आल्याने शिक्षकांच्या हक्काच्या सुट्ट्या संपत असल्याचे शिक्षक संघटनांचे म्हणणे आहे.दंडात्मक कारवाईची भीती: निवडणूक आणि जनगणनेच्या कामावर हजर न राहणाऱ्या शिक्षकांवर एफआयआर (FIR) दाखल करण्याची किंवा प्रशासकीय कारवाईची ताकीद देण्यात आली आहे.प्रशिक्षणात बदल करण्याची मागणी: शिक्षक संघटनानी या तिहेरी कामाच्या ओझ्यामुळे प्रशिक्षणाच्या वेळापत्रकात बदल करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.शिक्षण विभागाच्या ऑगस्ट २०२४ च्या शासन निर्णयानुसार (GR) शिक्षकांना अशैक्षणिक कामातून मुक्त करण्याचे आश्वासन दिले होते, मात्र आरटीई (RTE) कायद्यातील तरतुदीनुसार जनगणना आणि निवडणूक ही कामे अनिवार्य असल्याने ही जबाबदारी शिक्षकांना पार पाडावीच लागत आहे.यात आणखी भर म्हणजे २८, २९, ३० एप्रील २०२६ ला अंदाज समितीचा ४६ डिग्री मध्ये दौरा आणि त्यानिमीत्त सर्व शाळा सकाळी ७ ते ५ या काळात सुर ठेवण्याचे प्रशासनाचे आदेश, क्रुर थट्टा चालवलीय शिक्षकांची.याच काळात पहीला वर्गाचा प्रवेशोत्सव घेण्याचे आदेश शिक्षण विभागाने दिले आहे.६वर्षाचे चिमुकले या उन्हात कसे येतिल या मेळावा आयोजना बाबत मुख्याध्यापक आणि शिक्षक अडचणीत आले आहे.४६ डिग्री तापमानात जेव्हा सर्वसामान्य माणसाला साधे घराबाहेर पडणे कठीण होते, तिथे शाळांमध्ये जाऊन पाहणी करणे म्हणजे क्रूर थट्टाच आहे.एसी ऑफिसमध्ये बसून निर्णय घेणाऱ्यांना जमिनीवरची परिस्थिती, विशेषतः विदर्भ किंवा मराठवाड्यातील उष्णतेची दाहकता कळत नसावी, असेच यातून दिसतेय. इतक्या कडाक्याच्या उन्हात लहान मुलांच्या व शिक्षकांच्या आरोग्याशी खेळण्यापेक्षा ही समिती पावसाळ्यात किंवा हिवाळ्यात का येत नाही, हा प्रश्न खरेच विचारण्यासारखा आहे.

### महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी
## जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्राचा आधार

**अमरावती/का.प्र.**

भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयांतर्गत राबविल्या जाणाऱ्या 'मिशन शक्ती' या महत्त्वाकांक्षी मोहिमेअंतर्गत अमरावती जिल्ह्यात 'जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्र' महिलांच्या प्रगतीसाठी सज्ज झाले आहे. महिलांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची माहिती एकाच छताखाली मिळावी आणि त्यांच्या समस्यांचे निराकरण व्हावे, या उद्देशाने या केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. हे केंद्र मुख्य पोस्ट ऑफिसच्या बाजूला, जुने तहसील कार्यालय, अमरावती येथे आहे.

आजच्या काळात महिला सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या सक्षम होणे काळाची गरज आहे. मात्र, अनेकदा माहितीच्या अभावामुळे गरजू महिला शासनाच्या कल्याणकारी योजनांपासून वंचित राहतात. ही दरी भरून काढण्यासाठी जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्र हे एक 'वन स्टॉप सपोर्ट सिस्टम' म्हणून काम करणार आहे. या केंद्रामार्फत ग्रामीण व शहरी भागातील महिला, विशेषतः विधवा, घटस्फोटित, पीडित आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील महिलांना प्राधान्याने मार्गदर्शन केले जाते.या केंद्राच्या मुख्य कार्याविषयी माहिती देताना जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, हे केंद्र केवळ माहिती देण्याचे काम करणार नाही, तर विविध सरकारी विभागांमध्ये समन्वय साधून महिलांना योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करेल. यामध्ये प्रामुख्याने प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, उज्ज्वला योजना, सुकन्या समृद्धी आणि महिला बचत गटांच्या बळकटीकरणावर भर दिला जाणार आहे. तसेच, ज्या महिलांना कायदेशीर सल्ला, कौशल्य प्रशिक्षण किंवा रोजगाराची आवश्यकता आहे, त्यांनाही येथे योग्य दिशा दाखवली जाते.

जिल्हा महिला सक्षमीकरण केंद्रात जिल्हा समन्वयक आणि तज्ज्ञ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे, जे महिलांच्या तक्रारींची नोंद घेऊन त्यावर तत्परतेने कार्यवाही करतात. तसेच जिल्ह्यातील 'सखी वन स्टॉप सेंटर' आणि महिला हेल्पलाईन (१८१) यांच्याशी हे केंद्र थेट जोडलेले असल्याने संकटग्रस्त महिलांना तात्काळ मदत मिळणे सुलभ झाले आहे. महिलांच्या स्वावलंबनाकडे टाकलेले हे पाऊल जिल्ह्याच्या सामाजिक विकासासाठी नक्कीच दिशादर्शक ठरेल.

## श्रीराम हायस्कूलच्या विद्यार्थिनीचे यश

**टाकरखेडा संभू -** श्रीराम हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय टाकरखेड़ा संभू येथून राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन. एम. एम .एस) परीक्षेला बसलेल्या सात विद्यार्थ्यांपैकी पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले होते. त्यापैकी शिष्यवृत्तीसाठी इतर मागासवर्गीय जातीतून खुशी देवानंद यावले ही २२ वी तसेच अनुसूचित जमाती मधून संजना कैलास सोळंके ही ९ वी निवड यादीत येऊन पात्र ठरले. या दोन पात्र विद्यार्थ्यांना इयत्ता वर्ग ९ ते १२ वी पर्यंत दरवर्षी १२ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळणार आहे. श्रीराम शिक्षण संस्था टाकरखेडा संभूच्या अध्यक्ष डॉ.नीलांबरी देशमुख, उपाध्यक्ष विशाल देशमुख, सचिव स्वाती देशमुख,सभासद इंदु



' देशमुख, प्रदीप देशमुख,मुख्याध्यापक तथा प्राचार्य उमेश सोलव तसेच शाळेतील शिक्षक सविता बेलसरे,शैलेश डहाके, सुनील प्रांजळे, नरेंद्र सांगोले ,सुरज देशमुख,संतोष देशमुख, संगीता लोहेकर या सर्वांनी अभिनंदन केले.

# जिल्ह्यात कृषी सेवा केंद्रांचा बेमुदत बंद

## विक्रेत्यांचा हुकूमशाहीविरोधात एल्गार

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

जिल्ह्यातील सर्व कृषी सेवा केंद्र चालक व विक्रेते बंधूंनी दि.२७ बेमुदत बंद आंदोलनाला सुरुवात केली असून, प्रशासनाच्या कथित मनमानी कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.विविध मागण्यांसाठी हे आंदोलन पुकारण्यात आले असून, जिल्ह्यातील अनेक कृषी सेवा केंद्र आज दिवसभर बंद ठेवण्यात आल्याची माहिती मिळाली आहे.

विक्रेत्यांनी स्पष्ट केले की, त्यांच्या मागण्या आर्थिक स्वरूपाच्या नसून व्यवसायातील अडचणी दूर करण्यासंबंधित आहेत. आम्ही स्वतःचा व्यवसाय करून सरकारला महसूल देत आहोत आणि शेतकऱ्यांना आवश्यक सेवा पुरवत आहोत.



मात्र, आमच्या अडचणींकडे दुर्लक्ष करून प्रशासनाकडून आम्हाला वेठीस धरले जात आहे,' अशी भावना विक्रेत्यांनी व्यक्त केली.कृषी सेवा केंद्र चालविताना अनेक तांत्रिक व कायदेशीर अडचणींचा सामना करावा लागतो. विशेषतः बियाणे व इतर कृषी साहित्याच्या विक्रीत सीझनल दबाव असतो. अशा परिस्थितीत किरकोळ त्रुटींवर कठोर कारवाई करत परवाने (लायसन्स) निलंबित केले जात असल्याचा आरोप विक्रेत्यांनी केला आहे.लाखो-कोटींची गुंतवणूक असलेल्या व्यवसायावर १५ दिवसांची निलंबन कारवाई ही आमच्यासाठी मोठा आर्थिक व मानसिक धक्का असतो,' असेही त्यांनी सांगितले. यासोबतच काही अधिकाऱ्यांकडून हुकूमशाही पद्धतीने वागणूक दिली जात असल्याची तक्रारही करण्यात आली आहे. 'कायद्याच्या नावाखाली पारदर्शकता नसलेली कार्यपद्धती राबवली जाते. किरकोळ चुका दाखवून कारवाई केली जाते, तर काही ठिकाणी 'डील' केल्यास कारवाई टाळली जाते,' असा गंभीर आरोप विक्रेत्यांनी केला आहे.विक्रेत्यांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, कायद्यात पारदर्शकता आणावी, किरकोळ त्रुटींवर कठोर कारवाई टाळावी आणि दुकानदारांना आदरपूर्वक वागणूक द्यावी. मागण्या मान्य होईपर्यंत बेमुदत बंद सुरू ठेवण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

आमचा व्यवसाय अत्यंत किचकट आहे. अनेक वर्षांच्या मेहनतीने उभा केलेला व्यवसाय एखाद्या छोट्याशा कारणावरून बंद केला जातो, ही खूप वेदनादायक बाब आहे. आम्ही कोणतीही बेकायदेशीर मागणी करत नाही, फक्त न्याय्य व पारदर्शक कारभाराची अपेक्षा आहे.

**अमोल वाटाणे**
कृषी सेवा केंद्र आसेगाव पूर्णा

कृषी सेवा केंद्र बंद असल्यामुळे आम्हाला बियाणे, खते व औषधे मिळण्यात अडचणी येत आहेत. प्रशासनाने लवकरात लवकर हा प्रश्न सोडवावा, जेणेकरून शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही.

**दत्तात्रय व्यवहारे,**
वासनी शेतकरी

## संक्षिप्त

### 'आयपीआर डे' उत्साहात



**अमरावती -** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ मेडिकल सायन्सेस येथील 'संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकता विकास कक्षा'च्या (RIEDC) वतीने 'बौद्धिक संपदा हक्क दिन' (IPR Day) निमित्त विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. प्राचार्य डॉ. रणजित देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये पार पडला.कार्यक्रमाला प्रमुख वक्ते म्हणून पी. आर. पोटे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंटचे प्राध्यापक डॉ. विवेक कुटे उपस्थित होते. क्रिया शारीर विभाग प्रमुख डॉ. भार्गव टप्पे यांच्या हस्ते प्रमुख वक्त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला RIEDC चे समन्वयक डॉ. पारुल नांदगावकर यांनी आयपीआर डे साजरा करण्यामागचा उद्देश आणि कार्यक्रमाची रूपरेषा विषद केली.प्रमुख वक्ते डॉ. विवेक कुटे यांनी 'संशोधन निबंध प्रकाशन आणि पेटंट्स विषयी जागरूकता' (Awareness on Publications & Patents) या विषयावर अत्यंत प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी पेटंट नोंदणीची प्रक्रिया आणि जागतिक स्तरावर शोधनिबंधांचे महत्त्व यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन खुशी बारेवार हिने तर पाहुण्यांचा परिचय उर्वी देशमुख हिने करून दिला.प्रेम शेंडे यांनी आभार प्रदर्शन केले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम समन्वयक डॉ. रुपाली अंजनकर यांच्यासह अथर्व जाधव आणि अमित उन्होणे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक आणि बी.ए.एम.एस.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बुद्ध पौर्णिमेनिमित्त जयंती महोत्सवाचे आयोजन



**अंजनगाव बारी -** पार्डी (देवी) येथे महान समाजप्रबोधक विचारांचे चार पुरस्कर्ते तथागत गौतम बुद्ध, धर्मनायक सम्राट अशोक, क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा संयुक्त जयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जात आहे. ३० एप्रिल २०२६ च्या पूर्वसंध्येला सुप्रसिद्ध सप्तखंजिरी वादक, समाज प्रबोधनकार पवन महाराज दवंडे यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले असून त्यांच्या माध्यमातून बौद्ध धम्म, समता आणि सामाजिक परिवर्तनाचे संदेश गावामध्ये गुंजणार आहेत.या वेळी भंते सारीपुत्त स्थविर यांचे धम्मदेशना तसेच जिल्ह्याचे खा. बळवंत वानखडे यांच्या हस्ते होणार असून प्रमुख अतिथी म्हणून संतोष परांजपे उपस्थित राहणार आहेत. तसेच चंद्रशेखर चतुर्वेदी (धम्म अभ्यासक) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. संध्याकाळी ७ वाजता इंजि. प्रफुल्ल महाराज दवंडे यांच्या वादकांच्या समाज प्रबोधनाचा कार्यक्रम होणार असून मार्गदर्शनही लाभणार आहे.यजमान मंडळाच्या माहितीप्रमाणे, दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुद्धजयंती दि. १ मे २०२६ रोजी धम्म ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर बुद्धवंदना, उपस्थितांचे मार्गदर्शन व भोजनदान अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती महोत्सवासाठी परिसरातील बंधू-भगिनींनी उपस्थित होते.

## रतन टाटा व्हिजनरी पुरस्काराने टावरी शाळा सन्मानित



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

तालुक्यातील घुईखेड येथील श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल या शाळेला शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी दिल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित 'रतन टाटा व्हिजनरी आयकॉन पुरस्कार – २०२६' ने सन्मानित करण्यात आले आहे.

अमरावती जिल्ह्यातील एकूण ५८ नामांकित शाळांमधून या शाळेने प्रथम क्रमांक प्राप्त करत विशेष यश संपादन केले आहे. इंग्रजी माध्यमातून दर्जेदार शिक्षण, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, डिजिटल क्लासरूम, संगणक प्रशिक्षण तसेच विविध शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यात शाळा यशस्वी ठरली आहे. याशिवाय, महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मोफत शिवणकला प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रम यामुळे शाळेने समाजात वेगळी ओळख निर्माण केली आहे.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाशी जोडण्यासाठी शाळेमार्फत मोफत संगणक वर्ग, डिजिटल साक्षरता अभियान, वृक्षारोपण मोहीम, आरोग्य शिबिरे, 'शासन आपल्या दारी' उपक्रम, करिअर मार्गदर्शन कार्यक्रम तसेच कोरोना काळात विविध सामाजिक सेवा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांची दखल घेत श्रीमती कमलाबाई ब. टावरी बहुउद्देशीय शिक्षण संस्थेला हा बहुमानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. संस्था प्रमुख कृष्णकुमार टावरी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, 'हा पुरस्कार केवळ शाळेचा नसून व्यवस्थापन विभाग, मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, विद्यार्थी आणि पालकांच्या विश्वासाचा सन्मान आहे.या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकांचे सर्वत्र अभिनंदन होत असून गावातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व शिक्षणप्रेमींनी शाळेच्या या उल्लेखनीय कार्याचे कौतुक केले आहे.

# गाजीपूर-रुदाळीतही 'सेवा हक्क दिवस' राबवा

## आदिवासींच्या हक्कांवर घाला घालणाऱ्यांना रोखा

### -प्रदूषणकारी उद्योग, बेकायदेशीर उत्खनन, भाडेपट्टे आणि प्रशासनाच्या दुर्लक्षावर नागरिकांचा संताप

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** अकोट तालुक्यातील गाजीपूर व रुदाळी या आदिवासीबहुल परिसरात वाढत्या प्रदूषणकारी उद्योगांमुळे पर्यावरण आणि नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असताना, येथेही 'सेवा हक्क दिवस' राबवून स्थानिकांच्या समस्या तातडीने सोडवाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. यासंदर्भात पर्यावरण प्रेमी व सुज्ञ नागरिकांनी प्रशासनावर ताशेरे ओढत, केवळ दिखाव्यापुरते कार्यक्रम न राबवता प्रत्यक्ष समस्या असलेल्या भागात उतरावे, असे स्पष्ट केले.

मंगळवारी (दि. २८) जिल्ह्यात सेवा हक्क दिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विविध शासकीय विभागांनी यावेळी नागरिकांना सेवा पुरविल्याचे चित्र निर्माण करत फोटोसेशनही केले. मात्र या उपक्रमाचा लाभ ठराविक ठिकाणीच मर्यादित राहिल्याचा आरोप होत असून, गाजीपूर–रुदाळीसारख्या गंभीर समस्यांनी ग्रस्त भागांकडे प्रशासनाने जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची भावना व्यक्त होत आहे.

नरनाळा अभयारण्यालगत सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या या भागात गेल्या काही वर्षांत गौण खनिज उत्खनन, स्टोन क्रशर आणि डांबर हॉट मिक्स प्लांट यांसारख्या उद्योगांनी अक्षरशः उच्छाद मांडला आहे. नियमांना बगल देत, शास्त्रोक्त खाणकाम आराखड्याची पायमल्ली करून डोंगर पोखरण्यात येत असल्याने पर्यावरणप्रेमींनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. काही ठिकाणी पाणी लागेपर्यंत खोल खणकाम करण्यात आल्याने नैसर्गिक संतुलन धोक्यात आले आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे, खदान परिसरात 'डिजीएमएस'च्या परवानगी विनाच जिलेटीन व डिटोनेटरच्या सहाय्याने बेकायदेशीर ब्लास्टिंग होत असल्याचेही समोर आले आहे. या स्फोटांमुळे घरांना तडे जाणे, टिन शेड्स हादरणे, तसेच पोपटखेड धरणाच्या आवरभिंतीची माती घसरणे अशा धोकादायक घटना घडत आहेत. त्यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

दरम्यान, स्टोन क्रशरमधून निर्माण होणारी धूळ आणि वायू प्रदूषणामुळे स्थानिक आदिवासी बांधवांना श्वसनासंबंधी आजारांचा सामना करावा लागत असून फळबागांवर धुळीने अक्षरशः चादर टाकली असल्याचे चित्र आहे. धूळ नियंत्रणासाठी आवश्यक यंत्रणा बहुतांश ठिकाणी नसल्याचेही निदर्शनास आले आहे. वन्यजीवांवरही या प्रदूषणाचा विपरीत परिणाम होत असल्याची भीती व्यक्त होत आहे. वाहतुकीचा प्रश्नही तितकाच गंभीर बनला आहे. पोपटखेड धरणावरील पुलावरून क्षमतेपेक्षा जास्त वजनाची वाहने दररोज धावत असून, सुमारे २०० हून अधिक ओव्हरलोडिंग ट्रकची ये-जा सुरू आहे. संबंधित पुलाच्या तपासणी अहवालात तो धोकादायक असल्याचे नमूद करण्यात आले असतानाही प्रशासनाने अद्याप कोणतीही ठोस कारवाई केलेली नाही. भविष्यात हा पूल कोसळल्यास गाजीपूर, रुदाळी व इतर गावांचा संपर्क तुटण्याची भीती व्यक्त होत आहे.

याशिवाय, आदिवासींच्या जमिनी गैरआदिवासींकडून शासनाच्या परवानगी विनाच बेकायदेशीररित्या भाडेतत्त्वावर घेणे, कोट्यवधींचे उद्योग उभारणे, मात्र स्थानिकांना त्याचा कोणताही लाभ न मिळणे, अशा प्रकारांमुळे संताप अधिकच वाढला आहे. अनेक प्रकरणांमध्ये उत्खननावर कोट्यवधींची दंडवसुली प्रलंबित असल्याचेही समोर आले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर, गाजीपूर–रुदाळी परिसरात विशेष सेवा हक्क दिवस आयोजित करून संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देत समस्या सोडवाव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा येत्या काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**या आहेत प्रमुख तक्रारी-**

- नरनाळा अभयारण्याच्या बफर झोनमध्ये गाजीपूर–रुदाळीचा समावेश न करणे
- आदिवासी जमिनींवर बेकायदेशीर भाडेपट्टे व करारनामे
- स्टोन क्रशर व हॉट मिक्स प्लांटमधून प्रदूषण नियंत्रणाचा अभाव
- फळबागांचे नुकसान व शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान
- तात्पुरत्या परवान्यांवर मोठ्या प्रमाणात गौण खनिज उत्खनन
- पोपटखेड धरण पुलावरून ओव्हरलोडिंग वाहतूक
- जिलेटीन–डिटोनेटरद्वारे बेकायदेशीर ब्लास्टिंग
- आदिवासींच्या नावावर रॉयल्टी; प्रत्यक्ष उत्खनन मात्र इतरांकडून
- 'डिजीएमएस' च्या परवानगी विना होणारी ब्लास्टिंग
- वाणिज्यिक उपयोगासाठी झालेल्या अकृषक जमिनीवर औद्योगिक साम्राज्य
- दिवस - रात्र होणारे उत्खनन व गौण खनिज प्रक्रिया
- कोट्यवधींची दंड वसुली प्रलंबितच

# अनैतिक संबंधाच्या संशयातून युवकाची हत्या

## झोपेतच कुऱ्हाडीने वार करून तरुणाचा अंत



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** यवतमाळ जिल्ह्यातील वडगाव जंगल पोलिस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या बोरीसिंह गावात अनैतिक संबंधाच्या संशयातून एक थरारक खून उघडकीस आला असून, या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मंगळवार, दिनांक २८ एप्रिल रोजी घडलेल्या या घटनेत २२ वर्षीय तरुणाचा निर्घृण खून करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, मयत आशिष उर्फ कृष्णा खंडूजी कांबळे (वय २२) याचे आरोपी पांडुरंग प्रल्हाद कांबळे (वय ४०) यांच्या पत्नीसोबत मागील वर्षभरापासून अनैतिक संबंध असल्याचा संशय होता. याच संशयातून संतप्त झालेल्या आरोपीने थेट जीवघेणा हल्ला चढविला.

घटनेच्या दिवशी पहाटेच्या सुमारास मयत आशिष घराच्या छतावर झोपलेला असताना आरोपीने कुऱ्हाडीने गळा, पाठ आणि हातावर सपासप वार करत त्याची निर्दयी हत्या केली. या आधी आरोपीने चुकीच्या समजुतीतून आशिषऐवजी त्याचा मोठा भाऊ शरद खंडूजी कांबळे (वय २९) याच्यावरही कुऱ्हाडीने हल्ला केला. या हल्ल्यात शरद जखमी झाला असून सध्या त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलीस पाटील राहुल ☞(पान २ वर)

# मराठा साम्राज्य सन्मान महामोर्चा १ मे रोजी

## -शिव प्रतिष्ठान युवा हिंदुस्तानचे आयोजन



**अमरावती/प्रतिनिधीः-** एनसीईआरटीच्या वतीने आठव्या वर्गातील अभ्यासक्रमातून सन १७५९ मधील मराठा साम्राज्य विस्तार दर्शविणारा नकाशा हटविण्यात आला आहे. याचा विरोध करत शिवप्रतिष्ठान युवा हिंदुस्तानच्या वतीने शुक्रवार १ मे रोजी मराठा साम्राज्य सन्मान महामोर्चा सांगलीमध्ये काढण्यात येणार आहे, अशी माहिती आज मंगळवार २८ एप्रिल रोजी त्रकार परिषद मध्ये आयोजकांनी दिली. त्यांनी सांगितले की, छत्रपती उदयनराजे भोसले, छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले व छत्रपती संभाजीराजे भोसलेंसह हिंदवी स्वराज्य सेनेचे वंशज, संशोधक आणि अभ्यासाकांना यामध्ये निमंत्रित करण्यात आले आहे. एनसीईआरटीकडून घेण्यात आलेला हा निर्णय तथ्यविरोधी आहे.सन १७५०-१७६० मध्ये मराठा ☞(पान २ वर)

# थिलोरीत गोठ्याला आग

## -सुदैवाने जीवितहानी नाही



**खल्लार/प्रतिनिधीः-** विदर्भामध्ये उन्हाचा पारा हा झपाट्याने वाढत आहे.गेल्या तीन दिवसांपासून ४६ ते ४७ अंशावर उन्हाचा पारा वाढलेला आहे. अशातच आता ग्रामीण भागामध्ये आग लागण्याचे प्रमाण हे सुद्धा वाढलेले आहे .

दर्यापूर तालुक्यातील थिलोरी येथे आज (दि. २८) दुपारी एक वाजताच्या सुमारास गावाच्या बाहेर असलेल्या गोठ्याला अचानक आग लागल्याने एकच खळबळ उडाली.ही माहीती गावात पसरताच गावातील तरुण मंडळींनी आग विझविण्यासाठी धाव घेतली. ट्रॅक्टरच्या साहाय्याने ड्रममध्ये पाणी आणून आग नियंत्रणात आणली. युवकांच्या समय सुचकतेने व पुढाकाराने मोठा अनर्थ टळला. अग्निशमन दलाला सुद्धा पाचारण करण्यात आले होते मात्र तो पर्यंत गावातील युवकांच्या पुढाकाराने आग आटोक्यात आणली गेली होती.

# अंबादेवी मार्गावर ७ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त

## नगरसेवक मो.रेहान यांच्या तत्परतेने समोर आले प्रकरण



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील अंबादेवी मार्गावर सोमवारीं मध्यरात्री ७ लाखांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला. प्रभाग क्रमांक १५ छाया नगर पठाणपुरा येथील नगरसेवक मोहम्मद रेहान उर्फ भल्ला यांच्या वतीने अंबादेवी मार्गावर वाहन रोखल्याने वाद निर्माण झाला होता. या प्रकरणात कोतवाली आणि बडनेरा दोन्ही पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या तक्रारी दाखल करण्यात आल्या आहे. एकीकडे कोतवाली पोलिसांनी गुटक्याने भरलेले वाहन पकडले तर दुसरीकडे नगरसेवकाच्या विरोधात मारहाण आणि लुटीची तक्रार आल्याने दिवसभर शहरात चर्चा जोरावर होती. माहिती नुसार बोलेरो पिकअप वाहन एमएच ३० बिडी २५५६ मध्ये गुटखा भरला होता. हे वाहन अंबादेवी मार्गावरून जात असताना नगरसेवक भल्ला यांना चाहूल लागली. त्यांनी पोलिसांना माहिती न देता आपल्या सहकाऱ्यांसह मिळून हे वाहन अंबादेवी मार्गावर रोखले. या दरम्यान चालक आणि वाहकासोबत मारहाण करण्यात आली. त्यानंतर पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळावर पोहोचून पंचनामा केला. विविध कंपन्यांचे ☞(पान २ वर)

# अमरावतीत अस्तित्वात येणार बाल पोलीस पथक

## अल्पवयीन गुन्हेगारांवर लागणार अंकुश

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर आणि जिल्ह्यात अल्पवयीन गुन्हेगारांची संख्या वाढत आहे. यावर अंकुश लावण्यासाठी आता स्पेशल जुवेनाईल पोलीस युनिट (बाल पोलीस पथक) स्थापित करण्याचा निर्णय राज्य बाल अधिकार सुरक्षा आयोगाच्या निर्देशानुसार घेण्यात आला आहे. त्यानुसार पोलीस आयुक्तालय आणि पोलीस अधीक्षक कार्यालयात विशेष बाल पोलीस पथक कक्ष स्थापित करण्यात येणार आहे. यामध्ये अल्पवयीन मुलांशी जुळलेल्या प्रकरणाचा तपास होणार आहे. राज्य बाल अधिकार सुरक्षा आयोगाचे सदस्य प्रवीण भुजाडे यांनी माहिती दिली की, विशेष बाल पोलीस पथकामध्ये अल्पवयीन मुलांशी जुळलेले गंभीर प्रकरण जसे की बाल शोषण, अपहरण, बालमजूर, बालविवाह, शोषण यासारखे प्रकरणाला प्राथमिकता देणार आहे. अल्पवयीन मुलांमध्ये गुन्हेगारींचे वाढते प्रमाण लक्षात घेता प्रत्येक जिल्ह्यात हे कक्ष स्थापित करण्यात येणार आहे. अल्पवयीन मुलांच्या मनात जी भीती आहे ती पोलिसांच्या समोर आल्यास त्यांना मदत मिळेल. प्रत्येक ठाण्यात एक बालकल्याण पोलीस अधिकारी नियुक्त करण्यात येणार आहे. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक स्तरावरील ते अधिकारी असणार आहेत.पिडित अल्पवयीन मुलांना योग्य सहायता, मार्गदर्शन आणि सुरक्षा देण्यासाठी ☞(पान २ वर)

# डफरीन परिसरातून दुचाकी चोर ताब्यात



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हा स्त्री रुग्णालय परिसरातून स्प्लेंडर दुचाकी चोरी झाली होती. या प्रकरणात गाडगे नगर डिबी पथकाने कारवाई करून आरोपी गौरव विठ्ठल ढोणे (वय ३०, म्हैसपूर, दर्यापूर ) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चोरीची स्प्लेंडर एमएच २७ बीयु ५३५२ कि.५० हजार रुपये जप्त करण्यात आली आहे. प्रवीण राजेंद्र इंगळे (वय ३२, नारायणपूर, अचलपूर) यांनी तक्रार दिली होती की १७ मार्च रोजी दुपारी ते जिल्हा स्त्री रुग्णालयात गेले होते. त्यांनी तेथील पार्किंग मध्ये त्यांची दुचाकी लावली होती. काम झाल्यावर ते जेव्हा सायंकाळी परत आले ,तर त्यांना दुचाकी नाही दिसली. याची तक्रार त्यांनी पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी तक्रारीच्या आधारावर परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले आणि आरोपी गौरव विठ्ठल ढोणे याला ताब्यात घेतले. विचारपूस मध्ये त्याने आपल्या ☞(पान २ वर)

# न.प. सफाई कामगार धडकले जिल्हाधिकारी कार्यालयावर

## कंत्राटदार सफाई कामगारांना पूर्ण वेतन देत नसल्याचा आरोप




अंजनगाव सुर्जी /प्रतिनिधीः- अंजनगाव सुर्जी नगरपरिषद हद्दीत स्वच्छ भारत अभियानांतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये सफाई कामगारांना शासन निर्धारित वेतन न दिल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी संबंधित ठेकेदाराचे बिल तात्काळ थांबवावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे. तक्रारदार अब्दुल साजिद व इतर सफाई कामगारांनी दि. २७ रोजी जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे निवेदन सादर केले. निवेदनानुसार, निर्मल ग्राम विकास बहुउद्देशीय संस्थेमार्फत नगरपरीषद येथे सफाईचे कंत्राट घेण्यात आले आहे. संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या किमान वेतनानुसार प्रतिदिन ५१९ रुपये दराने मजुरांशी करार केला आहे. मात्र प्रत्यक्षात कामगारांना केवळ ३०० रुपये प्रतिदिन रोजंदारी दिली जात आहे. त्यामुळे प्रत्येक मजुराचे दररोज ☞(पान २ वर)

# मोर्शीच्या व्यापाऱ्याला १७.८१ लाखांनी लुटले

## नागपूरातील ९ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी येथील व्यापा-याचे नागपूर हिंगणा रोड येथे अपहरण करून त्याला १७ लाख ८१ हजार रुपयांनी लुटण्यात आल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणात व्यापारी अलीम खान सलीम खान (वय ४१,पिंपळखुटा ) यांच्या तक्रारी वरून पोलिसांनी नागपूरच्या ९ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार अलीम खान सलीम खान यांचे मोर्शी मध्ये तवक्कल ट्रेडिंग नावाचे प्रतिष्ठान आहे. अलीम खान यांनी फेब्रुवारी २०२६ मध्ये महावितरणच्या लिलाव मध्ये १७ लाख ८१ हजार रुपयाचे ॲल्युमिनियम कंडक्टर खरेदी केले होते. हा माल विकण्यासाठी त्यांनी नागपूर येथील अवधान स्टील कंपनी सोबत डिल केली होती. १३ एप्रिल रोजी अलीम खान ट्रक मध्ये माल भरून नागपूरसाठी रवाना झाले. यावेळी मुख्य आरोपी मो.साजीद आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हिंगणा रोडवर अलीम खान यांच्या कारला अडविले. चाकूच्या धाकावर अलीम खान ☞(पान २ वर)

# जिल्ह्यात एकाच महिन्यात ६ बालविवाह रोखले




**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यात बालविवाह प्रतिबंधासाठी राबविण्यात येत असलेल्या मोहिमेला एप्रिल महिन्यात उल्लेखनीय यश मिळाले असून विविध यंत्रणांच्या समन्वयातून एकूण ६ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले आहे. बालविवाह होणार असल्याची गोपनीय माहिती मिळताच महिला व बाल विकास विभाग, पोलीस प्रशासन, बाल संरक्षण यंत्रणा व बाल कल्याण समिती यांच्या संयुक्त पथकांनी तात्काळ हस्तक्षेप करून हे विवाह थांबविले. संबंधित पालक व कुटुंबियांचे समुपदेशन करून बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच कायदेशीर परिणाम याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

# उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे विद्यापीठ परीक्षांचे वेळापत्रक बदला

## सिनेट सदस्य अमोल देशमुख यांची मागणी



**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात सध्या सुरू असलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर अमरावती विद्यापीठाच्या नियोजित व चालू असलेल्या परीक्षांच्या वेळापत्रकात तातडीने बदल करण्याची मागणी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे सिनेट सदस्य अमोल देशमुख यांनी केली आहे .

सध्या विदर्भासह राज्यातील अनेक भागांत तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या पुढे गेले असून, भारतीय हवामान विभागाने २५ एप्रिल ते १२ मे दरम्यान तापमान ४५°C ते ४९°C दरम्यान राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यातच आपल्या पश्चिम विदर्भातील तापमान तर सर्व रेकॉर्ड मोडीत काढत आहे. या पार्श्वभूमीवर अनेक शासकीय व प्रशासकीय कार्यालयांनी आपल्या कामकाजाच्या वेळेत आवश्यक बदल केले आहेत.

विद्यार्थ्यांना दुपारच्या सत्रात परीक्षा देताना उष्णतेमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ग्रामीण व दुर्गम ☞(पान २ वर)

# जिल्हा युवा पुरस्कार जाहीर

## महाराष्ट्र दिनी होणार मान्यवरांच्या हस्ते गौरव



**अमरावती/प्रतिनिधीः-** सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या जिल्ह्यातील युवक, युवती आणि संस्थांचा गौरव करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणारे सन २०२४-२५ व २०२५-२६ चे 'जिल्हा युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. हे पुरस्कार १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस मुख्यालय, अमरावती येथील प्रांगणात आयोजित सोहळ्यात प्रदान करण्यात येणार आहेत. राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या शुभहस्ते आणि वरिष्ठ सनदी अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत हा वितरण सोहळा पार पडणार असल्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी कळविले ☞(पान २ वर)